इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २८१ ▸ शुक्रवार,ता.१३ फेब्रुवारी २०२६ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

तारण कर्ज
व्याजदर ९.५०% पासून सुरुवात
१) N.A.जागा, कौलारु घर
२) R.C.C. घर, औद्योगिक शेड
३) पत्रा घर, दुकानगाळे
या सर्व प्रॉपर्टीवर तारण कर्ज मिळेल.
५ लाख ते ५० कोटी बँक व्याज दरात
– संपर्क –
9190690010, 9595919625

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

केस गळती रोखा, सौंदर्य जपा
डॉ. अमोल मगदुम यांचे
योगिनी
भृंग केश तेल
केसवाढीसाठी संजीवनी
सर्व मेडिकल स्टोअर्स मध्ये उपलब्ध
Customer Care 9270 14 5446

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

## १२ किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र शेलार यांनी स्विकारले

■ मुंबई,ता.१२ –

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र आज राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्विकारले.**

युनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास आज मंत्री ॲड.शेलार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादनही केले.

सुमारे दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी ११ जुलै २०२५ रोजी, युनेस्कोच्या ४७ व्या अधिवेशनात (पान २ वर)

# ११४ राफेल खरेदीवर शिक्कामोर्तब



## ३.२५ लाख कोटींचा व्यवहार
## विमानांची निर्मिती भारतात होणार
## चीन,पाकिस्तानची झोप उडणार

■ नवी दिल्ली,ता.१२–

**भारताने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. संरक्षण अधिग्रहण परिषदेने गुरुवारी यासंबंधी प्रस्तावाला मंजुरी दिली. या कराराची अंदाजे किंमत ३.२५ लाख कोटी रुपये आहे. यामुळे भारताची आकाशातील ताकद वाढणार असून यामुळे चीन आणि पाकिस्तानची झोप उडणार आहे.**

फ्रेंच कंपनी दसॉल्ट एव्हिएशन सोबत सदरचा करार होईल आणि व्यावसायिक आणि तांत्रिक वाटाघाटी लवकरच सुरू होतील.गेल्या काही महिन्यात जुन्या विमानांच्या निवृत्तीमुळे भारतीय हवाई दलाच्या स्क्वॉडनची संख्या ४२ च्या मंजूर संख्येच्या तुलनेत केवळ २९ पर्यंत कमी झाली आहे, अशावेळी हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारताने सप्टेंबरमध्ये आपल्या जुन्या झालेल्या मिग-२१ विमानांच्या ताफ्याला पूर्णपणे निवृत्त केले.त्यानंतर, मिग-२९, जग्वार आणि मिराज २००० सारख्या विमानांनाही निवृत्त करण्याचे नियोजन आहे. यामुळे हवाई दलात लढाऊ विमानांची गंभीर कमतरता निर्माण झाली आहे. शेजारील देशांसोबत वाढत्या तणावामुळे लष्करी आधुनिकीकरणाची गरजही वाढली आहे.अशा परिस्थितीत, ११४ नवीन राफेल जेट्स हवाई दलाला पूर्वपिक्षा अधिक मजबूत बनवतील.राफेल आधीच भारतीय हवाई दलाच्या सेवेत आहे.२०१६ मध्ये, भारताने फ्रान्सकडून ३६ राफेल लढाऊ विमाने खरेदी केली होती जी आता पूर्णपणे कार्यरत आहेत. मोदी सरकारने संरक्षण (पान २ वर)

**देशाची संरक्षण व्यवस्था अधिक भक्कम करण्यासाठी केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. देशाच्या हवाई दलाकडे असलेला राफेल विमानांचा ताफा वाढवण्याच्या दृष्टीने संरक्षण मंत्रालयाने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमानांची खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. त्याबरोबरच अमेरिकेकडून ६ पी ८ आय टेहळणी विमाने खरेदी करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण सामुग्री खरेदी परिषदेच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला आहे. फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रॉन यांच्या नियोजित भारत दौऱ्यापूर्वी हा निर्णय घेण्यात आला आहे. या व्यवहारामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिकच दृढ होणार आहेत.**

# लाल किल्ल्याजवळील स्फोटात 'जैश'चा हात

■ नवी दिल्ली,ता.१२–

**संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादविरोधी निरीक्षण पथकाने लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटप्रकरणी महत्त्वपूर्ण खुलासा केला आहे. यूएनच्या अहवालानुसार, एका सदस्य राष्ट्राने दिलेल्या माहितीनुसार जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्याजवळ झालेल्या हल्ल्याची जबाबदारी स्विकारली आहे.**



## संयुक्त राष्ट्राच्या अहवालात पाकची पोलखोल

संयुक्त राष्ट्राच्या अहवालात नमूद केल्यानुसार दिल्लीतील लाल किल्ला परिसरात ९ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या या हल्ल्यात १५ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेशी जैश-ए-मोहम्मदचा संबंध असल्याची माहिती संबंधित सदस्य देशाने यूएनला दिली आहे.याशिवाय, संघटनेच्या बदलत्या रणनीतीबाबतही संयुक्त राष्ट्रांनी चिंता व्यक्त केली आहे. जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझहर याने ८ ऑक्टोबर २०२५ 'जमात-उल-मुमिनात' नावाच्या विशेष महिला शाखेच्या स्थापनेची औपचारिक घोषणा केल्याचे अहवालात म्हटले आहे. या नव्या शाखेचा उद्देश दहशतवादी कारवायांना पाठबळ (पान २ वर)

# कोल्हापूर-मिरज रेल्वे मार्ग दुहेरीकरणासाठी ९८४ कोटींचा निधी मंजूर-खास.महाडिक

■ कोल्हापूर,ता.१२–

**कोल्हापूर ते मिरज हा रेल्वे मार्ग एकेरी आहे. त्यामुळे नव्या गाड्या कोल्हापुरातून सुरू करणे तसेच रेल्वे गाड्यांचे क्रॉसिंग याला मर्यादा येत होत्या.त्यामुळे कोल्हापूर ते मिरज या सत्तेचाळीस किलोमीटर मार्गाचे दुहेरीकरण व्हावे ही कोल्हापूरकरांची प्रदीर्घकाळची मागणी आहे.**

खासदार धनंजय महाडिक यांनी सातत्याने या प्रश्नासाठी पाठपुरावा केला.त्यातून कोल्हापूर ते मिरज रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाला लवकरच सुरुवात होणार आहे. सुमारे ४७ किलोमीटरच्या या मार्गाच्या दुहेरीकरणासाठी फायनल लोकेशन सर्वेक्षणाचे काम



पूर्ण झाले आहे. शिवाय ९८४ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.त्यामुळे नजीकच्या काळात कोल्हापूर मिरज रेल्वे मार्ग दुहेरीकरण होणार असल्याची माहिती खासदार धनंजय महाडिक यांनी दिली.कोल्हापूर ते मिरज रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण झाले की,अनेक लांब पल्ल्याच्या नव्या रेल्वे गाड्या (पान २ वर)

## मुंबई उच्च न्यायालयाकडून शेवटची संधी
# विजय मल्ल्याला खडसावले

■ मुंबई,ता.१२–

**भारताचा फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्याची थेट मुंबई उच्च न्यायालयाने कानउघाडणी केली आहे. याचसोबत**



**भारतात परतण्यासाठी विजय मल्ल्याला शेवटची संधी देण्यात आली आहे.**

तसेच फ्युजिटीव्ह इकनॉमिक ऑफेंडर कायद्याच्या तरतुदींना आव्हान देणारी यांची प्रलंबित असल्याचा फायदा (पान २ वर)

**विजय मल्ल्याच्या प्रत्यार्पणाची कारवाई अंतिम टप्प्यात**

**यूनायटेड किंगडममधील प्रत्यार्पणाची कारवाई अंतिम टप्प्यात आली आहे. प्रत्यार्पण होणार हे लक्षात आल्यावर येथे कारवाईला आव्हान देण्यात आल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.तर याचिका दाखल करण्याच्या वेळेस तपास यंत्रणेच्या वकीलांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.**

# अजितदादा आणि माझ्यामध्ये विलिनीकरणावर चर्चा झाली होती

■ नवी दिल्ली,ता.१२–

**माझे आणि अजित**



**दादामध्ये राष्ट्रवादीच्या विलिनी करणावर चर्चा झाली होती. बहिण-भावामध्ये बोलणे झाले होते ते आमच्यात आहे आणि ते वास्तव आहे.**

## सुप्रिया सुळे यांचे वक्तव्य

अनेकांना विलिनीकरणाबाबत बऱ्याच गोष्टी माहीत नाहीत. मात्र अनेकांना मी बोललेले आवडत नाही असे मत (पान २ वर)

**सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री झाल्या.अजितदादा गेल्यानंतर त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या आल्या. सुनेत्रा वहिनींवर ही नवीन जबाबदारी आहे. सुनेत्रा वहिनी पालकमंत्री झाल्याचा आनंद आहे.पण अजितदादा नसल्याचे दु:खही आहे. सध्या माझ्या एका डोळ्यात अश्रू आणि एका डोळ्यात आनंद आहे. अजितदादा नसण्याचे दु:ख कधीच भरून निघणार नाही.**

## आयशरची झाडाला धडक; युवक ठार

■आजरा,ता.१२ (प्रतिनिधी)–

**आजरा-आंबोली महामार्गा वरील**



**आयशर ट्रकची झाडाला धडक होवून सुमित भाऊ पाटील (वय २२, रा. घाटकरवाडी, ता.आजरा) या युवकाचा मृत्यू झाला.**

चालक राज आनंदा कांबळे (रा.शिरवाड,ता.कराड) हा जखमी झाला आहे.

अपघात गवसेनजीक आल्याचीवाडी गावाजवळील वळणावर गुरुवारी सकाळी ९ वाजता घाटकरवाडीहून आजऱ्याच्या दिशेने जात असताना घडला.पोलिसातून मिळालेली (पान २ वर)

# पु.शिरोलीत चार किलो गांजा जप्त

## युवकास अटक,दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

■ हेरले,ता.१२ (प्रतिनिधी)–

**पुलाची शिरोली येथे चार किलो गांजासह एकाला अटक केली.उमरअली इस्माईल पटेल (वय ३१, रा. शिरोली पुलाची, ता. हातकणंगले) असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून ४ किलो १२० ग्रॅम गांजा आणि दुचाकीसह एकूण एक लाख चोपन्न हजार चारशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुलाची शिरोली येथील पाण्याच्या टाकीजवळ स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.**





याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला पुणे-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या शिरोली येथील पाण्याच्या टाकीजवळ एक व्यक्ती मोटारसायकलवरून गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती.या माहितीची खात्री करून पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर वाघ आणि त्यांच्या पथकाने परिसरात सापळा रचला. यावेळी संशयास्पदरित्या आलेल्या उमरअली पटेल याला ताब्यात घेऊन चौकशी (पान २ वर)

# विलीनीकरणाचा विचार नको

## ✔ सुनेत्रा पवार यांना भाजपचा सल्ला
## ✔ मार्च अखेरीस सुनेत्रा पवार अर्थमंत्री!

■ नवी दिल्ली,ता.१२(प्रतिनिधी)–

**तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विलीनीकरणावर**



**पुढचे पाऊल टाकू नका. हा सल्ला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहा यांनी दिला आहे, अशी माहिती भाजपकडून खासगीत देण्यात आला.**

शरद पवार यांनी भारतीय जनता पक्षाची किमान दोनवेळा दिशाभूल केली आहे. हा मुद्दा डोक्यात ठेऊन संबंधित सल्ला देण्यात आल्याचे कळले. महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या २३ तारखेपासून सुरु होणार आहे. हे अधिवेशन २५ मार्च पर्यंत चालणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अर्थ आणि नियोजन हे खाते आपोआप आले आहे. म्हणजे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर त्यांची सर्व खाती आपोआप मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे आले. सुनेत्रा पवार यांच्याकडे अजित पवार यांच्याकडे असलेले बहुतेक मंत्रालय देण्यात आले. केवळ अर्थ आणि नियोजन हे खाते तात्पुरते देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:कडे ठेऊन घेतले आहे.

देवेंद्र फडणवीस हे पुढील महिन्यात ६ मार्च रोजी राज्याचा वर्ष २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प सादर करतील.अर्थसंकल्प अधिवेशन संपल्यानंतर देवेंद्र फडणवीस अर्थ आणि नियोजन खाते सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवणार आहेत अशी माहिती एका भाजपच्या वरिष्ठ नेत्याने खासगी संवादात दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५६३०० रु. | २६२००० रु. |

अंडी ५६० रुपये शेकडा

### हास्यतुषार –सुरेंद्र दास



अखेर १२ फेब्रुवारी तारीख गेली पण विलनी करणाच्या वावड्या नुसत्याचं हवेत उडाल्या..!

# मुश्रीफ-घाटगे,संजयबाबांची युती बळकट

■ कोल्हापूर ता.१२ (प्रतिनिधी)–

**वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे आणि माजी आमदार संजयबाबा घाटगे या तिघा नेत्यांनी माजी खासदार संजय मंडलिक यांची कागलच्या राजकारणात चांगलीच कोंडी केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीनंतर त्याचे प्रत्यंतर आले आहे. त्यामुळे माजी खासदार संजय मंडलिक यांना अद्याप राजकीय सूर सापडलेला नाही, अशी चर्चा आहे. याउलट हसन मुश्रीफ, समरजितसिंह घाटगे आणि संजयबाबा घाटगे हे तिघे मंडलिक यांच्या भोवतीची मोर्चेबांधणी अधिक बळकट करताना दिसत आहेत.**

संजय मंडलिक यांच्या बालेकिल्ल्यातील सर्वच्या सर्व जिल्हा परिषद जागा जिंकून या तिघांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. त्यामुळे कागलमधील हा राजकीय त्रिकोण मंडलिक भेदू शकतील का? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. येत्या काळात याचे उत्तर मिळेल.

## मंडलिक गटाच्या अस्तित्वाची कसोटी

दरम्यान, या भागातून समरजितसिंह घाटगे यांचे नवे नेतृत्व उदयास येत असल्याचे चित्र आहे. हसन मुश्रीफ आणि संजयबाबा घाटगे त्यांच्या नेतृत्वाला आकार देताना दिसत आहेत. अलीकडील राजकीय घडामोडींचा आढावा घेतल्यास संजय मंडलिक काहीसे एकाकी पडल्याचे जाणवते. मात्र त्या ताकदीने ते प्रत्युत्तर देताना दिसत नाहीत. त्यांचे वडील स्वर्गीय सदाशिवराव मंडलिक यांच्यावर जेव्हा जेव्हा राजकीय संकट आले, तेव्हा त्यांनी संघर्षाची भूमिका घेत विरोधकांवर मात केल्याचा इतिहास आहे. त्यामुळे संजय मंडलिक आणि त्यांचे चिरंजीव वीरेंद्र मंडलिक या पितापुत्रांची पुढील काळात खरी कसोटी लागणार आहे. मंडलिक गटाचे अस्तित्व टिकवायचे असेल, तर हा त्रिकोण भेदणे त्यांच्यासमोर मोठे आव्हान ठरणार आहे.कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणात हसन मुश्रीफ आणि काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांच्यातील मैत्री सर्वपरिचित आहे. त्यानंतर कागल नगरपालिका निवडणुकीनंतर एकेकाळचे कट्टर प्रतिस्पर्धी असलेले हसन मुश्रीफ आणि शाहू ग्रुपचे समरजितसिंह घाटगे यांच्यात नवे मैत्रीपर्व सुरू झाले. पडद्यामागे अनेक राजकीय घडामोडी घडल्याची चर्चा होती. कागल तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत यश मिळवल्यानंतर या दोघांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. या भेटीतून (पान २ वर)

# साजणीत बनावट हाय-सिक्युरिटी नंबर प्लेट बनवणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

■ हातकणंगले,ता.१२(प्रतिनिधी)–

**विनापरवाना आणि बेकायदेशीररीत्या बनावट हाय-**



**सिक्युरिटी नंबर प्लेट्स बनवून शासनाची आणि वाहनधारकांची फसवणूक करणाऱ्या एका इसमाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने ताब्यात घेतले आहे. हातकणंगले तालुक्यातील साजणी येथे ही कारवाई करण्यात आली.**

पोलिसातून मिळालेली माहिती अशी की, साजणी येथील बस थांब्यासमोर असलेल्या श्री साई रेडियम आर्ट्स या दुकानामध्ये बनावट नंबर प्लेट्स तयार केल्या जात असल्याची माहिती पोलिसांना माहिती मिळाली होती. त्यानुसार ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी दोनच्या सुमारास पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकला. या दुकानाचा मालक संतोष बबन यादव (वय ३१, रा.साजणी) हा अधिकृत परवानगी नसतानाही बेकायदेशीररीत्या बनावट नंबर प्लेट्स तयार करून त्या खऱ्या असल्याचे भासवून लोकांची फसवणूक करत असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत पोलिसांनी त्याच्याकडून एकूण ४ लाख ६ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील वस्तूंचा समावेश आहे. नंबर प्लेटवर नंबर प्रेस करण्यासाठी वापरले जाणारे प्लेट एम्बॉस मशीन (किंमत २.५० लाख) नंबरवर छापण्यासाठी वापरले जाणारे फॉईल हिटर मशीन (किंमत १ लाख) ३३ बनावट नंबर प्लेट्स, ५५ पिवळ्या रंगाच्या कोऱ्या प्लेट्स आणि डाय संच, मोठ्या प्रमाणात स्टिकर्स आणि प्लास्टिक रोल्स, एक सॅमसंग मोबाईल आणि रोख रक्कम, असा मुद्दा मुद्देमाल जप्त केला आहे. (पान २ वर)

(पान १ वरून)

## राफेल खरेदीवर शिक्कामोर्तब

क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन देण्यावर भर दिला आहे. पूर्वी भारत बहुतेक शस्त्रे आणि यंत्रसामग्री आयात करत असे, परंतू ही परिस्थिती बदलत आहे. स्वदेशी लढाऊ विमाने विकसित करण्याचे प्रयत्न १९८० पासून सुरू आहेत.परंतू गेल्या दशकात तेजस लढाऊ विमानांच्या आगमनाने खरे यश मिळाले.तेजस मिग-२१ सारख्या जुन्या सोव्हिएत विमानांची जागा घेत आहे. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडला आधीच १८० तेजस -१ प्रकारांसाठी ऑर्डर मिळाली आहे, पण एरोस्पेसमधील इंजिन पुरवठा साखळीच्या समस्यांमुळे वितरण अद्याप सुरू झालेले नाही. राफेल करारात मेक इन इंडिया देखील प्रमुख भूमिका बजावेल. वृत्तानुसार, काही विमाने फ्रान्समधून उड्डाण योग्य स्थितीत येतील, तर उर्वरित विमाने भारतीय कंपन्यांसह भारतात तयार केली जातील.

## स्फोटात 'जैश'चा हात

देणे हा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यावरून संघटना भरती आणि सहाय्याच्या पध्दतींमध्ये बदल करत असल्याचे संकेत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या निरीक्षण पथकाने इशारा दिला आहे की, सातत्याने होत असलेल्या दहशतवादविरोधी कारवाईनंतरही जैश-ए-मोहम्मदसारख्या संघटना नवी भरती पध्दती अवलंबून किंवा प्रतिकात्मक व उच्च-प्रभावी हल्ल्यांच्या माध्यमातून स्वतःला जुळवून घेत आहेत.

अहवालानुसार, काही दहशतवादी संघटना कमकुवत किंवा विखुरलेल्या अवस्थेत असल्या तरी स्वतःचे पुनर्गठन करून उच्चस्तरीय लक्ष्यांवर हल्ले करण्याची त्यांची क्षमता अद्याप कायम आहे, जी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेसाठी गंभीर धोका ठरत आहे. दरम्यान, काही देशांच्या मते जैश-ए-मोहम्मद ही संघटना अजूनही सक्रिय आणि कार्यक्षम आहे, तर इतर एका सदस्य देशाच्या मते ती निष्क्रिय झाली आहे. या परस्परविरोधी आकलनांमुळे गुप्तचर माहिती आणि प्रत्यक्ष कारवाईत तफावत दिसून येत असून, दक्षिण आशियातील आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधी प्रयत्न अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत.

## विजय मल्ल्याला खडसावले

घेत देशातील तसेच यूनायटेड किंगडममधील न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर राहता येणार नसल्याचेही मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आता विजय मल्ल्याला शेवटची संधी देत त्याने भारतात परतणार की नाही हे स्पष्ट करावे अन्यथा त्यांची याचिका ऐकली जाणार नसल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. विजय मल्ल्याला बजावताना मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले की, तुम्हाला परत यावेच लागेल. तुम्ही परत येऊ शकत नसाल, तर आम्ही तुमची याचिका ऐकू शकत नाही असे स्पष्ट करत तुम्ही न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर पळत आहात. त्यामुळे तुम्हाला या कार्यवाहीचा लाभ घेता येणार नाही. मात्र, तुमच्याशी न्याय राखत आम्ही ही याचिका फेटाळत नाही. तुम्हाला आणखी एक संधी देत याचिकेवर पुढील सुनावणी १८ फेब्रुवारीला निश्चित केली आहे.विजय मल्ल्याने एफइओ कायद्यातील तरतुदींच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले आहे, तसेच विशेष न्यायालयाने जानेवारी २०१९ साली मल्ल्याला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याच्या आदेशाला देखील त्याने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी पार पडली आहे.दरम्यान, २३ डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने भारतात केव्हा परतणार यासंदर्भात भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले होते. मात्र, गुरुवारी झालेल्या सुनावणीत मल्ल्याने अद्याप कंप्लायन्स प्रतिज्ञापत्र सादर न केल्याची दखल न्यायालयाने घेतली आहे. मल्ल्याने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात बँकांनी त्यांच्याकडून पैसे मागणे चुकीचे असल्याचा तसेच मल्ल्या विरोधातील कारवाई केवळ वसुलीसाठी असल्याचा आभास प्रतिज्ञापत्रात निर्माण करण्यात आल्याचा युक्तिवाद तपास यंत्रणांच्या वतीने करण्यात आला.

## विलीनीकरणाचा विचार नको

विलीनीकरणावर सध्या जोरदार चर्चा होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विलीनीकरण यावर चर्चा होण्यापेक्षा शरद पवार यांचा पक्ष विसर्जित केला जावा असे एक विधान एका भाजप नेत्याने केले. शरद पवार यांचा पक्ष आता संपलेला आहे. त्यांच्या पक्षाची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काय वाताहत झालेली आहे. हे सर्वासमोर आहे. त्यामुळे केंद्रातील भाजप नेते आता शरद पवार यांच्यापासून दूर जाऊ इच्छित आहेत. त्याला कारण शरद पवार यांनी भाजपची दिशाभूल केली हे आहे.

## ९८४ कोटींचा निधी मंजूर

कोल्हापुरातून सुरू होऊ शकतील. शिवाय वंदे भारत सारख्या नव्या आलिशान रेल्वे गाड्या कोल्हापूरला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.गेली सुमारे दोन दशके कोल्हापूर मिरज रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण व्हावे ही मागणी होती. त्यासाठी खासदार धनंजय महाडिक यांच्यासह अनेकांनी प्रयत्न केले होते. खासदार महाडिक यांनी या प्रश्न संसदेमध्ये प्रश्न उपस्थित केला होता.



चार किलो गांजासह उमरअली इस्माईल पटेल याला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने अटक केली.

## चार किलो गांजा जप्त

केली. त्याची झडती घेतली.यामध्ये पोलीसांना ४ किलो १२० ग्रॅम गांजा सापडला. पोलीसांनी गांजासह त्याचा मोबाईल आणि दुचाकी असा मिळून दीड लाखांहून अधिक किमतीचा ऐवज जप्त केला. उमरअली पटेल याने शिरोली एमआयडीसी परिसरात चोरून गांजा विक्री करत असल्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## प्लेट बनवणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

याप्रकरणी पोलिसांनी आरोपी संतोष यादव विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस हवालदार नवनाथ विलास कदम यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस निरिक्षक शरद मेमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नानासाहेब पवार करत आहेत. कोणतीही अधिकृत परवानगी नसताना अशा प्रकारे नंबर प्लेट्स बनवणे हा गंभीर गुन्हा आहे.नागरिकांनी केवळ अधिकृत केंद्रांवरूनच नंबर प्लेट्स घ्याव्यात, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# विलीनीकरणावर चर्चा झाली होती-सुप्रिया सुळे

(पान १ वरून)

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. त्या दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलत होत्या.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनावर मुख्यमंत्र्यांचे निवेदन आले आहे.त्यांनी शब्द दिला आहे की, या विमान अपघाताची सविस्तर चौकशी केली जाईल.रोहितची अस्वस्थता साहजिक आहे. अनेक प्रश्न आहेत, पण त्याची उत्तरे सापडत नाही आहेत. काय झाले,कसे झाले, आपण वाचवू शकलो असतो का? असे अनेक प्रश्न त्याच्या मनात आहेत. त्याने ही त्याची अस्वस्थता मांडली आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी सविस्तर चौकशी करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. त्या चौकशीची आपण वाट पाहूया.आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातावर संशय व्यक्त केला आहे. हा अपघात नसून घातपात असल्याचा दावा करत त्यांनी अनेक पुरावे सादर केले आहेत.याप्रकरणी त्यांनी मुंबई आणि दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन सविस्तर भूमिका मांडली आहे. त्यांनी या पत्रकार परिषदेत अपघाताबाबत संशय व्यक्त करत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.रोहित पवारांच्या या आरोपावर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

याप्रकरणी पवार कुटुंबाकडून कोणतीही अधिकृत भूमिका घेतली जात नसल्यावरून विचारले असता सुप्रिया सुळे म्हणाल्या, आमचे कुटुंब खूप अडचणीच्या काळातून जात आहोत.एकमेकांना आधार देत आम्ही पुढे जात आहोत. आज दादा नाही, त्यामुळे मला जुने उणे-धुणे काढायचे नाही.तो माझा दादा होता.पण तो आज आपल्यात नाही.माझ्यात आणि त्याच्यात जी काही चर्चा झाली ती आमच्यात आहे. आज तो जिथे असेल तिथे तो आनंदी असेल. आमच्या सगळ्या बहीण-भावांचे दादासोबत चांगलं नाते होते.आमच्या बॅचमध्ये एवढ्या लहान वयात दादा ज्या पध्दतीने गेला हे दादाचे जाण्याचे वय नव्हते. इतक्या वर्षात दादाला कधी थकलेला,आजारी बघितले नाही. आज दादा आपल्यात नाही हे खरे वाटत नाही, असे म्हणत सुप्रिया सुळे भावुक झाल्या.

दरम्यान, शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून त्यांना लवकरच डिस्चार्ज मिळणार असल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली. तसेच, या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी, सोनिया गांधी, राहुल गांधी, राजनाथ सिंग, ओमर अब्दुलांसह अनेकांनी शरद पवार यांच्या प्रकृतीची चौकशी करण्याकरता फोन केले होते.या सर्व काळात सर्वांनी पवार कुटुंबाला साथ दिली, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. शरद पवारांची तब्येत खूप चांगली आहे. रूबी हॉल रूग्णालयाच्या स्टाफचे मी आभार मानते. शरद पवारांना आज रुग्णालायातून डिस्चार्ज मिळू शकतो. अजितदादानंतरच्या काळातही या सगळ्यांनी आमची साथ दिली त्याबद्दलही मी सगळ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांचे आभार मानते, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## युवतीला ८ लाखाला ऑनलाईन गंडा

जळगाव,ता.१२-

**जळगाव जिल्ह्यातील एका ३२ वर्षीय युवतीला तब्बल ८ लाख ५० हजार ८०० रुपयांचा ऑनलाईन गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.** ही युवती खाजगी नोकरी करुन उदरनिर्वाह करते. ८ जानेवारी २०२६ ते १२ जानेवारी दरम्यान युवतीच्या व्हॉट्सअप मोबाईल क्रमांकावर सायबर ठग महिलांनी संपर्क साधला. आरोकिया जेनिटा पी असे नाव सांगत संशयिताने युवतीशी संपर्क केला. एनएसई मर्चन्ट टास्क पुर्ण करण्याचा अफलातून फंडा त्यांनी सांगत भरपूर नफ्याचे अमिष दाखविले. महिलेस जाळ्यात घेतल्यानंतर वेगवेगळ्या टास्कसाठी पैसे भरण्याचा आग्रह केला. महिलेकडून ऑनलाईन पैसे स्विकारत बँक खाते रिकामे केले.

# राहुल गांधींची खासदारकी रद्द करा

## भाजपच्या निशिकांत दुबेंनी लोकसभेत मांडला प्रस्ताव

नवी दिल्ली,ता.१२-

**भाजपाचे आमदार निशिकांत दुबे यांनी काँग्रेस आमदार आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधींच्या संसद सदस्यत्व रद्द करण्याची मागणी करत लोकसभेत प्रस्ताव मांडला आहे.**

भाजपाचे आमदार निशिकांत दुबे यांनी गुरुवारी सांगितले की त्यांनी लोकसभेत एक स्वतंत्र प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावामध्ये ते म्हणतात की राहुल गांधी देशाला दिशाभूल करत आहेत. दुबे यांनी पुढे सांगितले की त्यांनी या प्रस्तावात मागणी केली आहे की या प्रकरणावर चर्चा व्हावी, राहुल गांधींचे संसद सदस्यत्व रद्द करावे आणि त्यांना आयुष्यभर निवडणूक लढण्यावर प्रतिबंध लावावा. दुबे यांनी स्पष्ट केले की राहुल गांधीविरुद्ध कोणताही विशेषाधिकार प्रस्ताव आणण्याचा त्यांचा मानस नाही. हा एक स्वतंत्र प्रस्ताव असून, गांधींचे संसदेतून निलंबन करण्याची मागणी त्यात केली आहे. राहुल गांधी जॉर्ज सोरोससारख्या बाह्य शक्तींच्या पाठिंब्याने देशाची दिशाभूल करीत असल्याचा आरोप दुबेंनी केला.

राहुल गांधी बुधवारी लोकसभेत म्हणाले होते की भारत-अमेरिका व्यापार करारात सरकारने देशाच्या हितांची तडजोड केली आहे. सध्या जग एका अस्थिर काळातून जात आहे, जिथे ऊर्जा आणि वित्त या गोष्टी शस्त्र म्हणून वापरल्या जात आहेत, आणि या पार्श्वभूमीवर भारताने ऊर्जा सुरक्षेच्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये अमेरिकेला जास्त प्रभाव दिल्याचे राहुल म्हणाले.भाजपाचे अनेक नेते राहुल गांधींच्या भाषणावर टीका करत त्यांना 'अपरिपक्व' ठरवले. त्यांच्या मते, विरोधक देशाची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## आयशरची झाडाला धडक; युवक ठार

(पान १ वरून)

माहिती अशी कि, राज कांबळे हे आयशर ट्रकमध्ये पेपररोल भरुन घेवून गोव्याहून घाटकरवाडी येथे येवून थांबले होते. दरम्यान गुरुवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास राज कांबळे व त्यांच्या सोबत सुमित पाटील हा युवक घाटकरवाडीहून आजऱ्याच्या दिशेने चालले होते. दरम्यान गवसे नजकी आल्याचीवाडी गावाजवळील वळणावर राज कांबळे यांचा ताबा सुटल्याने रस्त्याकडील झाडाला आयशर ट्रकची जोराची धडक झाली. यामध्ये बाजूला बसलेला सुमीत गंभीर जखमी झाला. दरम्यान उपचारापुर्वीच त्याचा मृत्यू झाला व चालक राज कांबळे हा जखमी झाला. अपघातात वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे.

अपघाताची नोंद आजरा पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे. याबाबत सुभाष बुधाजी पाटील यांनी फिर्याद दिली असून चालक राज कांबळे याच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास आजरा पोलिस करीत आहेत.

# मुश्रीफ-घाटगे,संजयबाबांची युती बळकट

(पान १ वरून)

जिल्ह्यातील नव्या राजकीय समीकरणांचे संकेत मिळाले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सोबतचा फोटोही बरेच काही सांगून गेला.

या पार्श्वभूमीवर हसन मुश्रीफ आणि समरजितसिंह घाटगे यांना एकत्र आणण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका असल्याची चर्चा रंगली आहे. दुसरीकडे, माजी खासदार संजय मंडलिक यांना राजकीय शह देण्यासाठीच या घडामोडी घडत असल्याचेही बोलले जात आहे.

२०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये संजय मंडलिक यांना हसन मुश्रीफ यांनी मदत केली होती. तर २०१९ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये हसन मुश्रीफ यांच्या विरोधात समरजितसिंह घाटगे यांनी निवडणूक लढवली होती. एकेकाळी हसन मुश्रीफ यांच्यावर ईडीची चौकशी लागली होती. त्या चौकशीमागे समरजितसिंह घाटगे यांचा हात असल्याचा आरोप मुश्रीफ यांनी अनेकदा केला होता. मात्र बदलत्या राजकीय समीकरणांमुळे कट्टर विरोधक असलेले मुश्रीफ आणि घाटगे एकत्र आले आणि मंडलिक यांच्याशी दुरावा वाढला. पुढे संजयबाबा घाटगेही या समीकरणात सहभागी झाले आणि कागलच्या राजकारणात मंडलिक यांची कोंडी अधिक घट्ट झाली.

कागल पालिकेत सत्ता मिळवल्यानंतर मुश्रीफ-घाटगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीतही वर्चस्व मिळवल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री यांची भेट घेऊन आभार मानले.

या घटनांमधून मुश्रीफसमरजित घाटगे यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ झाल्याचे दिसते.

यापुढे समरजितसिंह घाटगे यांचे राजकीय पुनर्वसन नेमके कसे होणार, याकडेही लक्ष लागले आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर स्वर्गीय खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या आठवणी जाग्या होत आहेत.

त्यांनी कोल्हापूरच्या राष्ट्रवादीला वेगळा विचार आणि बळ दिले. २००७ च्या सुमारास त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून शरद पवार यांना आव्हान दिले. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे उमेदवार संभाजीराजे छत्रपती यांचा पराभव करून अपक्ष म्हणून विजय मिळवत त्यांनी आपले राजकीय अस्तित्व दाखवून दिले होते. त्याच धर्तीवर आता संजय मंडलिक यांच्यासमोर पुन्हा एकदा स्वतःचे राजकीय स्थान सिद्ध करण्याचे आव्हान उभे आहे. मात्र कागलच्या राजकारणातील हा त्रिकोण ते भेदू शकतील का? हा प्रश्न कायम आहे.

# वडणगे यात्रेत पाळणे,खाद्यपदार्थ दरावर नियंत्रण ठेवा

■ वडणगे, ता.१२(प्रतिनिधी)-

**वडणगे (ता. करवीर) येथील महाशिवरात्री यात्रा रविवारी होत आहे. यात्रेतील पाळण्याचे दर सर्वसामान्य जनतेच्या आवाक्याबाहेर असल्याने यात्रेतील आनंद घेण्यावर यात्रेकरूंना मर्यादा येतात. त्याकरिता ग्रामपंचायत व यात्रा समितीने सर्वसामान्यांना यात्रेचा आनंद लुटता यावा यासाठी वडणगे महाशिवरात्री यात्रेत शिंगणापूर पॅटर्न राबवावा. अशा मागणीचे निवेदन ग्रामस्थांच्यावतीने ग्रामपंचायत सदस्य सतीश पाटील व ग्राम विकास अधिकारी राजेंद्र भगत यांनी दिले.**



ग्राम विकास अधिकारी यांना निवेदन देताना तानाजीराव पाटील, बी. एम. देवणे, बी. आर. पाटील, अजित जाधव, बाजीराव पाटील, सर्जेराव माने आदि.

## ग्रामस्थांचे ग्रामपंचायतीस निवेदन

निवेदनात म्हटले आहे, शिंगणापूर यात्रेत पाळण्यात बसण्यासाठी पंधरा वर्षाच्या आतील मुला मुलींना ३० रुपये, महिला व पुरुष यांना ५० रुपये प्रमाणे ग्रामपंचायतीने दर ठरवून दिले होते. त्याप्रमाणे वडणगे महाशिवरात्री यात्रेत दर ठेवण्यात यावेत, तसेच खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर कमीत कमी चार्जेस ठेवण्यात यावेत. अशा पद्धतीने यात्रेवर नियंत्रण ठेवून गोरगरिबांच्या मुलांना व लोकांना मोठ्या प्रमाणात यात्रेचा लाभ व आनंद घेता येईल अशा पद्धतीने यात्रेत नियोजन करण्यात यावे.

यावेळी तानाजीराव पाटील, बी. एम. देवणे, बी आर पाटील अजित जाधव, बाजीराव पाटील सर्जेराव माने जालिंदर अस्वले अनिल पवार, विकास अस्वले आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## जागतिक वारसा प्रमाणपत्र शेलार यांनी स्विकारले

(पान १ वरून)

'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले.रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्ल्यांचा समूह आज 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे.या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०२५ मध्ये ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तीवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे.

# कलगुटगी खून प्रकरणातील आरोपींना तपासासाठी फिरविले

मिरज,ता.१२(प्रतिनिधी)-

**मिरजेतील निखिल विलास कलगुटगी खून प्रकरणात मोका (संघटित गुन्हेगारी कायदा) लावण्यात आलेल्या सर्व आरोपींना तपासाच्या अनुषंगाने आज कळंबा कारागृहातून मिरजेत आणण्यात आले. या वेळी आरोपींच्या घराजवळ तसेच शहर पोलीस ठाण्याबाहेर समर्थकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र पोलिसांनी सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठेवत परिस्थिती नियंत्रणात ठेवली.**

या प्रकरणात प्रथमेश ढेरे, गणेश कलगुटगी, चैतन्य कलगुटगी, सलीम पठाण, विशाल शिरोळे, सरफराज बाळासाहेब सय्यद, सचिन चव्हाण, करण बुधनाळे, सुरज कोरे, संग्राम यादव, सोहेल तांबोळी यांच्यासह काही संशयितांवर गुन्हे दाखल असून काही आरोपी अद्याप फरार आहेत. सध्या या टोळीतील ११ जण पोलिसांच्या ताब्यात आहेत.

पोलिस तपासानुसार, संबंधित टोळीने २०१७ पासून परिसरात वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी व आर्थिक फायद्यासाठी खून, खुनाचा प्रयत्न, बेकायदा जमाव जमवणे, खंडणी, अपहरण, दरोडा अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याचा आरोप आहे. त्यामुळे या सर्व आरोपींवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये (मोका) कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी पाठवलेल्या प्रस्तावास पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी मंजुरी दिली आहे.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी विट्याचे उपविभागीय अधिकारी (डीवायएसपी) विपुल पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या तपास प्रक्रिया त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. मोका तपासाअंतर्गत आरोपींना त्यांच्या-त्यांच्या घरांवर नेऊन झाडाझडती व पंचनामा करण्यात आला.

डीवायएसपी विपुल पाटील, शहर पोलीस निरीक्षक चौगले यांच्यासह पोलिसांच्या पथकाने दुपारी दोन वाजल्यापासून सायंकाळपर्यंत ही कारवाई केली.

# सहकार धोरणासाठी सहा गटांची स्थापना

पुणे,ता.१२ -

**राज्याच्या सहकार धोरणासाठी सहा गटांची स्थापना करण्यात आली आहे. या गटांना देण्यात आलेल्या विषयांवर त्यांचे अभिप्राय राज्याचे सहकार धोरण निश्चित करण्यासाठी पंधरा दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश सहकार आयुक्त दिपक तावरे यांनी काढले आहेत.**

त्यामध्ये सहकाराचा पाया मजबूत करणे, सहकारी संस्थांना भविष्यासाठी सज्ज करणे या विषयावरील दोन गटांचे अध्यक्षपद महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्याकडे देण्यात आले आहे.

'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ नुसार राज्याचे सहकार धोरण ठरविण्यासाठी शासनाने ऑक्टोबर २०२५ अन्वये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ३२ सदस्यीय उच्चस्तरीय समिती गठीत केली. या समितीच्या मुंबई येथे झालेल्या नोव्हेंबर २०२५ रोजी बैठकीत ठरल्याप्रमाणे सहा धोरणात्मक ध्येय स्तंभांसाठी सहा गट निश्चित करण्यात आले आहेत. त्यांना नेमून दिलेल्या विषयांबाबत राज्यातील सहकारी संस्थांसंदर्भात संबंधीतांशी चर्चा करुन राज्याचे सहकार धोरणाबाबत अभिप्राय सादर करण्यास सांगण्यात आले आहे.


## ।। ऋणनिर्देश ।।



**स्व. श्रीमती शारदा सखाराम चौगले**

आमच्या मातोश्री श्रीमती शारदा सखाराम चौगले यांचे रविवार, दि. ०१/०२/२०२६ रोजी निधन झाले. या दु:खद प्रसंगी आमचे आप्तेष्ठ, नातेवाईक, मित्र परिवार, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, सहकार क्षेत्रातील मान्यवर व हितचितकांनी प्रत्यक्ष भेटून, फोनद्वारे आमचे सांत्वन केले व आम्हाला धीर दिला याबद्दल आम्ही सर्वांचे शतश: ऋणी आहोत!

**दत्तात्रय सखाराम चौगले** **अवधूत सखाराम चौगले**
**सुभाष सखाराम चौगले** **चौगले परिवार,इचलकरंजी.**

हार्दिक शुभेच्छा !

आमचे परममित्र
श्री. नारायण
मारुती वग्रे यांना
वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !



श्री.नारायण मारुती वग्रे

- शुभेच्छुक -

पवन ढवळे | अजय भांदीगरे | संतोष कोरवी
इम्तियाज गैबी | सतिश सावंत | संदीप साळोखे



## संधीवाताच्या रूग्णांसाठी सुपरस्पेशालिटी सेवा इचलकरंजी येथे रविवारी

**डॉ. वसीम काझी**
M.D.(Med.), P.G.D.G.M., D.N.B.(RHEUMATOLOGY)

खालील लक्षणे असल्यास संधीवात तज्ञांची भेट घ्यावी

- सांधे दुखणे
- सकाळी उठल्यानंतर सांधे कडक होणे
- स्नायुंची सूज-दुखणे आणि दुर्बलता (मायोसायटीस)
- डोळे व तोंडामध्ये खुप कोरडेपणा जाणवणे
- सोरयासिस असलेल्या रूग्णांची सांधेदुखी होणे
- वयोमानानुसार होणारी हाडांची झीज (ऑस्टिओआर्थ्रायटिस)
- वेगवेगळ्या प्रकारची रक्तवाहिन्यांची सुज (Vasculitis)
- साध्यांना सूज येणे
- कमी वयात पाठ दुखणे व ताठरणे
- उन्हात गेल्यास चेहरा लाल होणे
- युरीक ॲसिडमुळे होणारा संधीवात (Gout)
- त्वचा चामड्यासारखी जाड होणे (Scleroderma)
- स्नायुगत वात

इत्यादी सर्व रूग्णांनी सांधेविकार तज्ञांकडून तपासून योग्य ते निदान व उपचार करावा.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ▪ दि.: 15 फेब्रुवारी 2026 वेळ : स. ०९ ते दु.१२

**स्थळ: डॉ.बाफनाज् सुपरस्पेशालिटी क्लिनिक**
जवाहरनगर,इचलकरंजी ✆ 0230-2441052, 7507860077

KOLHAPUR RHEUMATOLOGY CENTER
**कोल्हापूर ह्रुमॅटोलॉजी सेंटर**
1634,फ्लॅट क्रमांक 132, ई वॉर्ड, श्रीराम विद्यालय जवळ,६वी गल्ली, राजारामपुरी.


## डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखाना लि. मोहनराव कदमनगर, वांगी

ता. कडेगांव जि. सांगली (महाराष्ट्र) पिन-४१५३०५
फोन नं. ०२३४७-२९५६०६, २९५६०७

### जाहीर निवेदन

आपले कारखान्याच्या सर्व ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासद यांना कळविणेत येते कि, गळीत हंगाम २०२५-२६ दिनांक २०/०२/२०२६ चे दरम्यान बंद होणार आहे. तरी कारखाना कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील या गळीत हंगामासाठी नोंद केलेला ऊस अद्याप शिल्लक आहे. व ज्या ऊस प्लॉटला रस्त्याची अडचण आहे. आणि न्यायालयीन तसेच, घरगुती वादातील ऊस शिल्लक आहे. अशा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आमचे कारखान्याचे मुख्य शेती ऑफिस, गट ऑफिस व सब गट ऑफिसकडील संबंधित फिल्ड स्टाफ यांचेशी संपर्क साधुन ऊसाची स्वतः तोडणी व वाहतुक करुन कारखाना साईटवरील केनयार्डमध्ये पोहोच करणेत यावा तद्नंतर गाळपा अभावी ऊस शिल्लक राहिलेस होणाऱ्या संबंधिताच्या नुकसान भरपाईस कारखाना जबाबदार राहणार नाही. याची सर्व संबंधित ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी नोंद घेवुन सहकार्य करावे हि विनंती.

मोहनराव कदमनगर,वांगी
दिनांक - १२/०२/२०२६

**एस.एफ.कदम** कार्यकारी संचालक | **दिलीपराव सुर्यवंशी** व्हा.चेअरमन | **मा.आ.मोहनराव कदम (दादा)** चेअरमन

## WARANA UNIVERSITY, WARANANAGAR

Advertisement for Teaching Posts
ADVERTISEMENT NO. 01/2026

Applications are invited for the Teaching Posts in the prescribed form available online on Warana University website www.waranauniversity.org for the School of Law of the University.

| Sr. No. | Title of the post | Subject | No. of Posts |
|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor | Law | 04 |

All these posts will be filled on purely temporary basis for the academic year as per provisions under section 103 of Maharashtra Public Universities Act, 2016.

The details of posts, qualifications, reservation, age, pay and emoluments, process of online application form and the instructions therein etc. are available on the University website. Interested candidates may apply Online on or before 25/02/2026 up to 06.00 PM

Warananagar.

Dr. A. M. Shaikh
Registrar





## २१ वर्ष यशस्वीरित्या कार्यरत असलेले

जयदत्त ॲल्युमिनियम अँड ग्लास प्रा. लि., इचलकरंजी चे सर्वेसर्वा

# मा.श्री. दत्तात्रय उघडे

यांना वाढदिवसाच्या... हार्दिक शुभेच्छा !

जीवेत् शरदः शतम्...

१३ फेब्रुवारी



### आमच्या सेवा

- ग्लास टफन प्रोसेस
- ग्लास इचिंग & ॲसिड प्रोसेस
- ग्लास प्रिंटिंग प्रोसेस
- स्ट्रक्चरल ग्लास ग्लेझिंग
- स्पायडर ग्लास फिटींग
- ग्लास लॅमिनेशन
- DGU ग्लास
- पावडर कोटिंग ॲल्युमिनियम
- टिल्ट अँड टर्न uPVC विंडोज
- अल्टेझा सिस्टीम विंडो
- केसमेंट uPVC विंडोज
- फिक्स्ड uPVC विंडोज
- बे uPVC विंडोज
- ॲल्युमिनियम विक्री
- ACP क्लॅडिंग
- कलर ॲनोडाईझिंग ॲल्युमिनियम

JAYDATTA ALLUMINIUM & GLASS Pvt. Ltd.

शुभेच्छुक : जयदत्त ॲल्युमिनियम अँड ग्लास प्रा. लि. व कर्मचारी वर्ग.
संपर्क : +९१ ९५५२२७४०४०, + ९१ ७७९८२१४०४०, +९१ ९३७०५२८९३०

■ संपादकीय ■

# अविश्वासाचे राजकारण

लोकसभेचे विद्यमान अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरोधात विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली असल्याने आगामी कालावधीमध्ये या विषयावर चर्चा होणे अपेक्षित आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांविषयी पक्षपाती भूमिका घेणे आणि विरोधी पक्षाच्या खासदारांना जनहिताचे मुद्दे उपस्थित करण्यापासून रोखल्याचा आरोप करीत सर्व विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाल्यापासून गेल्या काही दिवसांमध्ये लोकसभेच्या सभागृहामध्ये ज्या प्रकारे कामकाज होत आहे किंवा ज्या प्रकारे अपेक्षित कामकाज होत नाही ते पाहता विरोधी पक्षांची लोकसभा अध्यक्षांबाबतची अशी भूमिका असणे साहजिकच आहे. अर्थात, केवळ आपला अधिकार स्पष्ट करण्यासाठीच विरोधी पक्षांनी हे हत्यार उपसले आहे. कारण एक तर अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिल्यानंतर सभागृहाने ती स्वीकारावी लागते आणि स्वीकारल्यानंतर त्यावर चर्चा करून तो अविश्वास प्रस्ताव मंजूर करावा लागतो. ही सर्व प्रक्रिया पाहता आणि सध्याच्या सत्ताधारी पक्षाचे बळ पाहता विरोधी पक्षांच्या या मोहिमेमध्ये त्यांना यश मिळेल अशी कोणतीही शक्यता दिसत नाही. पण लोकसभेमध्ये सध्या ज्या प्रकारचे कामकाज चालले आहे, त्यासाठी सर्वोच्च पातळीचा विरोध करण्याचे एक हत्यार म्हणूनच विरोधी पक्षांनी अविश्वास ठरावाची नोटीस दिली आहे. अर्थात ही नोटीस आल्यानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या नोटीसीवर निर्णय होईपर्यंत आपण सभागृहात येणार नाही अशी भूमिका तातडीने घेतली हेसुद्धा बरे झाले. खरे तर संसदीय कायद्याप्रमाणे जरी अध्यक्षांवर अशा प्रकारे अविश्वास नोटीस बजावण्यात आली असली, तरी त्यांना कामकाजात भाग घेण्यापासून रोखता येत नाही. पण आपली नैतिक जबाबदारी म्हणून ओम बिर्ला यांनी लोकसभेत हजर न राहण्याची भूमिका घेतली. आजपर्यंतच्या इतिहासाचा विचार करता तीन वेळा लोकसभा अध्यक्षांवर अविश्वास प्रस्तावाचा प्रयत्न करण्यात आला होता, पण तिन्ही वेळा तो फसला होता. लोकसभेचे पहिले अध्यक्ष जी. व्ही. मावळणकर यांच्यावर १९५४ मध्ये, हुकुमसिंग यांच्या विरोधात १९६६ मध्ये आणि बलराम जाखर यांच्या विरोधात १९८७ मध्ये अशाच प्रकारे अविश्वासाचे प्रस्ताव विरोधी पक्षांतर्फे दाखल करण्यात आले होते. पण या प्रकारच्या प्रस्तावांना कोठेही यश मिळाले असे दिसून आले नाही. साहजिकच ओम बिर्ला यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्तावाची गतही तशाच प्रकारची होणार असली, तरी या निमित्ताने सभागृहातील विरोधी पक्षांचा सभागृहाच्या अध्यक्षांवर विश्वास नाही ही गोष्ट अधोरेखित करण्याचे काम मात्र विरोधी पक्षांनी केले आहे. भारतीय लोकशाहीच्या तत्त्वांचा विचार करता लोकसभेचा अध्यक्ष हा लोकसभेचा सदस्यच असतो आणि कोणत्यातरी पक्षातर्फे तो निवडून आलेला असतो. पण एकदा तो लोकसभेचा अध्यक्ष म्हणून निवडून आला तर त्याने निःपक्षपातीपणे काम करावे असे अपेक्षित असते. पण गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये सर्व सरकारांच्या राजवटीमध्ये अध्यक्षांनी नेहमी सत्ताधारी पक्षांची बाजू घेण्याचे काम केले आहे. याची अनेक उदाहरणे सांगता येतात. सरकारला अडचणीत आणेल अशा प्रकारचा कोणताही विषय सभागृहासमोर येणार नाही किंवा विरोधी पक्षांची बाजू वरचढ होते आहे असे दिसल्यास त्याप्रमाणे योग्य कारवाई करणे असे अनेक निर्णय अध्यक्ष घेत असतात. चालू अधिवेशनामध्ये विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू न देण्याचा मुद्दा सर्वाधिक गाजला होता. या व्यतिरिक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकसभेत न येण्याचा सल्लाही ओम बिर्ला यांनी दिला होता. मोदी यांच्यावर लोकसभागृहात हल्ला होण्याची शक्यता असल्याने मी हा निर्णय घेतला, असे त्यांनी स्पष्ट केले होते. इतरही अनेक बाबतीत ओम बिर्ला यांची कामाची पद्धती विरोधी पक्षांना नाराज करणारी ठरली होती. सत्ताधारी पक्षाचा फायदा होईल अशा प्रकारचे वर्तन अप्रत्यक्षपणे लोकसभा अध्यक्षांनी करणे जरी गृहीत धरण्यात येत असले, तरी ओम बिर्ला यांनी थेटपणे अशा प्रकारची भूमिका घेतल्यामुळेच त्यांच्यावर अविश्वास ठराव दाखल करण्याचा निर्णय विरोधी पक्षांनी घेतला आहे. अर्थात, विद्यमान संसदीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या दोन दिवसातच संपणार असल्याने दुसऱ्या टप्प्यामध्ये म्हणजेच ९ मार्चनंतर याबाबतचा निर्णय होणार आहे. सभागृहात सत्ताधारी पक्षाचे बळकट बहुमत असतानासुद्धा विरोधी पक्षांना त्यांची बाजू मांडू दिली जात नाही हा सर्वात मोठा आक्षेपाचा मुद्दा आहे. सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे होते आहे की नाही हे पाहणेसुद्धा अध्यक्षांसाठी महत्त्वाचे असते. ओम बिर्ला यांच्या कारकिर्दीमध्ये ह्या नियमावलीलासुद्धा अनेक वेळा बाजूला सारल्याचे दिसून येते. या परिस्थितीमध्ये ओम बिर्ला यांच्या विरोधात अविश्वास प्रस्तावाची नोटीस जाहीर करून विरोधी पक्षांनी विषयाला गांभीर्य देण्याचे निश्चितच प्रयत्न केले आहेत.

# उशिरा सुचलेले, पण आवश्यक...

**तंत्रज्ञान हे दुधारी शस्त्र आहे, असे आपण नेहमीच म्हणतो. पण आजच्या काळात हे शस्त्र इतके धारदार झाले आहे की, त्यातून सत्याचा आवाज कधी दडपला जातोय, हे सर्वसामान्यांना उमजेनासे झाले आहे. 'डीपफेक' आणि 'एआय' अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने खोट्याला इतक्या शिताफीने खरं भासवले जात आहे की, डोळ्यांनी पाहिलेलंही खरं मानायचं की नाही, असा प्रश्न पडावा. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने माहिती तंत्रज्ञान नियमांमध्ये केलेले बदल आणि सोशल मीडिया कंपन्यांच्या नाड्या आवळण्याचा घेतलेला निर्णय, हे उशिरा सुचलेले पण अत्यंत आवश्यक शहाणपण म्हणावे लागेल.**




सध्याच्या डिजिटल युगात आभासी आणि वास्तव यातील रेषा पुसट होत चालली आहे. ज्याप्रमाणे जादुगार हाताच्या चालाखीने प्रेक्षकांसमोर भ्रम निर्माण करतो, अगदी तसेच काम आज काही अल्गोरिदम करत आहेत. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचा आवाज, चेहरा आणि हावभाव चोरून त्यांच्या तोंडी असे शब्द टाकले जातात, जे त्यांनी कधी उच्चारलेच नसतात. ही केवळ मनोरंजनाची बाब राहिलेली नाही, तर ती राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक सलोखा आणि वैयक्तिक चारित्र्यहननाचे एक भयंकर साधन बनली आहे. सरकारने आता यावर अंकुश ठेवण्यासाठी वीस फेब्रुवारीपासून नवे नियम लागू करण्याचे ठरवले आहे. या नियमांनुसार, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने तयार केलेल्या कोणत्याही मजकुरावर तसे स्पष्ट लेबल लावणे अनिवार्य असेल. म्हणजे, जे समोर दिसते आहे ते अस्सल नसून बनविलेले आहे, याची जाणीव वापरकर्त्याला करून देणे ही आता या व्यासपीठांची कायदेशीर जबाबदारी असेल. सर्वात महत्त्वाचा आणि स्वागतार्ह बदल म्हणजे आक्षेपार्ह मजकूर हटवण्यासाठी दिलेली कालमर्यादा. पूर्वी अशा तक्रारींनंतर मजकूर हटवण्यासाठी छत्तीस तासांचा अवधी दिला जात असे. इंटरनेटच्या वेगाचा विचार करता, छत्तीस तास म्हणजे एक युग वाटते. एखादी चुकीची माहिती किंवा बदनामीकारक चित्र अवघ्या काही मिनिटांत लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकते. ही बाब लक्षात घेऊन सरकारने आता ही मर्यादा अवघ्या तीन तासांवर आणली आहे. यामुळे या कंपन्यांचे उत्तरदायित्व वाढणार आहे. मात्र, इथेच एक कळीचा मुद्दा उपस्थित होतो, तो म्हणजे आक्षेपार्ह नेमके कोणाला म्हणायचे? या शब्दाची व्याख्या ही अनेकदा सोयीनुसार बदलली जाऊ शकते. सत्तेवर असलेल्या सरकारला आपल्या विरोधातील टीका भ्रामक वाटू शकते, तर विरोधकांना तो सत्याचा आवाज वाटू शकतो. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा न आणता या नियमांची अंमलबजावणी करणे, हे लोकशाहीसाठी मोठे आव्हान असेल. जागतिक स्तरावर पाहिले तर भारत यात एकटा नाही. ऑस्ट्रेलिया आणि फ्रान्ससारख्या देशांनी तर लहान मुलांना सोशल मीडियाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी वयाची मर्यादा निश्चित करण्याचे धाडस दाखवले आहे. अमेरिकेत इंस्टाग्राम आणि यूट्यूबच्या विरोधात एक ऐतिहासिक खटला सुरू आहे. या कंपन्यांनी जाणीवपूर्वक अशा यंत्रणा विकसित केल्या आहेत, ज्यामुळे तरुण पिढीला या माध्यमांचे व्यसन लागते.

नफा कमवण्यासाठी मानवी मेंदूच्या कमकुवतपणाचा फायदा घेणाऱ्या या कंपन्यांचे वागणे हे नैतिकतेच्या कोणत्या चौकटीत बसते, हा खरा प्रश्न आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांमध्येही आता अंतर्गत संघर्ष सुरू झाला आहे. प्रगत तंत्रज्ञान विकसित करण्याच्या स्पर्धेत सुरक्षेच्या मानकांकडे दुर्लक्ष केले जात असल्याच्या निषेधार्थ काही तज्ज्ञांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. ही धोक्याची घंटा आहे. जेव्हा निर्मात्यालाच आपली निर्मिती अनियंत्रित वाटू लागते, तेव्हा परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे ते लक्षण असते. विकसनशील देशांसाठी हे आव्हान दुप्पट आहे, कारण तिथे डिजिटल साक्षरतेचे प्रमाण अद्याप कमी आहे. ग्रामीण भागातील नागरिक व्हॉट्सअॅपवर येणाऱ्या

**दैनंदिनी**

डीपफेक चित्रफितीला खरे मानून त्यावर विश्वास ठेवतात, ज्यामुळे अनेकदा चुकीचे समज पसरतात. एक विशेष आणि महत्त्वाची माहिती अशी की, आता 'इलेक्ट्रॉनिक वॉटरमार्किंग' नावाचे एक नवीन तंत्रज्ञान विकसित केले जात आहे. हे तंत्रज्ञान केवळ डोळ्यांना दिसणारे लेबल नाही, तर फाईलच्या कोडिंगमध्येच असा बदल करते की ती फाईल एआयने बनवली आहे हे कोणत्याही सॉफ्टवेअरला ओळखता येईल. केंद्र सरकार अशा तांत्रिक उपायांचाही विचार करत आहे. जागतिक सायबर सुरक्षा अहवालानुसार, आगामी काळात सायबर हल्ल्यांचे प्रमाण हे मानवी हस्तक्षेपापेक्षा एआय संचालित बॉट्सद्वारे सर्वाधिक असेल. हे बॉट्स इतक्या हुबेहूब मानवी संवाद साधतात की, समोरची व्यक्ती फसवली जात आहे हे तिला कळतही नाही. केंद्र सरकारचे नवे नियम या मायाजालावर किती प्रभावी ठरणार, हे येणारा काळच ठरवेल. परंतु, केवळ नियम बनवून चालणार नाही, तर या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना प्रकाशक म्हणून घोषित करण्याची वेळ आली आहे.

जेव्हा एखादे वृत्तपत्र चुकीची बातमी छापते, तेव्हा त्याचे संपादक जबाबदार असतात. मग सोशल मीडिया कंपन्यांना आम्ही केवळ व्यासपीठ आहोत असे म्हणून जबाबदारी का झटकू दिली जाते? खरे तर, एआय तंत्रज्ञानाला नैतिकतेचे अधिष्ठान असणे अनिवार्य आहे. केंद्र सरकारने डिजिटल इंडियाच्या दिशेने पाऊल टाकताना सुरक्षिततेचा हा जो नवा अध्याय सुरू केला आहे, त्याचे यश केवळ अंमलबजावणीवर अवलंबून आहे.

# कॉपीची कुप्रथा रोखण्यासाठी कठोर कायदे हवेत

## शिक्षण विभागाने अभियान राबवूनही कॉपीचे प्रकार उघडकीस

दहावी बारावीच्या परिक्षेत दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परिक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले होते. मागील वर्षी मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला होता. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला होता मात्र विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांचा हा संदेश अंमलात आणला नाही असेच म्हणावे लागेल कारण सध्या चालू असलेल्या बारावीच्या परिक्षेत राज्यातील अनेक भागात मास कॉपी झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. बीड, जालना यासारख्या शहरात कॉपीमुक्त परीक्षा या शिक्षण विभागाच्या अभियानाला हरताळ फासला गेला. अनेक परीक्षा केंद्रावर विद्यार्थी

**आपल्याकडे फेब्रुवारी - मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी - बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. यावर्षी बारावीची बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी पासून सुरू झाली असून ती ११ मार्चला संपणार आहे तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परिक्षेला बसतात. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी.**

कॉपी करताना आढळले. काही परीक्षा केंद्रावर मास कॉपी होत असल्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. याप्रकरणी काही पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांवर शिक्षण विभागाने कारवाई देखील केली आहे. दहावी - बारावी परिक्षेत कॉपी होऊ नये यासाठी शिक्षण विभाग विविध पावले उचलत असताना विद्यार्थ्यांकडून त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही असेच म्हणावे लागेल. दरवर्षी कॉपी करणाऱ्या मुलांची संख्या वाढतच चालली आहे. कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना



कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉलच्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परिक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करते हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपीला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे.

कॉपी करणारा विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परिक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात. त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपीसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

■ श्याम ठाणेदार

# थॅलेसेमिया रुग्णांसाठी दिलासादायक बाब

देशात कितीतरी मुले मोठ्या संख्येने थॅलेसेमिया आजाराने त्रस्त आहेत. किंबहुना उद्वेगाने भारताला थॅलेसेमियाची राजधानी म्हणूनही संबोधले जाते. दरवर्षी सुमारे दहा ते बारा हजार मुले गंभीर थॅलेसेमियासह जन्माला येतात. जन्मजात विकाराने शरीरात हिमोग्लोबिन योग्य प्रमाणात तयार होत नाही. हिमोग्लोबिन हे लाल रक्त पेशींमध्ये असलेले एक प्रोटीन (प्रथिन)आहे. ते संपूर्ण शरीरात ऑक्सिजन पुरविते. थॅलेसेमियासारख्या गंभीर रक्त विकारामुळे रुग्णांना वारंवार रक्त संचरण करावे लागते. हे त्रासदायक आणि वेदनादायकच असते. तथापि आता हे रुग्ण, रक्त संचरणाऐवजी गोळीच्या स्वरूपात औषध घेऊ शकतात. मिटापिव्हॅट हे थॅलेसेमिया या गंभीर आणि धोकादायक आजारावर प्रभावीपणे लढण्यासाठी नव्याने आलेले हे पोटात घेण्याचे औषध आहे. अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने पोटात घ्यायच्या या औषधाला नुकतीच मान्यता दिली आहे. या नव्या औषधामुळे रुग्णाबरोबरच त्याच्या नातेवाईकांनाही दिलासा मिळणार आहे. हे औषध प्रत्यक्ष बाजारात आल्यानंतर आणि त्याच्या अनुभूतीनंतरच हे कसे आणि किती प्रभावी आणि दिलासादायक आहे हे सिद्ध होईल.

■ श्रीकांत जाधव

## वाचकांचा पत्रव्यवहार

### 'एआय'चा गैरवापर रोखण्यासाठी सरकारचा स्वागतार्ह निर्णय



आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या दैनंदिन जीवनात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान हे जितके सुखदायक आणि उपकारक ठरले आहे तितकेच 'एआय'च्या आक्षेपार्ह गैरवापरामुळे नवनवीन सामाजिक समस्यांना तोंड फुटले आहे. 'एआय'चा वापर करून सोशल मीडियावरून अश्लील आणि आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केला जातो. विशेषतः अशा मजकुराद्वारे महिला आणि लहान मुले यांना लक्ष्य केले जाते. यावर प्रतिबंध आणण्यासाठी केंद्र सरकारने कडक पावले उचलली असून माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ यामध्ये सुधारणा केली आहे आणि माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया नीतिमत्ता संहिता) सुधारणा नियम, २०२६ जारी केले आहेत. येत्या २० फेब्रुवारी २०२६ पासून ते अंमलात येणार आहेत. या नव्या नियमांनुसार आक्षेपार्ह मजकूर काढून टाकण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना आता केवळ ३ तासांची मुदत दिली जाणार आहे. एआय निर्मित प्रत्येक छायाचित्र, ऑडिओ किंवा व्हिडिओवर स्पष्ट लेबल असणे अनिवार्य केले आहे.

कोणताही आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध झाल्यास त्यासाठी संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला जबाबदार धरले जाईल. दर तीन महिन्यांनी कंपन्यांना त्यांच्या वापरकर्त्यांना या नियमांची आठवण करून द्यावी लागेल. डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी तसेच 'एआय'चा होणारा गैरवापर टाळण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेला निर्णय योग्य असून स्वागतार्ह आहे.

■ प्रदीप मोरे

### समाजमनावर होणाऱ्या परिणामांचा विचार व्हावा

दूरदर्शनवरून प्रसारित होणाऱ्या मालिकांमध्ये कोणताही सण-उत्सव आला की, ती मालिकांमधील कुटुंब तो सण साजरा करताना दाखवतात. ही गोष्ट खूपच चांगली आहे. समाज हा अनुकरणप्रिय प्राणी आहे. मालिकांमध्ये सण-उत्सव साजरा करताना दाखवल्यावर समाजातील लोक देखील त्याचप्रमाणे उत्सव साजरा करतात. त्यामुळे व्हॅलेंटाईन डे जवळ आल्यावर आठवडाभर आधीच दूरदर्शनवरील मालिकांमधून व्हॅलेंटाईन डे कसा साजरा करावा? हे दाखवताना कलाकारांच्या हातात लाल गुलाबाची फुले दिसत आहेत आणि व्हॅलेंटाईन डे साजरा करण्याची तयारी करताना दाखवले आहे. हे पाहून दूरदर्शनवरील मालिका बघणाऱ्यांचा देखील व्हॅलेंटाईन डे साजरा करणे आवश्यक आहे असा भ्रमनिरास होऊ शकतो. कारण मालिकांमध्ये जे दाखवतात ते सत्यच असते असा सर्वांचा समज होतो. मालिकांचे निर्माते आणि त्यात भूमिका करणारे कलाकार यांना धर्मशिक्षण नसल्यामुळे आणि मालिकांमधून त्यांना पैसे मिळत असल्यामुळे अशा गोष्टी सर्रास दाखवल्या जातात. हे करत असताना याचा समाज मनावर काय परिणाम होतो? याचा विचार करणे देखील महत्त्वाचे आहे. त्यामुळे अशा गोष्टी मालिकांमधून न दाखवणेच योग्य.

■ प्रकाश जोशी

### पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न व्हावेत

निसर्ग पर्यावरण संशोधक डॉ.माधव गाडगीळ यांना अनेक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. निसर्ग संवर्धन संरक्षण यासंदर्भातील त्यांचे कार्य, अभ्यासपूर्ण अहवाल, विकासनिती बदलण्यासाठी प्रयत्न फारच महत्त्वाचे आहेत. त्यांनी अनेक सूचना, अहवाल दिले पण त्याची अंमलबजावणी फारच कमी प्रमाणात झाली. देशात अनेक ठिकाणी निसर्गरम्य परिसरात हॉटेलची संख्या वाढत असून निसर्गाचा विचार बाजूला ठेवून आर्थिक विकास करताना पुढे काय होईल? याचे भान राहिलेले नाही. यासंदर्भात सर्वसामान्य माणूस काही छोटे उपक्रम करू शकेल पण खरी जबाबदारी उद्योजक व राज्यकर्त्यांची आहे असे वाटते. निसर्ग पर्यावरण संरक्षण संवर्धन संदर्भात प्रयत्न करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली असेल.

■ प्र.मु.काळे

## दैनिक पंचांग (सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार,ता.१३.२.२०२६**, विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसु नाम संवत्सरे, उत्तरायणे, शिशिर ऋतो, माघ मासे, कृष्ण पक्षे, एकादशी तिथी १४.२६ नंतर द्वादशी तिथी, मूळ नक्षत्र १६.१६ नंतर, पूर्वषाढा नक्षत्र, धनु रास, वज्रयोग, २७.२४ नंतर सिद्ध योग, बालव करण १४.२६ नंतर, कौलव करण २७.१८ पर्यंत, दिनमान ११.२७, सुर्योदय ७.०४, सुर्यास्त १८.३१ (कोल्हापूरचे), राहू काळ सकाळी १०.३० ते १२, विजया एकादशी, मिरज उरुस, सकाळी १० नंतर तृणकाष्ट संग्रह, धान्य कापणी, मळणी, स्थावराचे करार मदार.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष-**तुमच्या चिडण्यामुळे तुम्ही राईचा पर्वत कराल, त्यामुळे तुमच्या कुटुंबातील सदस्य अस्वस्थ होतील. तुम्हाला आपल्या संतानमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे .

**वृषभ-**कामाच्या ताणामुळे थकवा आणि तणाव आज जाणवेल. धनाची देवाण-घेवाण असेल.तुम्ही एखादे अवघड काम पूर्ण केल्यामुळे मित्र तुमची स्तुती करतील.

**मिथून-** एखादी आनंदाची बातमी मिळण्याची शक्यता आहे. जे लोक बऱ्याच काळापासून आर्थिक तंगीमधून जात आहे त्यांना कुठून तरी धन प्राप्त होऊ शकते.

**कर्क-**आपल्या धनाला व्यर्थ खर्च करू नका. तुमच्या कुटुंबातील सदस्य सांगतील ते तुम्हाला काहीच मान्य होणार नाही.कामाच्या ठिकाणी आज चांगल्या गोष्टी घडतील.

**सिंह-** ज्यांनी धन गुंतवणूक केली होती आज त्यांना त्या गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे. मान्यवर श्रेष्ठ व्यक्तीबरोबरच्या चर्चेमुळे नव्या कल्पना सुचतील.

**कन्या-** सामाजिक स्नेह मेळावे आणि रम्य सहली तुम्हाला आनंदी करतील. विचार न करता कुणाला ही आपला पैसा देऊ नका. तुम्हाला येणाऱ्या काळात मोठी समस्या येऊ शकते.

**तुळ-** तुमच्या उत्तम स्वास्थ्य सोबत तुम्ही आपल्या मित्रांसोबत खेळण्याचा प्लॅन बनवू शकता. मोठ्या योजना आणि चांगल्या संकल्पना असलेली व्यक्ती तुमचे लक्ष वेधून घेईल.

**वृश्चिक-** जुन्या गुंतवणुकीतून आज तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो.नव्या संकल्पना फलप्रद ठरतील. तुम्हाला आपल्या घरातील लहान सदस्यांसोबत वेळ घालवणे शिकले पाहिजे.

**धनु-**दुसऱ्यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. भरपूर आनंदाचा दिवस. परगावी प्रवास आरामदायी नसेल. नवीन महत्त्वाचे संबंध प्रस्थापित होण्यास मदत होईल.

**मकर-** कुटुंबियांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, यासाठी तुम्ही तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा. सहकारी आणि सहयोगी कर्मचाऱ्यांबरोबरचे प्रश्न सुटणार नाहीत.

**कुंभ-**कुणी जवळच्या व्यक्तीसोबत तुमचा वाद होऊ शकतो आणि तुमचा मूड खराब होऊ शकतो. समस्यावर तुम्ही मात कराल. जवळच्या व्यक्तीसोबत तुमचा वाद होऊ शकतो.

**मीन-**कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह यामुळे तणाव येईल.अचानक धनलाभ होईल. तुमच्या प्रतिष्ठेला धक्का लावणाऱ्या लोकांसोबत बोलणे टाळा.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# एस.टी.प्रवासाचा नवा 'डिजीटल पॅटर्न'

## रोख व्यवहारांना फाटा,सुट्या पैशांची कटकट मिटणार

मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजेच एसटीच्या प्रवासात आता तंत्रज्ञानाची नवी पहाट उगवली आहे. रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एस.टी. महामंडळाने 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) प्रणाली लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यापुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे.**

ही केवळ तांत्रिक सुधारणा नसून, प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल आहे. सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहेत.या प्रकल्पासाठी महामंडळाने मे. ईबिक्स




टेक्नोलॉजिस लि. आणि पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला असून, लवकरच सर्व आगारांमध्ये नोंदणी मोहीम सुरू होणार आहे.

एस.टी.चा हा निर्णय म्हणजे परंपरागत प्रवास व्यवस्थेला डिजिटल स्पर्श देणारा टप्पा आहे. तिकीट हातात आणि सुट्या पैशांची चिंता या जुन्या गोष्टी आता इतिहासजमा होत आहेत. नव्या युगात, एका स्मार्ट कार्डच्या स्पर्शाने प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे असे एसटी महामंडळाने म्हटले आहे.

**कार्डची वैशिष्ट्ये; प्रवासात स्मार्ट सोय**

किंमत:नवीन कार्ड १९९ रुपये (सह).जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास १४९ रुपयांत उपलब्ध, वॉलेट मर्यादा: किमान १०० रुपये; ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज, रिचार्ज सुविधा:ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल ॲप किंवा नियुक्त एजंटकडून सहज रिचार्ज, नोंदणीसाठी व्यापक यंत्रणा:ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३००० हून अधिक अधिकृत एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

### कोणाला मिळणार कार्ड

**या नव्या योजनेत समाजातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे.**

* विद्यार्थी: शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या 'सरल' क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल.
* ज्येष्ठ नागरिक व महिला: अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल.
* दिव्यांग प्रवासी: क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड.
* पुरस्कारार्थी व पत्रकार: स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारा मार्फत वितरण.

# दहावी विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी निपाणी तहसिलदारांचा नवा उपक्रम

## रोज तीन तास मोबाईल-टीव्ही बंद; नऊ जणांची कमिटी

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

**मार्च महिन्यापासून १० वी परिक्षा होणार आहेत.त्यामुळे शाळांचा निकाल वाढण्यासह दहावी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी रोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत मोबाईल आणि टीव्ही बंद ठेवण्याचा आदेश निपाणीचे तहसीलदार सुरेश मुंजे यांनी काढला आहे.**

मुलांचे अभ्यासावर लक्ष केंद्रित व्हावे आणि त्यांच्या अभ्यासातील व्यत्यय कमी करण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात आले आहे.राज्यात निपाणीत पहिल्यांदाच तहसीलदार मुंजे यांनी असा अभिनव आदेश काढल्याने सर्व स्तरातून स्वागत होत आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

विशेष म्हणजे मोबाईल बंदच्या कडक अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत स्तरावर नऊ जणांची कमिटी करण्यात आली आहे. त्यात मुख्याध्यापकांसह पंचायत विकास अधिकारी (पीडीओ), बाल कल्याण अधिकारी (सीडीपीओ), बीआरसी, सीआरसी, आरोग्यअधिकारी, पोलिस कर्मचारी अशा ९ विविध खात्याच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. कमिटीमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आदेशाच्या अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवायचे आहे.त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन मोबाईल व टीव्ही बंद ठेवल्याची खात्री करायची आहे. आदेशाचा भंग झाल्यास त्यांना ताकीद द्यायची आहे.

आदेशाच्या अंमलबजावणीसाठी कमिटी करताना या कमिटीतील सदस्यांसह पालकांसाठी तहसीलदारांना विविध १३ सूचना केल्या आहेत. त्यात कमिटीने आठवड्यात एक बैठक घेऊन कार्याचा आढावा घ्यावा, अधून-मधून विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन आदेशाची अंमलबजावणी झाली की नाही याची खात्री करावी, आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पालकांचे प्रबोधन करावे, विद्यार्थ्यांसाठी चांगले शैक्षणिक वातावरण निर्माण करावे, अशा विविध सूचनांचा त्यात समावेश आहे.अभ्यासाच्या काळात मोबाईलचा अतिवापर टाळण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष केंद्रित करण्यासाठी स्थानिक पातळीवर हा आदेश काढला आहे. मोबाईलचा गैरवापर टाळावा यासाठीही मोबाईल वापराची मनाई उपयोगी ठरणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

## निपाणीत आजपासून साई यात्रा महोत्सव

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

**येथील साई शंकर नगरातील साई मंदिराची यात्रा आज शुक्रवार व शनिवारी आयोजित करण्यात आली आहे.**

शुक्रवारी पहाटे साईबाबांची काकडा आरती, सकाळी ६ वाजता साई मूर्तीस अभिषेक, महापूजा व आरती डॉ.अभिषेक माने व डॉ.प्रियांका माने यांच्या हस्ते, ९ ते ११ रुद्राभिषेक, ११ ते १२ साईबाबांचा पालखी सोहळा, दुपारी १२ वाजता माध्यान्ह आरती, त्यानंतर हळदी-कुंकू व हालसिद्धनाथ महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता अजित मेहता व सुवर्णा मेहता यांच्या हस्ते धुपारती व रात्री १० वाजता शेजारती होणार आहे.शनिवार ता.१४ रोजी पहाटे काकड आरती, सकाळी डॉ.ज्योतिबा चौगुले व डॉ.राजश्री चौगुले यांच्या हस्ते अभिषेक व महापूजा, ९ ते ११ पर्यंत साई स्तवन मंजिरीचे सामूहिक पारायण, ११ वाजता प्राणलिंग महास्वामींचे आशीर्वचन, १२ वाजता मध्यान्ह आरती,नंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. ३ वाजेपर्यंत शिवलिंगेश्वर शिव भजनी मंडळ नागराळ, साई महिला भजनी मंडळ, वीरभद्र महिला भजनी मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी अमृतानंद महाराज यांचे प्रवचन, भजन सेवा, सायंकाळी ६ वाजता सुभाष देसाई यांचे व्याख्यान, सायंकाळी ७ वाजता धुपारती, ७.३० वाजता होम मिनिस्टर कार्यक्रम व रात्री १० वाजता शेजारती होणार आहे. त्याचा साईभक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सद्गुरू साईनाथ विश्वस्त मंडळ व साई यात्रा कमिटीने केले आहे.



जिल्हा परिषदेच्या नुतन सदस्या श्रीमती शोभाताई फराकटे यांचा सत्कार करताना निढोरी गावचे सुर्यवंशी गटाचे सर्व कार्यकर्ते.

## निढोरीत शोभाताई फराकटे यांचा सत्कार

निढोरी,ता.१२(वार्ताहर)-

**बिद्री-बोरवडे जिल्हा परिषद मतदार संघात राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवार शोभाताई गणपती फराकटे यांना निढोरीतून ११९० मतांची आघाडी दिल्याचे बिद्रीचे संचालक व राष्ट्रवादी पक्षाचे नेते सुनिलराज सुर्यवंशी यांनी सांगितले.बोरवडे जिल्हा परिषदेच्या नूतन सदस्या श्रीमती फराकटे यांचा सत्कार करून ते बोलत होते.**

याप्रसंगी ज्येष्ठ नेते सुरेश सुर्यवंशी, मनिषा सुर्यवंशी, निढोरी सरपंच शुभांगी सुतार,उपसरपंच संपत मगदूम नाना, सामाजिक कार्यकर्ते रणजितसिंह सुर्यवंशी, निढोरी ग्रामपंचायत सदस्य गोटुआण्णा चितळे, सुधीर सुतार, सुनील भाकरे, पांडुरंग मगदूम, संपत ढेरे, विठ्ठल पाटील, राजु खेबुडे, गब्बर कळमकर व तरूण कार्यकर्ते उपस्थित होते.

## महिलांनी स्वतःला कमी लेखू नये-त्रिशला भागाजे

बारवाड,ता.१२(वार्ताहर)-

**आजच्या जगात महिला या सर्वच क्षेत्रात गरुड भरारी मारत असल्या तरी अजून काही महिला घाबरून पाठीमागेच राहत आहेत.पण आज समाज जरी पुरुषप्रधान असला तरी संसार हा स्त्रीप्रधान आहे.महिला या सर्वात भारी आहेत तेव्हा त्यांनी स्वतःला कमी लेखू नये,असे मत त्रिशला भागाजे कारदगा यांनी व्यक्त केले.**



कुन्नुरः येथे रोपाला पाणी घालून सुरुवात करताना त्रिशला भागाजे, रंगराव बन्ने.

कुन्नुर येथे श्रीशंभू महादेव देवस्थान व तावदारे परिवार यांच्यावतीने तावदारे वाड्यात महाशिवरात्री उत्सव आयोजित करण्यात आला असून या उत्सवाच्या निमित्ताने महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून हळदी कुंकू व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या हळदी कुंकू कार्यक्रमात निवेदन करताना भागाजे यांनी वरील मत व्यक्त केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार रंगराव बन्ने हे उपस्थित होते.प्रारंभी शंभू महादेवाचे दर्शन घेऊन तुळशीच्या रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.स्वागत प्रियांका तावदारे यांनी तर प्रास्ताविक राधिका तावदारे यांनी केले. यावेळी रंगराव बन्ने यांनीही मनोगत व्यक्त केले.स्पर्धेत यशस्वी झालेल्या महिलाना बक्षीस वितरण करण्यात आले.कविता आलुरे यांनी आभार मानले.

# विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही

## मुख्यमंत्री फडणवीस;फडणवीसांचे मुश्रीफ,घाटगेंनी मानले आभार

कागल,ता.१२(प्रतिनिधी)-

**कागल विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजप राष्ट्रवादी युतीच्या उमेदवारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्यासह विविध विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही,अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**



कागल तालुक्यात झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय जनता पक्षाच्या युतीने सहा जिल्हा परिषद व अकरा पंचायत समिती मतदारसंघांमध्ये घवघवीत विजय मिळवत इतिहास घडविला. या ऐतिहासिक यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानण्यासाठी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ व शाहू उद्योग समूहाचे अध्यक्ष राजे समरजितसिंह घाटगे यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची सदिच्छा भेट घेत आभार मानले.यावेळी ते बोलत होते.या भेटीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोघांचेही अभिनंदन करत कागल तालुक्यात युतीने मिळविलेल्या यशाचे विशेष कौतुक केले. कागल नगरपालिकेतील एकतर्फी विजयापाठोपाठ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतही भाजप राष्ट्रवादी युतीने आपले वर्चस्व सिद्ध केल्याचे त्यांनी नमूद केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून मंत्री हसन मुश्रीफ, शाहू उद्योग समूहाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे व माजी आमदार संजयबाबा घाटगे यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या युतीने कागल विधानसभा मतदारसंघात विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात केली आहे. या भेटीद्वारे कागल तालुक्यातील जनतेने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत पुढील काळात अधिक वेगाने विकासकामे राबविण्याचा संकल्प युतीच्या नेत्यांनी व्यक्त केला.

# मनरेगाची कामकाज प्रक्रिया ठप्प

निढोरी,ता.१२(वार्ताहर)-

**राज्यातील मनरेगा अंतर्गत कामकाज गेल्या १५ दिवसांपासून ठप्प असून यांचा परिणाम घरकुल लाभार्थी,मस्टर काढणे, विविध योजनामधील काम करणारे मजुर यांच्यावर होत आहे. सरकारने यापूर्वीच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजना मनरेगाचे नाव बदलून शाश्वत विकसीत भारत जीरामजी १२५ दिवस कामाची गॅरंटी असे नामकरण केले आहे.**



मात्र सध्या मनरेगाचे कामकाज पाहाणारे ऑपरेटर संपात सहभागी असल्यामुळे कामकाज प्रक्रिया ठप्प आहे. त्यामुळे विविध योजना मधील कामकाजाचे मस्टर निघाल्याशिवाय मजुरांना, लाभार्थ्यांना कोणताही लाभ घेता येणार नाही.प्रधानमंत्री आवास बांधकाम हप्ता वेळेत निघत नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुख्यमंत्र्यांनी ५० हजारांची घरकुल वाढीव रक्कम केलेली घोषणा हवेतच तरंगत असल्याने यास वर्षपूर्ती होत आहे. त्यामुळे दिड लाखात गरीबांचे घर पूर्णपणे होऊ शकत नाही हे खरे वास्तव असून लोकप्रतिनिधींनी या बाबतीत सखोल विचार करणे गरजेचे आहे.

**ऑपरेटर संपात सहभागी झाल्याचा परिणाम**

यपूर्वी या सरकारने ग्रामरोजगार सहायक यांना २४ ऑक्टोबर २०२४ मध्ये मानधनाचा प्रश्न जी.आर. पारीत करुन तो फिक्स आठ हजार प्रती महिना लागू करण्यात आला.परंतु,आज अखेर त्याची अंमलबजावणी झालेली नाही. सरकारचे हे भिजत घोंगडे आणखी किती दिवस राहणार आहे हे मात्र सांगणे फारच कठीण झाले आहे. वेळ मारुन नेणे एवढेच काम सरकारच्यावतीने होत असून विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार काय? असा प्रश्न सामान्य जनतेला पडलेला आहे.

# संस्थेने दूधापासून होणारे पदार्थ उत्पादन करण्यासाठी प्रयत्न करावेत

## वीरकुमार पाटील; हंचिनाळात ब्रह्मनाथ दूध संस्थेची निवडणूक बिनविरोध

कोगनोळी,ता.१२(प्रतिनिधी)-

**निवडणूक बिनविरोध झाल्याशिवाय संस्थेची प्रगती होत नाही. भविष्यात दूधापासून होणारे पदार्थ उत्पादन करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यावर अभ्यास करावा व संचालक मंडळाने तसा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन कर्नाटक राज्याचे माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील यांनी केले.**



हंचिनाळ के.एस. येथे ब्रम्हनाथ सोसायटीच्या कार्यक्रमात बोलताना वीरकुमार पाटील शेजारी दीपक पाटील व इतर मान्यवर.

हंचिनाळ के.एस (ता.निपाणी) येथील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या श्री ब्रह्मनाथ मल्टीपर्पज को.ऑप.सोसायटीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. त्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरुन ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अरुण पाटील, काकासो पंचम, रमेश पाटील, सागर पाटील व मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी अनिल कुरणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर निवडणूक अधिकारी म्हणून चिकोडी एआरसीएस विभागाचे जी.एस.लोकरे यांनी संस्थेची निवडणूक बिनविरोध झाली असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची घोषणा केली.

यावेळी दीपक रायगोंडा पाटील यांची चेअरमनपदी तर भिमगोंडा शिवगोंडा चौगुले यांची व्हा.चेअरमनपदी निवड करण्यात आली.नवनिर्वाचित संचालक मंडळामध्ये आप्पासो सदाशिव पाटील,विजय आदगोंडा कुरणे, जगदीश कलगोंडा पाटील, सचिन आप्पासो कोंडेकर, आनंदा कलगोंडा गायकवाड, सुनिल कलगोंडा पंचम, बाळासो अनंत सुतार, बाळासो रघुनाथ कांबळे, वैशाली बाळासो कोंडेकर, सुमन दत्तात्रय चौगुले यांचा समावेश आहे.याप्रसंगी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा वीरकुमार पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी अनिल कोंडेकर, विजय कुरणे, नवनाथ चौगुले, राहुल पंचम, आनंदा चौगुले-बीडी, दत्तात्रय पोवार यांच्यासह सभासद, दूध उत्पादक,सेवक वर्ग उपस्थित होते. दिनकर कोंडेकर यांनी आभार मानले.



निपाणीः अमर बागेवाडी यांच्या सत्कारप्रसंगी आम.गणेश हुक्केरी,लक्ष्मणराव चिंगळे,रोहण साळवे यांच्यासह इतर मान्यवर.

## निपाणीत अमर बागेवाडी यांचा सत्कार

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

**बेळगाव येथील के.एल.ई संस्थेच्या संचालकपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाल्याबद्दल अमर उर्फ (प्रवीण) बागेवाडी यांचा चिकोडीचे आम.गणेश हुक्केरी, बेळगाव बुडा अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे, काँग्रेसचे चिकोडी जिल्हा उपाध्यक्ष रोहण साळवे यांच्याकडून निपाणी येथे सत्कार करण्यात आला.**

सत्काराबद्दल बागेवाडी यांनी कृतज्ञता व्यक्त करून सर्वांच्या आशिर्वादाने माझी केएलई संस्थेच्या संचालकपदी दुसऱ्यांदा संधी मिळाली आहे.या संधीचे आपण निश्चितपणे सोने करू, असे सांगितले.

# निडसोसी रस्ता रुंदीकरणात तडजोड नको

**नागरिकांची मागणी**

संकेश्वर,ता.१२(प्रतिनिधी)-

**निडसोसी रस्ता रुंदीकरणात तडजोड नको.ठरल्यानुसार रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक असल्याचे निवेदन तहसीलदार बलराम कट्टीमनी यांना सादर करण्यात आले.**



संकेश्वरः तहसिलदारांना निवेदन देताना नागरीक.

यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष अमर नलवडे म्हणाले, पंचाचार्य शाळा ते रत्नशीला हॉटेल दरम्यान रस्ता रुंदीकरणाला सर्वांनी सहकार्य केले आहे.आता त्याच पद्धतीने रत्नशीला हॉटेल ते बसस्थानक दरम्यानचा रस्ता रुंदीकरण करण्यात यावा.मुस्लिम बांधवांनी रस्ता रुंदीकरण कार्याला सहकार्य करायला हवे असल्याचे त्यांनी सांगितले.

हुक्केरी विद्युत संघाचे संचालक गजानन क्वळी म्हणाले, मुस्लिम समाज बांधवांनी आता शब्द फिरविला आहे.पूर्वी त्यांनी संमती दर्शवली होती.आता विरोध करत असल्याचे सांगितले.हुक्केरी विद्युत संघाचे संचालक शिवानंद मुडशी म्हणाले, निडसोसी रस्ता भागातील लोकांना तसेच मुस्लिम समाज बांधव एकत्र बोलावून चर्चेतून मार्ग काढायला हवा असल्याचे सांगितले.यावेळी माजी नगराध्यक्ष श्रीकांत हतनुरी, रोहण नेसरी, बसवराज नागराळे, निडसोसी रस्ता भागातील लोक उपस्थित होते.

### रस्त्याचे मार्किंग कमी जास्त कसे ?

**पंचाचार्य शाळा ते रत्नशीला हॉटेल दरम्यानचा रस्ता योग्य प्रकारे रुंदीकरण करण्यात आला असून रस्ता ठेकेदाराने रत्नशीला हॉटेल ते बसस्थानक दरम्यानचा रस्ता तसाच न करता पुढे कमी रुंदीकरण करण्याचा घाट घालून मार्किंग केल्याने लोक रस्त्यावर उतरले आहेत.रस्ता ठेकेदार पुढील रस्ता चुकीच्या पद्धतीने करीत असल्याची तक्रार निवेदनाद्वारे दाखल करण्यात आली आहे.**

# निडसोसी रस्ता रुंदीकरणाला मुस्लिमांचा विरोध नाही

## अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

संकेश्वर,ता.१२(प्रतिनिधी)-

**निडसोसी रस्ता रुंदीकरणाला मुस्लिमांचा विरोध असल्याची अफवा मोबाईल मेसेजद्वारा पसरवली जात आहे, अशी अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाई करायला हवी असल्याचे मुस्लिम समाजाचे युवा नेते तबरेज हजरतभाई यांनी सांगितले.**

मुस्लिम जमात तंजिम कमिटीतर्फे तहसीलदार बलराम कट्टीमनी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.निवेदनात कबरीस्थान आवार भिंत सोडून रस्ता निडसोसी रस्ता रुंदीकरणाला कसलीच तक्रार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.यावेळी बोलताना संकेश्वर सुन्नत जमात तंजिम कमिटीचे अध्यक्ष हाजी दस्तगीर तेरणी म्हणाले, बेळगाव जिल्हा पालकमंत्री सतीश जारकीहोळी यांची भेट घेऊन निडसोसी रस्ता रुंदीकरणाविषयी चर्चा केली आहे.

निडसोसी रस्ता निर्माण वेळी संकेश्वर सुन्नत जमातने कबरीस्थानची ३६ गुंठे जमीन यापूर्वीच दिली आहे.रस्ता ठेकेदाराने योग्य मार्किंग करुन रस्ता रुंदीकरणाचे काम करत आहेत.त्याला आमचे सहकार्य आहे. मुस्लिम (समाज) जमात सर्व्हे नंबर २५८ मध्ये २ एकर ३८ गुंठे जमीन असून निडसोसी रस्ता निर्माण करताना जमातने ३६ गुंठे जमीन यापूर्वीच दिली आहे.आता कबरीस्थानची भिंत हटविण्यास सांगितले जात आहे.ते कदापी होऊ दिले जाणार नाही.रस्ता ठेकेदाराने योग्य मार्किंग करुन रस्ता रुंदीकरणाचे काम करण्यास सुरुवात केली आहे.त्याला आमचे संपूर्ण सहकार्य असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी नगरसेवक हारुण मुल्ला म्हणाले, सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्युडी) अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार रस्ता ठेकेदाराने रत्नशीला हॉटेल ते बसस्थानक दरम्यानचे मार्किंग केले आहे.त्यानुसार रस्त्याचे काम होणे आवश्यक असताना त्याला मुद्दाम विरोध केले जात आहे.कबरीस्तान आवार भिंत सोडून रस्ता रुंदीकरणाला आंमचे संपूर्ण सहकार्य असल्याचे सांगितले.यावेळी अकील नदाफ, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**चालू कंडिशन** बेंड सॉ मशिन विकणे आहे. संपर्क-७७४४०४३२०७.

**आपल्या घरी येवून** सोफा क्लिनिंग (शांपोईंग) करून देवू, जुने व नवीन बंगलो क्लिनिंग करून देवू. संपर्क-८९५५९७४१०७, ८६००४३५१३२.

**बंगला व शेड विकणेचे** आहे- 'गुरूभेट' कोल्हापूर रोड, व्यंकटेश्वरा शाळे मागे, पाटील मळा, कबनूर, इचलकरंजी. संपर्क-९४२०४५४२२२.

**मजले गावात सर्व** सोयीनियुक्त कलेक्टर एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क- ९९२२२४१५१३, ९४२३९७६७८८.

**एन.ए. प्लॉट विकणे-** कलेक्टर व तहसिल कबनूरमध्ये जयहिंदनगर, हॉटेल पॅराडाईज जवळ, गणेश मंदिर मागे, चंदूर रोड, शाहूनगरमध्ये. संपर्क- ८४४९९६५६९९, ९८१०२७४१७६.

**फ्लॅट विकणे आहे-** रहिवाशी (ऑफिससाठी उपयुक्त, मोहन मार्केट, २ रा मजला, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९८५०९६४८३२, ९८५००४९६००.

**गांधीनगरमधील** चालू स्थितीतील गारमेंट देणे आहे. ४६ मशिन्स, ६ प्रेस टेबल, कटींग टेबल, ३५ फॅन्स, १०० ट्युब, लिफ्ट इत्यादी. मो. ९०२१४६९८९८.

**यड्राव सनसिटी** अपार्टमेंटमध्ये ८५० स्के. फुट १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला. संपर्क- ७४११९४०८७०.

**२४ व १२ एकरजेट लूमचे** फक्त शेड विकणे/भाड्याने देणे. संपर्क-पार्वती इस्टेटमागे, यड्राव. ९७३००८६२४४. एजंटांनी संपर्क करू नये.

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशिन, डब्टींग घेऊ व देऊ. संपर्क- ८३७७२९१००८

**टाकवडे रोड,** गुरूकुल कॉलनी येथील गुंठेवारी झालेला रिकामा प्लॉट २००० स्के. फूट त्वरीत विकणे आहे. संपर्क-श्री. लोखंडे. मो. ९२७१५५१६७१

**अशोक लेलँड दोस्त** (LS) गाडी विकणे आहे. एकहाती वापरलेली, मॉडेल-२०१६, संपर्क-मोबाईल- ९५५२०२३८३८

**महासत्ता चौकमध्ये** १ बीएचके, २ बीएचके फ्लॅट व ऑफिससाठी बुकिंग सुरू आहे. स्वामी समर्थ मंदिरजवळ, पॅराडाईज कॉलनी, इचलकरंजी. ९३२५८३०५९२

**हातकणंगले जवळील** कुंभुगिरी मंदिरापासून फक्त पाचशे फूट अंतरावरती असणारा व रामलिंग डांबरी रोडटच २०० फुट फ्रंटेज असणारा ५ गुंठे, १० गुंठे, १५ गुंठे प्लॉट फार्मसाठी उपयुक्त असणारा विकणे आहे. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या नंबरवरती कॉल करा. ९३७०९४१५०५

### वधु-वर विषयक

**वधु पाहिजे-** प्रथम वर, वय ४० वधु घटस्फोटीत असेल तर चालेल. मो. ९६७३६९११९८.

### व्यवसाय विषयक

**कोणताही व्हेज/नॉनव्हेज** फूड बिझनेस करावयाचा विचारात असाल तर जागा, भांडवल, पूर्ण सेटअप आम्ही देवू. संपर्क- ७०२०१७८७५५

**रिकाम्या वेळेत** घरातून नवीन व्यवसाय सुरू करा व एक्स्ट्रा इन्कम मिळवा. ऑनलाईन किंवा ऑफलाईन मार्गदर्शन. सुरेखा मॅडम- फोन-९५५२००८१५६

### यात्राशहल

**४ मार्च-**दत्त परिक्रमा पिठापूर, कुरवपूर, मंत्रालय-१० दिवस, २२ मार्च-तुळजापूर, अक्कलकोट, वणी, माहूरगड, शेगाव-६ दिवस. कोजागिरी ट्रॅव्हल्स. ९४०३९५३४१२, ९४२०५९२५२४

### * नोकरी विषयक *

**कामगार पाहिजे-** दुकानात कामाला आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क- ९८५०३५९९५०, इचलकरंजी.

**अर्जंट कामगार पाहिजे-**रेडिमेड शोरूममध्ये अनुभवी, शिकाऊ पगार व कमिशन संपर्क- ८३२९९९२३४१.

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख कोर्सेस Graphic Design, Ms-Office, Tally Prime, Advance Excel कोर्सेसना प्रशिक्षण. ISO Certificate, नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर- पत्ता- इचलकरंजी बस स्टॅन्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्रासमोर. - संपर्क- ९८४२६४९८०

**गारमेंटमध्ये** शिलाई ऑपरेटर, काज - बटण ऑपरेटर, लेडीज हेल्पर पाहिजे. संपर्क- ७७२२०००६२०.

**पाहिजेत-**अपार्टमेंट साईटवर दोन सिव्हील इंजिनिअर पदे भरणेचे आहेत. अनुभवी कमीत कमी ३ ते ४ वर्षे. संपर्क- ७६४४४३३९९.

**हॉटेल नंदादिप परमिट** रूम बिअरबारमध्ये अनुभवी वेटर पाहिजे. पार्ट टाईम चालेल. आकर्षक पगार. संपर्क- ९९२१८९४८१४.

**नित्यधन फायनान्स** ऑफिस क्लार्कसाठी लेडीज पाहिजे. संगणक ज्ञान आवश्यक. पत्ता- बंडगर माळ, तीन बत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९६५०००६३६३.

**वाईन शॉपमध्ये** पार्ट टाईम/ फुल टाईम कामगार पाहिजे. वाईन सम्राट, रिक्रिएशन हॉलसमोर, इचलकरंजी. मो. ९१७५८९८५८६, २४३८२२२

**फिटर, वेल्डर,** हेल्पर पाहिजेत. संपर्क- नंदिनी इंडस्ट्रीज, शाहू पुतळ्याजवळ, इंडस्ट्रीयल स्टेट, इचलकरंजी. मो. ९९२२९८६३४४.

**अकौंटंट पाहिजे-** पार्वती इंडस्ट्रीज यड्राव येथे टॅलीचे ज्ञान असलेला अकौंटंट पाहिजे. संपर्क- ९२२६७८५२००.

**१२ वी, कॉम्प्युटरची माहिती** असलेले लेडीज किंवा जेंट्स पाहिजेत. व्हॉट्सॲपवर रिझ्युम टाकणे.भेटणे वेळ- १० ते ६. संपर्क- ९४२०७७६४६०.

**अनुभवी ब्युटी टेक्निशियन/** नर्सिंग पाहिजे. स्कीन क्लिनिकमध्ये नर्सिंगचा अनुभव असलेली महिला आवश्यक ब्युटी स्कीन केअर, फेशियल व इतर ब्युटी ट्रीटमेंटचे ज्ञान असणे आवश्यक. राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. मो. ८६६८७६३५२०.

**Urgently Required-** Survisor-3, Qualification 12 th or any graduate, Location- Ichalkaranji, Jaysingpur. Contact- 7090969802.

**पाहिजे-** साफसफाईसाठी हॉस्पिटलमध्ये मावशी व एक्स-रे टेक्निशियन पाहिजे. भेटण्याची वेळ- सकाळी ११ ते १. संपर्क- ९१४५५१००१३.

**उत्कृष्ठ घरगुती** स्वयंपाक करणेसाठी लेडीज पाहिजे. ८९८००३०६२८, ग्रामपंचायतच्यापुढे, मोबाईल,टॉवरजवळ, खोतवाडी.

**कामगार पाहिजेत-** इंजिनिअरींग फॅब्रिकेशन कामाचा अनुभव असलेले कामगार पाहिजेत. राज इंजि. वर्क्स, जवाहरनगर, ठाकरे चौक, इचलकरंजी. मो. ७०३०६१००८८, ९८८१६१००८८.

**बेकरीसाठी पार्ट टाईम** कौंटर मॅनेजर हवा आहे. किचनच्या कामात आवड असणे आवश्यक. वेळ- सायं. ५ ते १०. संपर्क- ९७६४४६४७५५.

**ऑपरेटर पाहिजेत-**रेडियम कटींग, लेजर कटींग, डिजीटल मशिन, राऊटर कटींग, संपर्क- ९९२३४६००६६.

**ऑफिस कामासाठी** अनुभवी कर्मचारी पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. पत्ता- खंजिरे इस्टेट, शहापूर,इचल. ८६००२६३३२७.

**पाहिजेत-**सेल्समन आणि Distribution डिलेव्हरीसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- नमन एंटरप्रायजेस, सांगली नाका, इचलकरंजी. मो. ८४४६३०५९४१.

**आयुर्वेदीक दवाखान्यात** विवाहित महिला कामगार पाहिजे. वयाची अट-१८ ते ३५. कामाची वेळ- ९ ते ५, पगार ७ ते ८ हजार + भत्ता. पत्ता- शाहू पुतळ्याजवळ, गुरूकूल ॲकॅडमीसमोर, इंडस्ट्रीयल इस्टेट, इचलकरंजी. मो. ७७२१९५४८१२

**शिरदवाड येथे** धान्य वाहतुकीच्या टेम्पोसाठी हमाली करणारा ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ९८१०६७५३८८, ९९७०६४७९२४.

**लहान मुलांच्या** दवाखान्यात रिशेप्सनिस्ट पाहिजे. संपर्क- यश क्लिनिक, बँक ऑफ बडोदासमोर, मेन रोड, गुजराथी मंदिर शेजारी, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत-** कापड दुकानात कामासाठी (आकर्षक पगार) संपर्क- पहल फॅशन्स निरामय हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी. मो. ९८६०३११४४८, ८३८०००६८६.

**इचलकरंजीतील** हॉटेलमध्ये लेडीज/जेंट्स रिसेप्शनिस्ट (कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक) वेटर, रूमबॉय व वॉचमन पाहिजेत. संपर्क- ९८२३९८६०९०, ९४२३८५९२५३.

**ऑफिस कामासाठी** व साईट व्हिजीटसाठी मुलगा पाहिजे. संपर्क- विक्रली मार्केट, इचलकरंजी. मो. ९५५२०७११५२७

**कॉम्प्युटर ऑपरेटर** पाहिजेत- जेंट्स, शिकाऊ/अनुभवी, आकर्षक पगार. संपर्क- उमिया हार्डवेअर, वखारभाग, इचलकरंजी. मो. ९९६०९१५९१९.

**फास्टफुड कॅफे** रेस्टॉरंटमध्ये स्टाफ भरती चालू आहे. (पार्ट टाईम- फुल टाईम) लेडीज जेंट्स, इचलकरंजी- सांगली मो. ७०२०२४५६७२.

**पाहिजे-** १) ऑफिस कामासाठी हुशार व अनुभवी कॉम्प्युटर अकौंटंट पाहिजे. (एक्सेलचे नॉलेज आवश्यक)- २ जागा. २) खंजिरे इंडस्ट्रीयल इस्टेट, येथील एअरजेट युनिटसाठी हुशार व अनुभवी डिस्पॅच दिवाणजी व हेल्पर पाहिजे. ३) डे शिफ्टसाठी सिक्युरिटी गार्ड पाहिजे-२ जागा. संपर्क- ९३२६००६५४३.

**कॉस्मेटिक होलसेल** दुकानासाठी शिकाऊ अनुभवी कामगार पाहिजेत. संपर्क- गायत्री डिस्ट्रीब्युटर्स, कोल्हापूर रोड, एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे.** अशोक लेलँड बडा दोस्त टेम्पोवर पुणे-बेंगलोर-चेन्नई लाईनसाठी टीआर लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-९८२२५३४४५३

**अशोक लेलँड** बडा दोस्त टेम्पो पॅकबॉडी मंथली बेसवर भाड्याने मिळेल. संपर्क-९८२२५३४४५३

**CNC ऑपरेटर पाहिजेत.** शिकाऊ व अनुभवी पार्टटाईम, लेडीज/जेंट्स संपर्क-जवाहरनगर, संजय फौंड्रीजवळ, इचलकरंजी. फोन- ९७६६२९३६२, ९५२७४९१७००

**टॅक्स कन्सलटंट** ऑफिसमध्ये कामासाठी अनुभवी मुली पाहिजेत. टॅली आणि कॉम्प्युटरची माहिती आवश्यक. संपर्क-८८५६९६६६७६

**शुध्द शाकाहारी हॉटेलमध्ये** चपाती व भाकरी करणेसाठी व भांडी कामासाठी लेडीज पाहिजेत. संपर्क- हॉटेल बसवेश्वर, शाहू कॉर्नर, इचलकरंजी. ९८८१९४७५०१८

**अर्जंट सिक्युरिटी भरती-** इचलकरंजी, जयसिंगपूर, चिपरी, हातकणंगले, कुंभोज, नांदणी येथे आकर्षक पगार. संपर्क- ७०२०१९७१९०, ८२०८५११९९८८

**डॉमिनोज पिझ्झा-** कामगार पाहिजे. डिलेव्हरी बॉय, आकर्षक पगार, पार्ट टाईम, फूलटाईम संपर्क- ९५२९२१५७४०, ७८४१०५४१०८

**पाहिजे.** फौंड्रीमध्ये सबकॉन्ट्रॅक्टर कास्टींग फॉलोअपसाठी-१ जागा, टॅलीचे ज्ञान आवश्यक. संपर्क- ९९२२८१०३४९

**पाहिजेत.** फॅब्रिकेशन वेल्डर, फिटर, शिकाऊ वेल्डर, आयटीआय प्राधान्य. Orgon/ CO2 शिकण्याची संधी. ईएसआयसी आणि पीएफ सह आकर्षक पगार. Shree Hospital Equipment Shahapur, Ich. Contact-9028521710, 8380001705

**वाईन शॉपमध्ये** कॉम्प्युटर बिलिंगसाठी मुलगा पाहिजे. संपर्क- सागर वाईन्स. ७०२०१८२४२७

**पाहिजेत.** असिस्टंट टॅली अकौंटंट लेडीज (बी.कॉम) वय-३० पेक्षा जास्त, बँक ऑफिस, सेल्स असिस्टंट लेडीज (कोणतीही ग्रॅज्युएट) वय ३० पेक्षा जास्त-१, कार ड्रायव्हर. संपर्क- श्री. हॉस्पिटल इक्वीपमेंट, शहापूर-इचलकरंजी. फोन- ९०२८५२१७१०, ८३८०००१७०२

**पाहिजे.** ऑफिस कामासाठी लेडीज पाहिजे. पत्ता- बालाजी मोटार ट्रेनिंग स्कूलजवळ, मेन रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळाशेजारी, इचलकरंजी. संपर्क- ८४८९७७१७५१

**अनुभवी CNC** ऑपरेटर व प्रोग्रॅमर आणि अनुभवी टर्नर पाहिजेत. संपर्क-८८८८९७७००५, ९२२५८०६९६४

**मॅनेजर पाहिजे.** सिमेंट पाईप कंपनीमध्ये शिकाऊ/अनुभवी मॅनेजर पाहिजे व वाळू डेपोमध्ये कामगार पाहिजेत. संपर्क- ९८१०५१२०३८

**शोरूममध्ये** रिशेप्शनिस्ट कामाचा अनुभव असलेल्या महिला, युवती सेल्सगर्ल कामासाठी पाहिजेत. मराठी, हिंदी भाषा येणे आवश्यक. संपर्क-८८८८३३१९३, यड्राव फाटा, इचलकरंजी.

**पतसंस्थेमध्ये** कॉम्प्युटर ज्ञान असलेली लेडीज पाहिजे. संपर्क- ९२७०५०४९६१, ८३२९४१३०४४

**सॅमसंग मोबाईलसाठी** सेल्स एक्झीक्युटिव्ह नेमणे आहेत. नोकरीची उत्तम संधी, शिक्षण-१२ वी, किंवा ग्रॅज्युएट, इचलकरंजी, मलकापूर, बांबवडे, पेठवडगाव, हुपरी, कागल या ठिकाणी.संपर्क- ८५५२९६१२१३, ८२७५६४४९६१

**अर्जंट पाहिजेत.** शहापूर येथे CNC मशिन शॉपमध्ये खालील पदे त्वरीत भरणे आहे. १) हेल्पर- (पुरूष/ महिला)-०२. २) ऑपरेटर (अनुभव आवश्यक)-०४. (डिप्लोमा/ आयटीआय). ३) क्वॉलिटी इंजिनिअर-०१. (अनुभव किमान ३ वर्षे) संपर्क-८८५६९४६९४, ९१४५०४४१६५

**डॉ. राजेश चिप्रे** सहयोग हॉस्पिटलमध्ये अनुभवी सिस्टर (नर्स) जीएनएम, एएनएम पाहिजेत. जिम्नॅशियम मैदानजवळ, इचलकरंजी. ७०२०४८८२१३

**इचलकरंजीसाठी** सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. ड्युटी ८ तास, पेमेंट ९०००/-. संपर्क-७०३०५८३३३३, ८७८८८२९८३

**सहारा वाईन शॉप** जयसिंगपूर येथे कामगार पाहिजे. कामाची वेळ- ११.३० ते ९.३०. संपर्क- ९४२२०४९२३६, ८८८८७२८८३३

**शहापूरमध्ये** क्लासेस व ॲकॅडमीसाठी D.ed, B.ed शिक्षिका पाहिजेत. संपर्क- ९६२३१००४४७, ७८११९२५४२९१

**अजंठा युनिव्हर्सल** फॅब्रिक्स लिमिटेड तासवडे एमआयडीसी कराड यामध्ये कंपनी रोल वरती कायमस्वरूपी स्पिनिंग, विविंग व डाईंग (जिगर, सी पी.बी, स्टेन्टर) या मशिनवर काम केलेले अनुभवी ऑपरेटर भरणे आहेत. उत्तम पगार व पीएफ, एसआयसी, कॅन्टीन सुविधा मिळेल. कराड व कराड भागातील लोकांना प्राधान्य. मो. ९७६३४९१५६४, ८४२९९१६८२४

**लेथ मशिनवर** फूलटाईम व पार्ट टाईमसाठी टर्नर पाहिजे. संपर्क- ९३७०८४३३४५

**ज्वेलरी शॉपमध्ये** सेल्समन लेडीज/ जेंटस पाहिजे. संपर्क- ७६२००६६२२

**टर्नर, वेल्डर व हेल्पर** पाहिजेत. संपर्क- श्री सिध्देश्वर इंजिनिअरींग वर्क्स, इचलकरंजी. ९४२३६००९१, ७३८७४५७४९०

**२ व्हीलर पार्किंगसाठी** कामगार पाहिजे. दिवसपाळी व रात्रपाळीसाठी. संपर्क- ८३७७४४४४४४

**स्टोअर क्लार्क पाहिजे.** राजगोपाल बिडला टेक्स प्रा.लि., यड्राव येथे स्टोअरसाठी कॉम्प्युटरची माहिती असणारा स्टोअर क्लार्क पाहिजे. भेटण्याची वेळ- संध्या. ५ ते ७. पत्ता- १२/६९३, राजाराम रोड, इचलकरंजी. फोन-(०२३०) २४३३६३९

**स्क्रिन प्रिंटींगमध्ये** लेडीज कामगार पाहिजेत. संपर्क- एस.एम. प्रिंटींग, जवाहरनगर, विघ्नहर्ता गणेश मंदिरजवळ, इचलकरंजी. ८८०८६९३१६

**मोबाईल दुकानात** सेल्समन पाहिजे. संपर्क-९५१८५४४०३३

**पाहिजेत.** १० वी/१२ वी आयटीआय, गॅस गिझर, सोलर, शेगडी, किचन चिमणी फिटींग व मेंटेनन्ससाठी, आकर्षक पगार, भत्ता व पेट्रोल. संपर्क-आशिर्वाद सेल्स ॲंड सर्व्हीसेस, वंदे मातरम मैदानजवळ, इचलकरंजी. फोन- ०९४२३०४१०९८

**कॉम्प्युटर अकौंटंट पाहिजे.** ऑफिस कामासाठी हुशार, लेडीज/जेन्टस. संपर्क-इचलकरंजी हार्डवेअर, मेनरोड, मो. ९५५२०१५८५८

**पाहिजेत.** शेअरमार्केट ऑफिसमध्ये ट्रेडिंगसाठी लेडीज पाहिजे. शेअरमार्केटची आवड. पगार+ कमिशन. संपर्क-९४२३२७३९२४

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी ८ तास, दुपारी ३ ते रा. ११. कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. फोन-८३२९०२७१४४

**मिलस्टोअर्स दुकानात** अनुभवी/ शिकाऊ कामगार पाहिजे आहे. नारायण पेठ, इचलकरंजी. संपर्क- ९७६२२६९९३, ९४२२०४३०४३

**नामांकित कंपनीत** महिला व पुरूष कामगार पाहिजेत. (९ ते ७). संपर्क- नाईट कॉलेजशेजारी, इचलकरंजी. फोन-९५६१८३६२९६, ९११२७७७३७२

**गारमेंट कंपनीमध्ये** लेडीज हेल्पर, जेंटस हेल्पर QC पॅकिंग इन्चार्ज पाहिजेत. पत्ता- थोरात चौक व किसान चौक. संपर्क- ८३२९०५४७२५

**होलसेल किराणा दुकानात** कामगार पाहिजेत. व बिलींगसाठी लेडीज/जेंटस पाहिजेत. संपर्क- संस्कार ट्रेडर्स-९८६०८७५५५८, ९७७५२३४६५१

**कंस्ट्रक्शन साईटवर** रहाणेसाठी जोडपे/वॉचमन पाहिजेत. रहाणेची सोय, कामाचे ठिकाण-हातकणंगले, रामलिंग रोड, वृंदावन पार्क. संपर्क-७७४४०४३२०७

**अनुभवी-रिसेप्शनिस्ट पाहिजे.** स्किन क्लिनिकमध्ये टेलि कम्युनिकेशन आणि कॉम्प्युटरचे अनुभव असलेली महिला आवश्यक आहे. राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. फोन-८६६८७६३५२०

**अकौंटंट पाहिजे.** फूलटाईम लेडीज पाहिजे. संपर्क-७७७५००१५११. श्री. बिल्डींग, मेघदूत हॉटेलजवळ, इचलकरंजी.

**पाहिजेत. सिव्हील ड्राफ्टमन,** D.C.E., B.E. Civil इंजिनिअर, ऑर्कीटेक्ट असिस्टंट अर्जासह भेटा. (सायं. ५ ते ७) संपर्क- सुहास अकिवाटे ॲन्ड असोसिएटस गिरनार अपार्टमेंट, जुन्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी. ०२३०-२४२४४११, मो. ७८७५३४६२०३

**पिझ्झा शॉपमध्ये** फूलटाईम/पार्ट टाईम कामासाठी शिकाऊ/अनुभवी मुले, मुली पाहिजेत. पत्ता- इचलकरंजी. फोन-९८२२५८०५६६, ८९९९५०८९३८

**त्वरीत पाहिजेत.** सिक्युरिटी गार्डस इचलकरंजी, खंजिरे, शहापूर, बोरगांव, चंदूर, शिवनाकवाडी, यड्राव, हातकणंगले, कोरोची येथील कंपन्याकरिता पीएफ व ईएसआयसी सोय. मो. ९९७०३९५१०६, ९७५७७६०८७७

**जयसिंगपूर येथील** टेक्स्टाईल प्रोसेसमधील तयार गुडस पाठवणे. पॅकिंग स्लिप, गेटपास तयार करणे या कामासाठी अनुभवी किंवा शिकाऊ स्टाफ भरणे आहे. जागा- ४. बेसिक कॉम्प्युटर नॉलेज हवे. ७७६८००८६०१

**झेरॉक्स सेंटरमध्ये** लेडीज पाहिजे. संपर्क-८३०८४७११५५, इचलकरंजी.

**अकौंटींग कामाचा** अनुभव असणारी जेन्टस/लेडीज अकौंटंट पाहिजे. अर्जासह भेटा. पत्ता- श्री धनलक्ष्मी सायझर्स, गणेशनगर, गल्ली नं.६, इचलकरंजी.

**ऑफिसमध्ये** कॉम्प्युटर ऑपरेटर या पदासाठी पदवीधर महिला व पुरूष उमेदवार पाहिजेत. अनुभवींस प्राधान्य. संपर्क-८८८८५४२२०

**होलसेल किराणा दुकानामध्ये** कॉम्प्युटरवर बिलींगसाठी पूर्णवेळ २ जेंट्स पाहिजेत. शिक्षण- किमान १२ वी विवाहीत प्राधान्य व गोडावूनसाठी १ दिवाणजी पाहिजे. संपर्क-९७६७०३०१२६

**बिल्डींग मटेरियल सप्लायर** शोरूममध्ये जेंट्स/लेडीज कामगार पाहिजेत. संपर्क-शहापूर- ९५०४११११७१

**CNC, VMC, HMC अनुभवी** व फ्रेश ऑपरेटर पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. स्वस्तिक ग्रुप, पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव. ८६६८६१०८६०

**पाहिजेत.** लूट लो दुकानात कॅशियर पगार- १० ते १३ हजार, हेल्पर पगार-७५००. कामाची वेळ-११ ते ९. संपर्क-७३५०११२०००

**१२ वी शिकलेली** व कॉम्प्युटरची माहिती असलेली लेडीज पाहिजे. संपर्क-वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर, रॉवका सदन, इचलकरंजी.

**गोडावून कामासाठी** हेल्पर पाहिजे. संपर्क- वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर, रॉवका सदन, इचलकरंजी.

**रंगाटे ग्लास कंपनीमध्ये** आयटीआय फिटर पाहिजेत. ४-५ वर्षे अनुभवी. पत्ता- रंगाटे ग्लास, योगाश्रम मंदिरसमोर, शहापूर-इचलकरंजी. फोन-७३८५७६९४८६

**रंगाटे ग्लास कंपनीमध्ये** इलेक्ट्रीशियन पाहिजेत. ४-५ वर्षे अनुभवी. पत्ता- योगाश्रम मंदिरसमोर, शहापूर-इचलकरंजी. फोन-७३८५७६९४८६

**रंगाटे ग्लास कंपनीमध्ये** पुरूष कामगार पाहिजेत. ४-५ वर्षे अनुभवी. पत्ता- योगाश्रम मंदिरसमोर, शहापूर-इचलकरंजी. फोन-७३८५७६९४८६

**प्लेन धोतीवर** (डॉबी नाही, नक्षी नाही) पॉवरलूम चालविणेस कामगार पाहिजे. संपर्क-७२४९२१४६२३, कलानगर, किसान चौक, इचलकरंजी.

**जेंटस कामगार पाहिजे.** वय ३२ पर्यंत, २ व्हीलर आवश्यक. संपर्क- ९६३१३९६०३०

**फिल्ड टेक्निशियन पाहिजे.** बांधकाम क्षेत्रामधील अनुभवी मुले पाहिजेत. १२ वी पास, कागल एमआयडीसी येथे. संपर्क- ९५७९५५३२९६

**टेक्स्टाईल ऑफिसमध्ये** ऑफिसबॉय कम हेल्पर पाहिजे. अर्जासह समक्ष भेटा. किस्मत टेक्स्टाईल, शाहू पुतळ्याजवळ, आदर्श मंगल कार्यालयशेजारी, इचलकरंजी.

**पाहिजेत-** हॉस्पिटलमध्ये कामासाठी रिशेप्सनिस्ट, २ मावशी, २ जीएनएम नर्सिंग स्टाफ हवा आहे. बडबडे हॉस्पिटल, इचलकरंजी. मो. ८२६२९२७६९२.

**झोले बाजार कबनूरमध्ये** नोकरीची संधी! अनुभवी सेल्स स्टाफ आणि मॅनेजर हवेत. संपर्क- ९५५२९२२३४५, ८६८६१२२३४५

**टर्नर, वेल्डर,** शिकाऊ कामगार पाहिजेत. कुबेर वेल्डींग आणि इंजिनिअरींग वर्क्स, गणेशनगर, गल्ली नं. ८, इचल. संपर्क- ८४८५८११४२४

**होलसेल औषध दुकानात** १० वी, १२ वी झालेले मुले/मुली व डिलेव्हरीसाठी मुले पाहिजेत. सुशिल फार्मा LLP नाईट कॉलेजजवळ, इचल. ९०९६२६१२७२

### आरोग्य विषयक

**मुळव्याध, भगेंद्र,** फिशर वेळीच बरा न झाल्यास मुदाशयाची कॅन्सर होऊ शकतो, खात्रीचा आयुर्वेदिक उपचार उपलब्ध. आरोग्यम्- ७५१७३११६००

**सोरायसीस** तसेच इतर सर्व त्वचाविकार फंगस, खाज, वांगसाठी खात्रीचा शुद्ध आयुर्वेदिक उपचार. आरोग्यम्-७५१७३११६००

**पॅरालिसीस अर्धांगवायू,** लकवा, हस्तकंपासाठी अत्यंत गुणकारी मासिक ३७५० रु. चा एक डोस विनामूल्य आरोग्यम्, हत्ती चौक. ७५१७३१८०००

**पोटाच्या सर्व तक्रारी** पित्ताशयातील खडा खात्रीचा शुध्द आयुर्वेदिक उपचार उपलब्ध. आरोग्यम्, हत्ती चौक. ७५१७३१८०००, ७५१७३११६००

**मान, पाठ,** कंबर, गुडघे सर्व सांधेदुखीसाठी अत्यंत प्रभावी आयुर्वेदिक उपचार उपलब्ध. आरोग्यम्, हत्ती चौक. ७५१७३१८०००

### बोअरवेल विषयक

**चौगुले बोअरवेल-** ४३ वर्षाची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४॥। व ६॥ इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क-डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅन्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१६८८४

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४॥। इंची व ६॥ इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची काम माफक दरात करून मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**चौगुले बोअरवेल्स-** जयसिंगपूर आमचेकडे घरासाठी ४॥। इंची व शेतीसाठी ६॥ इंची बोअर मारून मिळेल. संपर्क-९६६०१०५४२१

### * भाड्याने देणे/घेणे *

**भाड्याने देणे आहे.** श्रीराम चौक, गल्ली नं. २, संगमनगरमध्ये १ रूम किचन अटॅच संडास बाथरूम, २४ तास पाणी, सर्व सोयींनी युक्त भाड्याने देणे आहे. तसेच १०X१० चे २ गाळे व २०X३० आरसीसी शेड देणे आहे. संपर्क- ९०२८४३३४१५, ९९६०१९५२०४

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे. सांगली नाका, पारीजात हौसिंग सोसायटी, इचलकरंजी. मो. ८०८७२२६८०२.

**२ बीएचके फ्लॅटस,** ३९० स्के. फुटाचे २ दुकान गाळे, ६५० स्के. फुट हॉल भाड्याने देणे आहे. पत्ता- जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ८७९३८७८७९७, ९९२३४९३११.

**शहापूर नवीन** पोलिस स्टेशन लगत १ बीएचके स्वतंत्र सर्व सोयीनियुक्त छोटी सुशिक्षित फॅमिलीकरीता भाड्याने देणे आहे. संपर्क- फिरोज भाई- ९३२६९१३७०१.

**सर्व सोयीनियुक्त** १ आर.के. फ्लॅट भाड्याने देणे आहे. ए.एस.सी. कॉलेजजवळ, इचल. ९६५७७९९७७७, ८३७८९९१७११

**१ बीएचके सर्व** सोयीनियुक्त भाड्याने देणे. स्टेशन रोड, माणिक हार्डवेअर पाठी मागे, गणेश बाबू डेपोजवळ. मो. ८८०१५१८५१८६, ९७३०३९९८८४.

**सर्व सोयीनियुक्त** जागा हॉस्पिटल, ऑफिससाठी भाड्याने देणे के.पी. कॉम्प्लेक्स, राणी बागेजवळ, इचलकरंजी. मो. ९४२२०४३६७६, ८८५५८९३९९.

**राज कॅसल हॉटेल** पाठी मागे १ बीएचके व स्वतंत्र २ रूम सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क- ८८०५२३३२४३.

**फ्लॅट भाड्याने देणे-** १ बीएचके/४ बीएचके सर्व सोयीनियुक्त ऑफिससाठी/ रहाणेसाठी. साखरपे हॉस्पिटल शेजारी, इचलकरंजी. मो. ९०७५४०४८४८.

**५ गुंठे, १० गुंठे,**१ एकर, २ एकर, ३ एकर कोणत्याही उद्योगासाठी रोडटच जागा भाड्याने देणे. पाणी लाईटसह. संपर्क- ९४२२६२०२८५, ८३७०६७१७५९.

**गाळा भाड्याने देणे-** १८० स्के. फुटाचा साखरपे हॉस्पिटलसमोर, डंबाळ गल्लीमध्ये, गजानन मंगल कार्यालयाजवळ. संपर्क- ९४२२४२४५९५.

**जागा डेव्हलपसाठी देणे** सांगली रोडपासून जवळ राधाकृष्ण मंदिरपासून जवळ, मराठा चौकमध्ये ५४०० कलेक्टर एन.ए. प्लॉट १०० फुटी रोडलगत. संपर्क- ९४२२४२४५९५.

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने/गहाणवट देणे. २४ तास पाणी पहिला मजला, विठ्ठल मंदिरजवळ, शिवाजी चौक, तारदाळ. संपर्क- ९६३७०७८७३१५, ९९२२९८६३२८.

**भाड्याने देणे-**१ आर.के फ्लॅट शाहूनगर, गल्ली नं. ८, चंदूर. मो. ९३५६५४५०१५.

**भाड्याने देणे.** ५६ इंची ५६ मागासह सर्व सोयीनियुक्त शेड कबनूर, दत्तनगर गल्ली नं. १२ येथे भाड्याने देणे. संपर्क-९५९५२४४२४०

**भाड्याने देणे.** आरसीसी रूम सिंगल/डबल सर्व सोयीनियुक्त छोट्या कुटूंबासाठी पहिला मजला, गुरूकृपा रेसिडेन्स, नदीरोड, इचलकरंजी. भोसले- ९५९८५४३६९५

**एएससी कॉलेजजवळ** गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क- ९१३०००२७६६

**सर्व सोयीनियुक्त** १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. संपर्क- ९४२३०४११६५, व्यंकटेशनगर, डेक्कन समोर, इचलकरंजी.

**२००० स्के. फूट शेड** गोडाउन, कोणत्याही व्यवसायासाठी भाड्याने देणे. लक्ष्मी मंदिरासमोर, वैरण बाजारजवळ, इचलकरंजी. फोन- ९०९६९४८००१

**दुकानगाळा भाड्याने देणे.** रोडटच शाहू पुतळा, कोल्हापूर रोड, सोन्या मारूती मंदिरसमोर, इचलकरंजी. ८८५५८४६१६२, ९३७२४५८७१७

**स्टेशन रोड,** दत्त मंदिरसमोर ३०X३० चे शेड भाड्याने देणे आहे. संपर्क-८१४९९९३००८

**ऑफिस, गोडावून,** गारमेंट, क्लासकरिता २०० ते ३०० स्के. फूट गाळा भाड्याने देणे. खंजिरे मळा, सरस्वती मार्केटजवळ. संपर्क-७४९८५२२८६५

**१ बीएचके व गोडावून** (१००० स्के. फूट) भाड्याने किंवा गहाणवट देणे. नारायण मळा रोड, रूगे मळा, संपर्क-९७६२३७२६२५

**भाड्याने देणे.** ११०० स्के. फूट रोडटच १९ एचपी लाईटसह CNC, VMC गारमेंट गोडाऊनसाठी भाड्याने देणे. डी-मार्टजवळ. ७०५७५२६९९, ९८२२१११२९०

**दोन रूम तीन रूम** भाड्याने देणे. पॉश कॉलनीत शुद्ध शाकाहारी लहान कुटूंब, अयोध्या कॉलनी, पंचवटी पाठीमागे. ७५८८२६३२०१

**दुकानगाळा भाड्याने देणे.** सर्व सोयीनियुक्त १४ x २० उंची १४ फूट पोटमाळासह सांगली रोड, अभय डेअरीसमोर, इचलकरंजी. श्री महेश रणदिवे-९३७३०३०१५४, ९०९६७११०६९

**२ रूम व ३ रूमचे** आरसीसी घर सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. (फक्त शाकाहारींसाठी) एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी. संपर्क- ७६२००६२६२२

**गांधी कॅम्पमध्ये** ४०० स्के. फूट गाळा ग्राऊंड फ्लोअर भाड्याने देणे. संपर्क-७८११९४०८७०, इचलकरंजी.

**२४ मागासहीत** ४६ मागाची शेड सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहेत. संपर्क-९१३०००२७६६, इचलकरंजी.

**भाड्याने देणे आहे.** मेन रोडलगत दुकानगाळा किंवा राहण्यासाठी सर्व सोयीनियुक्त ५५० स्के. फूट डेक्कन प्रोसेससमोर, गणेशनगर, संपर्क- ९८२२२३८६९

**गाळा भाड्याने देणे आहे-** संपर्क- ९८२३३७४४७७, कॉंग्रेस कमिटी मागे, कुंभार हॉस्पिटलला लागून, इचलकरंजी.

**साखरपे हॉस्पिटलजवळ,** सातपुते गल्लीमध्ये १०X२० चा गाळा पिढी, ऑफिस, गोडावूनसाठी भाड्याने देणे आहे. ८१४९९१३०८८

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. पत्ता- सोलगे मळा, उदगावे हायस्कूलजवळ, सांगली नाका, संपर्क- ९८२२६२१३०२

**गोडाऊन भाड्याने देणे.** १५७० स्के. फूट पोटमाळा, ऑफिस, संडास बाथरूमसह सर्व सोयीनियुक्त, तीनबत्ती चौक, इचलकरंजी. फोन- ८६६५११०९९१

**शेड भाड्याने देणे-** ३६X३८ पूर्ण आरसीसी गारमेंट, लेथमशिन, वायडिंग मशिन इ. साठी संतमळा, लिंबू चौक, इचलकरंजी. फोन- ९६०७२९२१४५

### इतर

**खुशखबर-** आपल्या इचलकरंजी, कबनूरमध्ये सुरू झालेली ओशन फिश कंपनी आपल्यासाठी घेवून येत आहे. समुद्रातील तसेच गोड्या पाण्यातील ताज्या माश्यांचा खजाना थेट आपल्या ताटात नव्याने सुरू झालेल्या आपल्या कंपनीत भरपूर ऑफर चा सुध्दा लाभ घेता येईल. तरी मासे प्रेमींनो लवकर धाव घ्या. आपल्या ओशन फिश कंपनीकडे... आजरा बँकेच्या बाजूला, कोल्हापूर रोड, इचलकरंजी, कबनूर. संपर्क- मंदार अभ्यंकर-९७६५२९२४९८, संतोष पोवार-९९७०३९९७४५.

**आपला जुना सोफा** बनवा नव्या सारखा आमचेकडे योग्य दरात सोफा क्लिन करून दिला जाईल. मो. ९५११७१०००१.

**ढेकूण, पाल, मुंग्या,** वाळवी, झुरळांसाठी वस्तू न काढता हर्बल जेल १००% गॅरंटी प्रतिरूम ५४९/- संपर्क-९४२१६४६३५२, ७०२०९७४६४८

### कर्जविषयक

**असेसमेंट उतारा** व घरफाळा पावतीवर विनातारण कर्ज ५ लाखांपर्यंत मिळेल. (होम लोन मिळेल.) संपर्क- ९१४५७५३८१०.

**बिझनेस, होमलोन,** लोन अगेन्स प्रॉपर्टी टेकओव्हर सर्व प्रकारचे मॉर्गेज, सिबील कमी असेल तरी करू. ८४०८८३७७५२

### छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद

## नांगनूर-संकेश्वर मार्ग महिनाभर बंद राहणार

**संकेश्वर दि १२ (प्रतिनिधी)-** नांगनूर ते संकेश्वर रस्ता कॉंक्रिटीकरण केला जाणार असल्याने महिनाभर नांगनूर,खणदाळ,आरळगुंडी, कडलगे,इदरगुची, बसर्गे, हलकर्णी, नूल व संकेश्वर वाहतूक सेवा बंद राहणार आहे.नांगनूर ते संकेश्वर (श्री शंकरलिंग मठाकडे जाणारा) नांगनूर मार्गे नदीगल्ली संकेश्वर कडे जाणारा बंधाऱ्यापर्यंतचा रस्ता कॉंक्रिटीकरण करण्यात येणार असल्याने शनिवार दि.१४ फेब्रुवारी ते शनिवार दि.१४ मार्चपर्यंत सदर रस्त्यावरील वाहतूक सेवा पुर्णतः बंद केली जाणार आहे.

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# अध्यक्षपद देईल त्यांच्यासोबत जाणार

## अजित पवार गटाचा निर्णय : प्रस्ताव प्रदेशाध्यक्षांकडे पाठवणार

सांगली, ता.१२(प्रतिनिधी)–

**जिल्हा परिषदेच्या सत्तेचा पेच कायम असून दिवसेंदिवस राजकीय हालचाली वाढल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट ) ला अध्यक्षपद हवे आहे. महाविकास आघाडी अथवा महायुती यापैकी कोणी अध्यक्षपद देईल, त्यांच्यासोबत जाण्याबाबतचा निर्णय जिल्ह्यातील नेत्यांच्या बैठकीत झाला. अध्यक्षपदाच्या दावेदारीबाबतचा प्रस्ताव राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांकडे पाठविला जाणार आहे. अंतिम निर्णय वरिष्ट पातळीवर होईल, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून सांगण्यात आले.**

जिल्हा परिषदेच्या निकालानंतर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची बैठक जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील, माजी खास. संजय पाटील, माजी आम.अजितराव घोरपडे, माजी आम. विलासराव जगताप, माजी आम. राजेंद्रअण्णा देशमुख, जि. प. माजी सभापती तम्मनगौडा रवि-पाटील, अनिल पाटील यांच्या उपस्थितीत झाली

जिल्हा परिषदेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने सत्ता स्थापन करण्याबाबत सर्व राजकीय पक्षांनी प्रयत्न सुरु केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे सहा जिल्हा परिषद सदस्य निवडून आले आहेत. मिनी मंत्रालयाच्या सत्तेमध्ये पक्षाने कोणती भूमिका घ्यायची याबाबत चर्चा करण्यासाठी बैठक झाली. महाविकास आघाडीकडे ३० सदस्यांचे बलाबल आहे. त्यांना सत्तेसाठी अवघ्या एका जागेची गरज आहे. भाजपला सत्तेसाठी राष्ट्रवादीसह शिवसेनेला सोबत घ्यावे लागेल.

सत्तेची समीकरणे आणि पक्षीय बलाबल यांची तुलना केल्यास राष्ट्रवादी काँग्रेसला सद्यस्थितीत महत्वाचे स्थान आहे. भाजपाकडून सत्तेत सामील होण्याबाबत चर्चा करण्यात येत असली तरी काही नेते आघाडीसोबत जाण्यास अनुकुल आहेत. बैठकीत महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही पक्षांबाबत चर्चा झाली.सत्तेमध्ये सामील होण्यापूर्वी अध्यक्षपदाची दावेदारी सांगण्यात आली. भाजप किंवा काँग्रेस-शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून अध्यक्षपद देईल, त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय नेत्यांनी सर्वानुमते घेतला. याबाबतचा अध्यक्षपदाच्या दावेदारीचा प्रस्ताव प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्याकडे दोन दिवसात पाठविला जाणार आहे. त्यानंतर वरिष्ट पातळीवर पाठींबा देण्याबाबतचा निर्णय होईल.

# पोलिस भरतीत दुसऱ्या दिवशी ८९५ उमेदवारांची मैदानी चाचणी

सांगली, ता. १२(प्रतिनिधी)–

**जिल्हा पोलिस दलातील शिपाई पदाच्या जागेसाठी दुसऱ्या दिवशी गुरूवारी ८९५ उमेदवार कागदपत्र व छाती, उंची छाननीत पात्र ठरल्यानंतर त्यांची मैदानी चाचणी घेण्यात आली.**

> **पोलिस भरती प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण केले जाते. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजरही रोखली आहे. पारदर्शक प्रक्रिया राबवली जात असल्याचे पोलीस अधीक्षक घुगे यांनी सांगितले.**

जिल्हा पोलिस दलात शिपाई पदाच्या ५९ जागांसाठी बुधवारपासून भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. बुधवारी महिलांची शारिरीक चाचणी झाली. त्यानंतर गुरूवारी पुरूषांच्या भरती प्रक्रियेस प्रारंभ झाला. गुरूवारी १२१४ उमेदवारांना बोलवले होते. त्यापैकी ९६२ उमेदवार हजर राहिले. त्यापैकी ८९५ उमेदवार कागदपत्रे तपासणी, छाती व उंचीमध्ये पात्र ठरले. त्यानंतर त्यांची मैदानी चाचणी घेण्यात आली.

पुरूषांना १६०० मीटर व १०० मीटर धावणे प्रकार घेण्यात आले. त्यांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून ग्लुकोज पाणी, केळी निशुल्क पुरवण्यात आले. शुक्रवारी १२१० पुरूष उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी बोलवण्यात येणार आहे.

भरती प्रक्रिया अधीक्षक संदीप घुगे, अप्पर अधीक्षक कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्तात सुरू आहे.

# युवकास आत्महत्येस प्रवृत केल्याप्रकरणी पत्नीसह प्रियकराविरूध्द गुन्हा दाखल

सांगली, ता.१२(प्रतिनिधी)–

**वानलेसवाडी येथील अविनाश प्रकाश आवळे (वय ३४, रा. शिरगाव-विसापूर, ता. तासगाव) याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नी सुचित्रा आमोस भोरे (वय २९, रा. वानलेसवाडी) आणि शेखर आवळे या दोघांविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.**

अविनाश याचा भाऊ अमर प्रकाश आवळे (वय ३६, रा. शिरगाव) याने दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, अविनाश आणि वानलेसवाडी येथील सुचित्रा आमोस भोरे यांचा विवाह झाला होता. सुचित्रा हिचे शेखर आवळे याच्याबरोबर प्रेम संबंध होते. दोघेजण अविनाश याला त्रास देत होते. वेळावेळी त्याला धमकी देऊन शिवीगाळ करत असल्यामुळे अविनाशचे जगणे अवघड झाले होते. पत्नी व तिच्या प्रियकराच्या त्रासाला कंटाळून अविनाश याने सांगलीत आल्यानंतर ७ रोजी वानलेस चेस्ट हॉस्पिटलजवळील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. रात्री ८ ते ८.३० या दरम्यान हा प्रकार घडला. विश्रामबाग पोलिस ठाण्यात याबाबत प्राथमिक नोंद झाली.दरम्यान, अविनाश याचा भाऊ अमर याने सुचित्रा व शेखर आवळे या दोघांच्या त्रासाला कंटाळून अविनाशने आत्महत्या केल्याची फिर्याद विश्रामबाग पोलिसात दिली.

# मंडलिक कारखान्याकडून ऊस बिले शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा

मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी) –

**लोकनेते सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखाना लि,. (सदाशिवनगर, हमिदवाडा)कडून चालू हंगामात १६ ते ३१ डिसेंबर या पंधरवडयात गाळपास आलेल्या एकूण ७५,१७८ मे. टन ऊसाची प्र. टनास ३४१० रुपया प्रमाणे होणारी ऊस बिलाची रक्कम २५ कोटी ६३ लाख ६० हजार ६० संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केली असल्याची माहीती कारखान्याचे चेअरमन माजी खासदार संजय मंडलिक यांनी दिली.**

आजअखेर ९५ दिवसांमध्ये कारखान्याचे ४,४४,३८५ मे.टन ऊसाचे गाळप झाले असून ४,७४,४२० क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन झाले आहे तर सरासरी साखर उतारा १२.२९ टक्के इतका आहे. तसेच सहवीज निर्मिती प्रकल्पातून १,५७,७४,३००युनिटस वीज निर्यात केली आहे. कारखान्याचे सर्व ऊस उत्पादक सभासद, बिगर सभासद, तोडणी कंत्राटदार, वाहतूकदार कारखान्यातील सर्व अधिकारी कामगार, कर्मचारी यांच्या सहकार्याने गाळप हंगाम २०२५-२६ हा यशस्वीरित्या पार पडत असल्याबद्दल मंडलिक यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन आनंदा फराकटे, संचालक विरेंद्र मंडलिक, शिवाजीराव इंगळे, प्रकाश पाटील, विश्वास कुराडे, कृष्णा शिंदे,महेश घाटगे, मंगल तुकान, प्रतिभा पाटील, धनाजी बाचणकर, प्रदिप चव्हाण, नंदिनीदेवी घोरपडे, विष्णू बुवा, नेताजी पाटील, संभाजी मोरे व कारखान्याचे कार्यकारी संचालक एन. वाय. पाटील उपस्थित होते.

# हुपरी सिटी सर्व्हेचा निधी परत जाऊ नये यासाठी काम सुरु करा

## हुपरी चांदी फाऊंडेशनची नगराध्यक्षांकडे मागणी

हुपरी, ता.१२(वार्ताहर)–

शहरातील वाढीव वस्त्यांच्या सिटी सर्व्हेसाठी जिल्हा नियोजन समितीमधून मंजूर झालेला निधी मार्च २०२६ पूर्वी खर्च न झाल्यास परत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे काम तातडीने सुरु करून निधी परत जाणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाऊंडेशनच्या वतीने नगराध्यक्ष मंगलराव माळगे यांच्याकडे करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षांनी कोणत्याही परिस्थितीत हा निधी परत जाऊ देणार नाही, असे आश्वासन दिले.

हुपरी परिसरातील चांदी उद्योजकांना व्यवसायासाठी कर्ज घेताना तारण देण्यायोग्य प्रॉपर्टी असूनही, सिटी सर्व्हे नसल्यामुळे प्रॉपर्टी कार्ड मिळत नाहीत. परिणामी, कर्जासाठी अनेक अडचणी येतात. गेल्या ५८ वर्षांपासून हुपरीतील नागरिक प्रॉपर्टी कार्डपासून वंचित आहेत. ही गंभीर बाब हुपरी चांदी फाऊंडेशनने तत्कालीन पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

याची दखल घेत प्रशासनाने हुपरी शहराचा सिटी सर्व्हे करण्याचे आदेश दिले होते आणि आचारसंहितेपूर्वीच खर्चाला प्रशासकीय मान्यताही दिली होती. या कामासाठी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी निधी मंजूर झाला आहे. मात्र, हा निधी मार्च २०२६ पूर्वी खर्च होणे आवश्यक आहे, अन्यथा तो शासनाला परत जाईल, असे स्पष्टीकरण पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी जिल्हा नियोजन बैठकीत दिले होते.

या पार्श्वभूमीवर, फाऊंडेशनच्या शिष्टमंडळाने नगराध्यक्ष मंगलराव माळगे यांची भेट घेतली. सिटी सर्व्हेचे काम त्वरित सुरु करून हुपरीकरांचा जिव्हाळ्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उपनगराध्यक्ष प्रकाश उर्फ बाळासाहेब रणदिवे, नगरसेवक संदीप आपटे, डॉ. स्वप्नील हुपरीकर, सौ. भारती नायकवडे, सिद्धू नायकवडे, फाऊंडेशनचे अध्यक्ष मोहन खोत, संचालक संदीपकुमार अडसूळे, शामराव शिंदे, विलासराव जाधव, अजित पाटील, राज नाईक यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

# श्रीमती बिस्मिल्ला जमादार यांचे निधन

इचलकरंजी,ता.१२–



मंगळवार पेठेतील प्रतिष्ठीत नागरिक श्रीमती बिस्मिल्ला महंमद जमादार (वय ८०) यांचे वृध्दापकाळाने बुधवार,दि.११ रोजी निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले,सूना,नातवंडे असा परिवार आहे.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन :- जि. कोल्हापुर, ता. हातकणंगले, पैकी मुळची मौ. कबनूर येथील व सध्या क।। इचलकरंजी महानगरपालिका हददीतील मिळकतीचा सि.स.नं. २३२७० क्षेत्र ५७२.३० चौ.मी. यापैकी मालकीचे क्षेत्र १८८.६६ चौ.मी. याचे २०३० चौ.फुटाची खुली जागा व यामधील दगड, विट मातीमधील इमारत याचा वार्ड नं. २१ घर नं.१४०१ मिळकत यामधील लाईट, पाणी कनेक्शनसह चतुः सिमा पुर्वेस - श्री नेमिष्टे यांची मिळकत, पश्चिमेस- २० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस- श्री. पाटील यांची मिळकत, उत्तरेस-श्री. चौधरी यांची मिळकत.

२) वर नमुद केलेली मिळकत ही श्री संतोष कृष्णा कोरवी, सौ. संगिता सुनिल कोरवी, श्री साताप्पा कृष्णा कोरवी, कमळाबाई आण्णाप्पा माने, श्री केरबा आण्णाप्पा माने, श्री राजू आण्णाप्पा कोरवी, सुनिता मारुती माने, श्री रोहित मारुती माने व श्री रोहन मारुती माने, रा. इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही श्री आर्य चाणक्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या. इचलकरंजी या पतसंस्थेच्या कर्जा व्यतिरिक्त निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून मिळकत करारपत्राने विक्री करणेचे ठरलेले आहे.सबब,वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज, आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खाली नमुद केले पत्त्यावर लेखी कळवावे.म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. १२/०२/२०२६ इ.रोजीचे.

**ॲड. सुनिल सु. धुपदाळे**

रा. १७/२९४, पुजारी मळा, राजमाता नगर, इचलकरंजी.
मो. ९३२६०२२३८५.

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन - जिल्हा व तुकडी कोल्हापूर, तालुका व पोट तुकडी हातकणंगले में सह. दुय्यमनिबंधक सो, इचलकरंजी वर्ग २, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील मौजे कबनूर हद्दीतील क.ग.नं. १०१७/ २ / २ मधील बिगरशेती झालेली मिळकत भूखंड क्र. ६ यांचे क्षेत्र ८५.७१ चौ.मी ची खुली मिळकत. यासी चतु:सिमा पुर्वेस- बडवे व बापू पाटील यांची मिळकत, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस- ज्योती चव्हाण यांची मिळकत व उत्तरेस - भूखंड क्र.५.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकतही श्री. बाळासो गणपती वाकरेकर हे मूळ मालक असून यांचेकडून सौ. जनाबाई बाळासो खुडे व श्री. दिपक बाबासाहेब बावडेकर यांनी वटमुखत्यारपत्र घेवू केलेली मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना त्यांनी दिलेने सदरची मिळकत आमचे अशिलांनी करारपत्राने खरेदी घेण्याचे ठरवून सदर व्यवहारा पोटी संचकार रक्कम अदा केलेली आहे.

३) सबब वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकती बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा तारण गहाण, दान, बोजा, कर्ज, आरक्षण, नोंद बोजा, जप्ती आदेश, मनाई आदेश तसेच वारसा व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर आपले लेखी कागदपत्रासह मुदतीत कळवावे. मुदतीत तक्रार वा हरकत ना आलेस आमचे अशिल वर नमुद मिळकतीचा खरेदीपुर्व करारपत्र / खरेदीपत्र पुर्ण करतील मग नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता. १२/०२/२०२६.

**ॲड. सुनिल शंकर देसाई**

९/६८/१, अमराई रोड, शिक्षक कॉलनी, इचलकरंजी.
मो. ९०११९१००८८.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले पैकी **मौजे रुई** गावचे हद्दीतील **गट नं. ६७६** पैकी बिगरशेती भुखंड **क्र. ४३** चे क्षेत्र **६९.७० चौ.मी. चे क्षेत्र ७५० चौ.फु.** ची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा **पुर्वेस** – २० फुट रूंदीचा रस्ता, **पश्चिमेस**– सदर गट नं. पैकी शिल्लक मिळकत, **दक्षिणेस**– १८ फुट रूंदीचा रस्ता, **उत्तरेस**–श्री. कल्लु कोरवी याची मिळकत. येणेप्रमाणे नमुद चतुः सिमेतील मिळकत ही **श्री. मानसिंग विठ्ठल मागाडे,** रा. कोरोची यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा स्पष्ट निर्वाळा आमचे अशिल यांना देवून संचकार दाखल रक्कम स्वीकारून सदरची मिळकत कायम खुष खरेदी देणेचे मान्य केलेले आहे.

सबब नमुद मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, दावा, कुळ, अग्रहक्क वगैरे हितसंबंध तसेच हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून लेखी स्वरूपात सात (०७) दिवसाचे आत खाली नमूद पत्त्यावर कागदपत्रासह खात्री पटवून दयावी. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. १२/०२/२०२६ इ.रोजी.

**ॲड.रियाज बी. मुल्ला**

राजाराम स्टेडियमजवळ, गाळा नं. २,
ट्रॉफिक ऑफिसच्या मागे, इचलकरंजी. मो. ७२७६२३००५६.

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ६३९ पैकी प्लॉट नंबर ७ चे क्षेत्र १४२.१९ चौरस मिटर ची मिळकत यासि चतुः सिमा- पुर्वेस - २० फुट रस्ता, पश्चिमेस - श्री. सर्जेराव घोरपडे यांची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नंबर ६, उत्तरेस - प्लॉट नंबर ८.सदर ची मिळकत सौ. मनिषा राजु टिपुकडे. रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे तोंडीकरारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १२/०२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## Draft Summons O 5 R 20(A) of CPC

FDP.No.17/2017

**IN THE COURT OF THE SENIOR CIVIL JUDGE, NIPANI. AT: NIPANI**

| | |
|---|---|
| **1) Aziz Khan Inamdar.** | **Petitioner** |
| **V/s** | |
| **1) Shri. Yusuf Khan Inamdar. And others.** | **Respondents.** |

To,
**3 B (ii) Sabiya Sohel Desai,**
Age: 38 years, Occ:-Household work,
R/o:- Kasari, Tal-Kagal, Dist - Kolhapur
**3 B (iii) Najmin Zakiriya Patel,**
Age:- 40 years, Occ:-Household work,
R/o:-Hirekodi, Tal:-Chikodi.

**...Respondents No.3B(ii) & 3B(iii)**

**-: CITATION :-**

Whereas the petitioner has instituted the above noted FDP petition against you both and other respondents, for drawing final decree, in terms of preliminary decree. You both are the respondents No.3B(ii) and 3B(iii) in this case.

You both are hereby summoned to appear in this case in person or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the case (or who shall be accompanied by some person able to answer all such questions) on this 7th Day of March-2026 at 10.30Am O'clock and to state whether you contest or do not contest the claim and, if you contest, to receive directions of Court as to the date on which you have to file the objections, the date of trail and other matters.

Take notice that, in event of the claim not being contested the case shall be decided at once.

Take further notice that in default of your appearance on the day and hour before mentioned the suit will be heard and determined in you absence.

Given under my hand and seal of the court, this 30th day of January 2026 at Nipani.

**Nipani.**
**Date: 30-01-2026.** **By Order Of the Court**

Seal

**Sd/-**
**(Shri. S.P. Utture)**
Advocate
for Petitioner

**Sd/-**
**Sheristedar**
Senior Civil Judge & JMFC,
Nipani.

**Sd/-**
**(Bench Clerk)**

## जाहीर नोटीस

शहर इचलकरंजी येथील सि.स.नंबर ९७४२ पैकी क्षेत्र १०२.४ चौरस मीटर ची खुली जागा व यावरील बांधीव घर मिळकत यासी चतु:सिमा- पुर्वेस - श्री लांडगे व श्री डाके यांची मिळकत, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - श्री गणमुखे यांची मिळकत, उत्तरेस - श्री म्हेत्रे यांची मिळकत सदरची मिळकत ही श्री. मोहसीन सलीम एकसंबे व सौ रहीमा मोहसीन एकसंबे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी आमचे अशिलांना संचकार रक्कम स्विकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात ॲक्सीस बँक या बँकेव्यतिरीक्त अन्य कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. ११/०२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन, दाखवले कागदपत्रावरुन तमाम लोकांना कळविणे करीता प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन - जि. कोल्हापुर, ता. हातकणंगले पैकी व मा. सहदुय्यम निबंधक वर्ग २, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील मुळची मौजे शहापुर येथिल व सध्या इचलकरंजी महानगरपालीका हद्दीत समाविष्ट झालेली क.ग.नं. ८५८ (याचा सि.स. नं. २२०१६) यांचे क्षेत्र हे ०२-२७ आर, आकार रु. १८.८० पैसेची मिळकत यापैकी हे.००-२०.८१ आर, आकार रु.०१-७१ पैसेची खुली जमिन मिळकत सर्व यासी चतु:सिमा:- पुर्वेस - गट नंबर ८५९ ची मिळकत, पश्चिमेस - ६० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस-- ३० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस- गट नं. ८५८ पैकी शिल्लक मिळकत, येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यामधील जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप, तदंगभुत वस्तुसह तसेच मिळकतीस लागू सर्व हक्कासह यास यापुढे ''मिळकत'' असे संबोधले आहे.

२) वर नमुद कलम १ मधील मिळकत ही सौ. भाग्यश्री प्रकाश जाधव रा. ६३३ ते ६३७, चिन्नावर गल्ली, गोकाक यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा देवून आमचे अशिलानां कायम खुष खरेदी देणेचे ठरवुन संचकार दाखल भरीव रक्कम स्विकारली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल लवकरच खरेदीपत्र पुर्ण करुन घेणार आहेत.

३) सबब, वर कलम १ मध्ये नमुद केले मिळकतीबाबत आमचे अशिलांचा खरेदीचा हक्क व अधिकार निर्माण झाला असुन ते सदर मिळकत खरेदी करणेस तयार आहेत. त्यामुळे वर नमुद केले मिळकतीबाबत आमचे अशिलांचे अपरोक्ष सौ. भाग्यश्री प्रकाश जाधव यांचेशी अगर कोणाशीही कोणीही कोणताही व्यवहार करु नये. याउप्परही व्यवहार केलेस आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक रहाणार नाही, यांची सर्वानी नोंद घेणेत यावी. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन दिली जाहीर नोटीस. ता.

**ॲड. जे. आर. कागवाडे**

**नोटरी भारत सरकार**
ऑफिस- ३/११२, गावभाग, टाकवडे वेस, इचलकरंजी.
मो. ९८५०९१५८१४.

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६३९ पैकी प्लॉट नं. १४ चे क्षेत्र - १५३ - ३४ चौ. मी . खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - प्लॉट नं. १५ ची मिळकत, पश्चिमेस - प्लॉट नं. १३ ची मिळकत, दक्षिणेस - भगाटे यांची मिळकत, उत्तरेस -२० फुट रस्ता. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही सुरेंद्र रामचंद्र वरूडे यांचेकडून नजीर अब्दुल नदाफ रा. इचलकरंजी यांनी कराराने घेतलेली असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दी पासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस . सही ता . १२/०२/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**

पत्ता- गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफिस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ३२८ पैकी प्लॉट नंबर १९ चे क्षेत्र २५२८.५० चौरस फुट ची मिळकत. यासी चतु:सिमा- पुर्वेस - २० फुट रूंदीचा रस्ता, पश्चिमेस - गट नं ३२९, दक्षिणेस - प्लॉट नं २०, उत्तरेस- प्लॉट नं १८. सदर मिळकत ही मूळची सुनंदा भास्कर मुसळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्रेणिक बाहुबली मुरगुडे रा. इचलकरंजी यांना व त्यांनी आमचे अशिलांचेकडून करारपत्र संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.११/२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णनः- जि. कोल्हापुर, ता.हातकणंगले, पैकी मुळची शहापूर येथील व सध्या का इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचा क.ग.नं. ९०६ यापैकी बिगरशेती प्लॉट नं. ६/डी याचा सि.स.नं. १९६९१ पैकी मालकीचे क्षेत्र ६८.९५ चौ. मी. याचे ७४२ चौ. फुटाची खुली जागा चतु:सिमा पुर्वेस - वंदना पवार यांची मिळकत, पश्चिमेस - क.ग.नं.९०५ ची शहा यांची मिळकत, दक्षिणेस- क.ग.नं.९०५ ची शहा यांची मिळकत, उत्तरेस - ८० फुट रुंदीचा रस्ता.

२) वर नमुद केलेली मिळकत ही मदीना इमाम मुजावर, रा. कृष्णानगर इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून मिळकत करारपत्राने विक्री करणेचे ठरलेले आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज, आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्त्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. १२/०२/२०२६ इ.रोजीचे.

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**

रा.१७/२९४, पुजारी मळा,इचलकरंजी
मो.नं. ९३२६०२२३८५

# ठेवीदारांना बँकांप्रमाणे संरक्षण,डिजीटल सुविधा मिळाव्यात

## राज्यसभेत खास.धनंजय महाडिक यांची मागणी

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**देशातील लाखो कुटुंबांची आयुष्यभराची बचत सहकारी पतसंस्थांमध्ये गुंतलेली असताना, त्या ठेवीदारांना बँकांप्रमाणे संरक्षण आणि आधुनिक डिजिटल सुविधा मिळाव्यात, या मागणीसाठी कोल्हापूरचे खासदार धनंजय महाडिक यांनी राज्यसभेत मुद्दा उपस्थित केला.**



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी देशभरातील ९० हजारांहून अधिक तसेच महाराष्ट्रातील सुमारे २४ हजार ५०० पेक्षा अधिक सहकारी पतसंस्थांशी संबंधित कोट्यवधी ठेवीदारांचा प्रश्न मांडला. सभागृहात बोलताना महाडिक यांनी सांगितले की, ग्रामीण व निमशहरी भागातील अर्थचक्र सुरळीत ठेवण्यात सहकारी पतसंस्थांचा मोठा वाटा आहे. सुमारे २ लाख ७५ हजार कोटी रुपयांहून अधिक ठेवींचे व्यवस्थापन या संस्था करतात. अनेक ठिकाणी या संस्था नागरिकांसाठी सहज उपलब्ध आर्थिक आधार ठरतात. मात्र राष्ट्रीयीकृत आणि सहकारी बँकांच्या ठेवीदारांना मिळणारी पाच लाख रुपयांपर्यंतची ठेव विमा सुरक्षा पतसंस्थांच्या ठेवीदारांना उपलब्ध नाही.

गेल्या काही वर्षांत काही पतसंस्थांमध्ये निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींमुळे ज्येष्ठ नागरिक,महिला आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना मोठा फटका बसला आहे. आयुष्यभराची साठवण धोक्यात येण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पतसंस्थांतील ठेवींना विमा संरक्षण देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

याशिवाय सहकारी पतसंस्थांना यूपीआय सारख्या डिजिटल व्यवहार सुविधांचा लाभ देण्यात यावा, अशीही त्यांनी मागणी केली. डिजिटल व्यवहारांचा प्रसार वाढत असताना ग्रामीण भागातील अनेक ग्राहक अजूनही रोख व्यवहारांवर अवलंबून आहेत. डिजिटल इंडिया आणि वित्तीय समावेशनाच्या उद्दिष्टांना बळ देण्यासाठी पतसंस्थांना यूपीआय प्रणालीशी जोडणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सहकारी चळवळ अधिक सक्षम,सुरक्षित आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने आवश्यक धोरणात्मक निर्णय घ्यावेत,अशी अपेक्षा खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केली.त्यांच्या या भूमिकेमुळे देशातील कोट्यवधी ठेवीदारांच्या प्रश्नाला संसदेतून आवाज मिळाला आहे.

# एसटीच्या ताफ्यात राजमाता जिजाऊ बस दाखल होणार

मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)

**महाराष्ट्र एस.टी महामंडळाच्या ताफ्यात लवकरच ५५ आसनी राजमाता जिजाऊ बस दाखल होणार आहेत. या बसेस विविध मार्गांवर धावू लागणार असून, विशेषतः गर्दीच्या मार्गांवर प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना याचा मोठा फायदा होणार आहे.**

एसटी महामंडळाने याआधी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती आणि हिरकणी अशा ऐतिहासिक व प्रेरणादायी नावांच्या बसेस सुरू करून प्रवासी सेवेचा दर्जा उंचावला आहे.त्याच परंपरेत आता हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या राजमाता जिजाऊ यांच्या नावाने नव्या बसेसचे नामकरण करण्यात आले आहे. राजमाता जिजाऊ या केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री नव्हत्या, तर स्वराज्य घडविणाऱ्या विचारांची जननी होत्या. त्यांच्या नावाने सुरू होणारी ही सेवा राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक मानली जात




### गर्दीच्या मार्गावर प्रवास करणाऱ्यांना होणार फायदा

आहे.राजमाता जिजाऊ बसेस आधुनिक ३ बाय २ आसनरचनेत खरेदी करण्यात आल्या आहेत. सध्या एसटीच्या बहुतांश बसेसमध्ये सुमारे ४० प्रवाशांची आसनक्षमता असते.मात्र, या नव्या बसेसमध्ये तब्बल ५५ प्रवासी आरामात बसू शकतील.त्यामुळे आतापर्यंत गर्दीच्या मार्गांवर उभ्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. अधिक आसनक्षमता, मोकळी जागा आणि आरामदायी सीट्स यामुळे प्रवास अधिक सुखकर होणार आहे.प्रवाशांची जास्त प्रवासी वर्दळ असलेल्या मार्गांवर चालवण्याचा परिवहन विभागाचा मानस आहे.

मार्च महिन्यापासून विविध आगारांतून या बसेस सुरू केल्या जाणार आहेत. दिसायला या बसेस आकर्षक असणार असून, केशरी आणि पांढऱ्या रंगसंगतीत त्यांची रचना करण्यात आली आहे. हे रंग महाराष्ट्राच्या इतिहास, परंपरा आणि अस्मितेचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे या बसेस केवळ वाहतुकीचे साधन न राहता महाराष्ट्राच्या अभिमानाचे चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत. राजमाता जिजाऊ बसेसच्या समावेशामुळे एसटी महामंडळाने प्रवासी सेवेचा दर्जा उंचावण्याच्या दिशेने आणखी एक ठोस पाऊल टाकले आहे. आधुनिक सुविधांसह ऐतिहासिक प्रेरणा जपणारी ही सेवा लाखो प्रवाशांना दिलासा देणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



# कल्लेश्वर हायस्कूलमध्ये आठवडी बाजार उपक्रम उत्साहात

टाकवडे,ता.१२(प्रतिनिधी)–

**रयत शिक्षण संस्थेचे श्री कल्लेश्वर हायस्कूल टाकवडे या विद्यालयात हळदी कुंकू समारंभ व आठवडी बाजार उपक्रम उत्साहात संपन्न झाला. सुरुवातीला कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व वक्त्या डॉ.नेहा काटे तसेच गावातील प्रमुख मान्यवर,महिला प्रतिनिधी व मुख्याध्यापक पी.बी. पांढरबळे यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी पाहुणे व मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.त्यानंतर हळदी कुंकू कार्यक्रम सुरू झाला. प्रास्ताविक विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ.पाटील यांनी केले.पाहुण्यांचा परिचय सौ.मधाळे यांनी करून दिला. प्रमुख वक्त्या डॉ.काटे यांनी महिलांना आहार, आरोग्य, योगा तसेच आपली मानसिक स्थिती याविषयी मार्गदर्शन केले.शिक्षक मनोगतात सौ.पाडळे यांनी विचार मांडले. यावेळी स्पॉट गेमचे आयोजन सौ.दिंडे यांनी केले . आभार सौ.कनोजे यांनी मानले. कार्यक्रमाचे औचित्य साधून मुलांच्यामध्ये बौद्धिक क्षमतेबरोबरच आर्थिक व व्यावसायिक ज्ञानाची भर पडावी म्हणून इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांचे आठवडी बाजाराचेही आयोजन केले होते.पालकांनी यामध्ये भरपूर सहभाग घेऊन मुलांकडून त्या खरेदी करण्यात आल्या. यावेळी माता-पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# डिप्लोमाच्या ९२ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

वारणानगर,ता.१२(प्रतिनिधी)–

**डी.वाय.पाटील टेक्निकल कॅम्पस (पॉलिटेक्निक),तळसंदे येथील डिप्लोमाच्या ९२ विद्यार्थ्यांची टीई कनेक्टिव्हिटी या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक अडीच लाख रुपये पॅकेज मिळाले आहे.**



तळसंदे येथील निवड झालेल्या विद्यार्थ्यां समवेत डॉ.सतीश पावसकर,जितेंद्र पवार,प्रा.अक्षय खामकर आदी.

महाविद्यालयमध्ये घेण्यात आलेल्या कॅम्पस ड्राईव्हद्वारे हि निवड झाली आहे. टीई कनेक्टिव्हिटी ही जागतिक स्तरावर कार्यरत इलेक्ट्रॉनिक्स व औद्योगिक क्षेत्रातील एक प्रतिष्ठित कंपनी आहे.या ड्राईव्हमध्ये इलेक्ट्रिकल विभागाच्या २७, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशनच्या २१, मॅकेनिकलच्या २० आणि कॉम्प्युटर विभागाच्या २४ अशा एकूण ९२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे संचालक डॉ. एस. आर. पावसकर यांच्या हस्ते ऑफर लेटर देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीला आणि महाविद्यालयाकडून देण्यात येत असलेल्या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणामुळे हे यश मिळाले आहे. यापुढेही अधिकाधिक विद्यार्थ्यांना चांगली प्लेसमेंट मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू अशी ग्वाही डॉ. पावसकर यांनी यावेळी दिली.

प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा.अक्षय खामकर तसेच सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापकांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय डी.पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी.पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील,कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आजरा तालुका प्राथ.शिक्षक संघटनेचे अधिवेशन उत्साहात संपन्न

आजरा,ता.१२(प्रतिनिधी)–

**आजरा तालुका प्राथ. शिक्षक संघटनेचे ३१ वे वार्षिक अधिवेशन आनंदराव नादवडेकर पतसंस्था आजरा येथे उत्साहात पार पडले . अध्यक्षस्थानी जेष्ठ अध्यापक श्री आप्पासाहेब जाधव हे होते.**

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पुजन व दिपप्रज्वलन करण्यात आले त्यानंतर संभाजी पाटील यांनी श्रध्दांजलीचा ठराव मांडला. संघटनेचे उपाध्यक्ष बळवंत शिंत्रे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. अधिवेशनाच्या निमित्ताने ७५ वर्षे पूर्ण झालेल्या २५ सेवानिवृत गुरुजनांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी विष्णु मोरे यांनी भविष्यात संघटनेने योजलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी जथ पाटील,शिवाजी गालबिले, जनार्दन निऊंगरे,श्रीपती पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजी बिरजे यांनी अभिनंदन ठराव व विरुगंळा केंद्र , शिष्यववृती विद्यार्थी गुणगौरव, संघटना देणगी, विविध सहलींचे आयोजन, शिक्षक भवन उभारणी याबाबत विविध ठराव करण्यात आले.अधिवेशनाला मनोहर नाईक, गंगाराम पन्हाळकर, श्रीपती नाईक, गोविंद जाधव भगवान पवार, व सेवानिवृत शिक्षक उपस्थित होते.

# श्रमसंस्कारांच्या मुल्यांची विद्यार्थ्यांनी जपणूक करावी

### - डॉ.अजीम शेख

कराड,ता.१२(प्रतिनिधी)–

**शिबिरात मिळालेली श्रमसंस्कारांच्या मूल्यांची विद्यार्थ्यांनी जपणूक करून जीवनात येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला संधी समजून सामोरे जावे, असे आवाहन प्रकल्प संचालक डॉ.अजीम शेख यांनी केले.**

मलकापूर (ता.कराड) च्या यशवंतराव मोहिते इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचा विंग (ता.कराड) येथे समारोप झाला. त्यावेळी ते बोलत होते.ग्रामस्वच्छता, आरोग्य तपासणी,आरोग्य सर्वेक्षण मोहीम, आधुनिक शेती तंत्रज्ञान, डिजिटल शेती,क्षेत्र भेट, महिला सबलीकरण,रस्ता सुरक्षा रॅली, जनजागृती अभियानात सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले.

मतदान जनजागृती अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हा परिषद शाळा विविध क्रीडा स्पर्धा, पथनाट्य,लेझीम पथक,योगा, अंगणवाडी मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप आदी उपक्रम झाले. डॉ.अक्षय पांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरात शंभरहून अधिक रूग्णांना मोफत चष्मे वाटप तर डॉ.प्राजक्ता बोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ५० रूग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार दिले. महिलांसाठी झालेल्या स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना भेटवस्तू देऊन गौरविले. आदर्श स्वयंसेवक म्हणून आल्पिया मुल्ला व यश पाटील यांना गौरविले. ग्रामपंचायतीने शिबिरार्थींना विशेष सहकार्य केले.

कार्यक्रम अधिकारी डॉ.अनिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यश पाटील,हर्षल मोहिते, अंजली कदम, रिया नांगरे, यश कणसे, रोहन साळुंखे,आसिया चौधरी, आदिती यादव,अवंती जाधव, अनुग्रह क्रिस्तिया, सृष्टी जाधव, अभिलाषा देशमुख,तन्वी पाटील, तन्वी अतकरे,अनुष्का जाधव, शरीब नायकवडी, त्रिशा दुधाणे, आदित्य पाटील, सुजल गाभले,अथर्व पवार,ललित मालवीयआदी शिबिरार्थींनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# माणकापुरात श्री मलकारसिद्ध देवाच्या यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

माणकापूर,ता.१२(वार्ताहर)

**माणकापूर (ता. निपाणी)येथील जागृत ग्रामदैवत श्री मलकारसिध्द देवाच्या महाशिवरात्री यात्रेनिमित 'यात्रा कमिटी, ग्रामपंचायत' माणकापूर यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

महाशिवरात्री निमित्त निसर्ग राजा ग्रुपचे अध्यक्ष,पत्रकार शिवाजी येडवान यांच्यावतीने रविवार ता.१५ रोजी सकाळी ११ वा. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या मान्यवरांना यावर्षीचा 'राष्ट्रीय व कर्नाटक राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार' वितरण समारंभ प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये श्री मलकारसिध्द मंदिर (गावातील) येथे संपन्न होणार आहे. यात्रेच्या मुख्य दिवशी सोमवार ता.१६ रोजी सकाळी ठिक ९ वा. श्रींच्या पालखीचे पुजन व भव्य मिरवणूक शुभारंभ 'प.पू. सिध्दयोगी अमरेश्वर महाराज, सिध्दगिरी मठ, कवलगुड' यांच्या परम सान्निध्यात व मानकरी रणजितदादा रत्नाकर कुलकर्णी इचलकरंजी यांच्या हस्ते तसेच विद्यमान खासदार,आमदार व विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे.या दिवशी स.११ वाजता माळावरील आयको मिल जवळील मंदिरात महाप्रसाद, सायं.७ वाजता ऑर्केस्ट्रा तर दिवशी मंगळवार ता.१७ रोजी स.९ वाजता विना काठी, विना लाठी बैलगाडी शर्यती,दुपारी १२ वाजता गावातील मंदिरात महाप्रसाद, दुपारी २ वा. हातात कासरा धरून बैल पळविणे स्पर्धा (जनरल), बुधवार ता. १८ रोजी दुपारी ४ वा. नेमलेल्या कुस्त्यांचे जंगी मैदान, सायं ७ वाजता वैभव म्युझिकल नाईट, कोल्हापूर यांचा मनोरंजनाचा कार्यक्रम असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.यात्रेमध्ये गैरवर्तन केल्यास सदलगा पोलिसांकडून कायदेशीर कारवाई केली जाईल,असा इशारा देण्यात आला आहे.



प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना विवेक सिद्ध.

# जीवनप्रकाश समाज गौरव पुरस्कार विवेक सिद्ध यांना प्रदान

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**जीवन प्रकाश बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने यंदाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या पुरस्कार सोहळ्यात 'जीवनप्रकाश राज्यस्तरीय समाज गौरव पुरस्काराने' विवेक सिद्ध यांना सन्मानित करण्यात आले. सामाजिक स्तरावर त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला.**

जीवन प्रकाश बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व जीवनप्रकाश पब्लिक स्कुल व पॅरामेडिकल कॉलेज यांच्यावतीने शामराव पाटील यड्रावकर नाट्यगृह येथे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. समाजातील शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक, क्रीडा , साहित्य, व्यवस्थापन आदी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींचा आढावा घेवून हा सन्मान यावेळी करण्यात आला. महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यामध्ये सहभाग होता.या सोहळ्यासाठी राजेंद्र पाटील यड्रावकर, नगराध्यक्ष संजय पाटील-यड्रावकर,डॉ.प्रकाश दीपेकर, उपनगराध्यक्ष अनुराधा आडके, डॉ.प्रा.शशिकांत कुलकर्णी, विशाल म्हातुगडे, डॉ.अभिता दीपंकर, चंद्रकला हलसवडेकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


श्रीहरी
शुक्रवार, ता.१३/०२/२०२६ पासून
दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
मीठा मीठा प्यार
प्रौढांसाठी
४ व ७ वा.
A गंदी बात A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १३ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
सेक्स अँण्ड इंटरनेट
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार १३ पासून
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.






५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
शुक्रवार ता. १३ पासून
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.






कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.१३ पा
१२,३,६,९ वा
फुल्ल अॅक्शन, थ्रिलर चित्रपट






गुरु शुक्रवार ता.१३ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज १ खेळ
दु. १२.३० वा.
युवा वर्गाची
नवी लव्ह स्टोरी






रुबाब
(मराठी)
रोज ३ खेळ
३.३०,६.३०,९.३० वा.






ओ रोमिओ
(हिंदी चित्रपट)

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow






" ओ' रोमियो " ( हिंदी ) 10:00 AM, 01:30 PM 03:30 PM, 07:00 PM 10:30 PM
" बॉर्डर 2" ( हिंदी ) 10:00 PM
" पुन्हा एकदा साडे माडे तीन " ( मराठी ) 01:00 PM, 05:00 PM 06:45 PM
" रणपती शिवराय स्वारी आग्रा " ( मराठी ) 10:15 AM, 09:30 PM
" मर्दानी 3" ( हिंदी ) 10:30 AM, 07:30 PM
" मन आतले मनातले" ( मराठी ) 01:15 PM
" अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई? " ( मराठी ) 04:00 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11






ओ रोमियो (HIN) (A) 11.00am, 01.30, 03.30, 05.00, 07.00, 09.00, 10.30pm
साडे माडे तीन २ (MAR) (U/A) 11.00am, 08.00pm
क्राइम १०१ (HIN) (U/A) 03.00, 10.30pm
बॉर्डर २ (HIN) (U/A) 11.15am
अंग अंग सुनबाई! काय म्हणताय सूनबाई (MAR) (U/A) 05.15pm
आता सिनेमा पहा 100 रु. पासून पुढे

# पायाभूत सुविधांसाठी वाढीव ३४६ कोटींची मागणी करणार

## पालकमंत्री शंभूराज देसाई;जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न

सातारा,ता.१२(प्रतिनिधी)-

**जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०२६-२७ साठी मंजूर नियतव्यय ५२४ कोटी ५६ लाखांचा असून आरोग्य, विद्यूत, पाणी पुरवठा, जलसंधारण यासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वाढीव ३४६ कोटी ४६ लाखांची मागणी राज्यस्तरीय समितीकडे करण्याची शिफारस पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत घेण्यात आली.**

जिल्हा नियोजन समितीची बैठक नियोजन भवन येथे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी आमदार शशिकांत शिंदे, आमदार मनोज घोरपडे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत थोरात, समाजकल्याण आयुक्त सुनिल जाधव, उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.यावर्षी सन २०२५-२६ मध्ये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ६४७ कोटी रुपयांचा निधी अर्थ संकल्पित आहे. यापैकी ३१ जानेवारी २०२६ अखेर एकूण ४६.४९ टक्के निधी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे. मागणीप्रमाणे यंत्रणांना ताबडतोब निधी उपलब्ध करुन दिला जाईल. यंत्रणांनी त्यांच्याकडील झालेल्या कामाची देयके तातडीने निपटारात करावीत, असे निर्देशही या बैठकीत देण्यात आलेत.




**जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत बोलताना पालकमंत्री शंभुराज देसाई सोबत आम.शशिकांत शिंदे,आम.मनोज घोरपडे,जिल्हाधिकारी संतोष पाटील व इतर.**

या बैठकीत विभागांकडील विविध कामांचा व झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जलजीवन मिशनच्या ज्या कामांची चौकशी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे. अशा प्रकरणांमध्ये चौकशीअंती काही गैर आढळून आले नसल्यास बंद ठेवण्यात आलेली कामे सुरु करण्याचे निर्देशही देण्यात आले. वन विभागाच्या हद्दीत असणाऱ्या अनेक रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत त्यांची यादी तयार करुन जिल्हाधिकारी यांचेकडे द्यावीत. त्यांनी यावर मार्ग काढावा, असेही बैठकीत सांगण्यात आले.

वाढीव वस्त्यांना विद्युत कनेक्शन, विद्युत पोल, वाढीव रस्ते, रस्ते सुधारणा, आरोग्य पाणीपुरवठा, जलसंधारण आदी सर्व बाबींमधील कामासाठी राज्यसरकारकडे वाढीव निधीची मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. आचार संहितेच्या काळात प्रलंबित राहिलेली कामे आता गतीने पूर्ण करावीत.एकही रुपयांचा निधी अखर्चित राहणार नाही याचे यंत्रणांनी काटेकोर नियोजन करावे,असे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

# कृष्णाकाठी समुद्री पाहुण्याचे दर्शन

भिलवडी,ता.१२(वार्ताहर)-

**पलूस तालुक्यातील आमणापूर येथील कृष्णा नदीच्या पात्रात, विशेषत: कोडार परिसरात अत्यंत दुर्मिळ अशा वेस्टर्न रीफ हेरॉन** (Western Reef Heron) **अर्थात समुद्री बगळ्याचे दर्शन झाले आहे. पक्षीप्रेमी संदीप नाझरे यांनी या पक्षाची नोंद केली असून, समुद्रकिनाऱ्याचा हा रहिवासी कृष्णाकाठी आढळल्याने पक्षी अभ्यासकांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे.**



वेस्टर्न रीफ हेरॉन हा पक्षी प्रामुख्याने खाऱ्या पाण्याच्या प्रदेशात, म्हणजेच समुद्रकिनारे आणि खाडी परिसरात वास्तव्यास असतो. महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात आढळणारा हा पक्षी कृष्णा नदीच्या अंतर्गत भागात, विशेषतः सांगली जिल्ह्यात दिसणे ही विशेष घटना आहे. अन्नाच्या शोधात किंवा स्थानिक स्थलांतरादरम्यान हा पक्षी रस्ता चुकून या गोड्या पाण्याच्या परिसरात आला असण्याची शक्यता आहे. निरीक्षण केलेल्या या पक्षाचा रंग गडद राखाडी असून,त्याची शिकारीची पद्धत इतर बगळ्यांपेक्षा वेगळी आहे.नदीकाठी आढळणाऱ्या सामान्य पांढऱ्या बगळ्यांच्या गर्दीत हा सागरी बगळा आपल्या वेगळ्या रंगरूपामुळे उठून दिसत होता. या पक्षाला मराठीत सागरी बगळा म्हणून ओळखले जाते.कृष्णा नदीचा कोडार परिसर खऱ्या अर्थाने पक्ष्यांसाठी नंदनवन असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.यापूर्वीही अनेक परदेशी पाहुण्यांनी या परिसराला पसंती दिली आहे.

या महत्त्वपूर्ण नोंदीमुळे आमणापूरच्या कृष्णाकाठच्या पर्यावरणाकडे अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले आहे.

**आमणापूरच्या कोडार परिसरात वेस्टर्न रीफ हेरॉनची दुर्मिळ नोंद**

# पराभूत उमेदवारांनी नागरी विकास आघाडीसोबत येण्याचे आवाहन

सांगली,ता.१२(प्रतिनिधी)-

**सांगली,मिरज,कुपवाड महापालिकेच्या निवडणुकीत पराभूत झालेल्या पण कारभाऱ्यांवर वचक ठेवून जनहितासाठी काम करण्याची प्रबळ इच्छा असणाऱ्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवण्यासाठी आमच्या बरोबर यावे, नागरी विकास आघाडीबरोबर खांद्याला खांदा लावून जनतेच्या प्रश्नासाठी पुढे यावे, असे आवाहन ॲड. अजित सूर्यवंशी, वि.द. बर्वे आणि प्रा. मासुले यांनी पत्रकाद्वारे केले आहे.**

सांगली,मिरज,कुपवाड महापालिकेची निवडणूक नुकतीच झाली असून यामध्ये ७८ जागांसाठी सुमारे ३५० पेक्षा अधिक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. तीनही शहरांचा विकास करण्यासाठी प्रचाराच्या दरम्यान या सर्वांनी जीवाचे रान केले होते. पण नियमानुसार ७८ जणांनाच नगरसेवक होण्याची संधी मिळाली. इतरांना पराभूत होऊन घरात बसावे लागले.मात्र या सर्व जिद्दी उमेदवारांनी पुढील काळात अगदी आत्मविश्वासाने संघटित होऊन शहराच्या विकासासाठी एकत्र यावे. पाच वर्ष डोळसपणे या ७८ कारभाऱ्यांवर वाचक ठेवून शॅडो कॅबिनेटची भूमिका यशस्वी करावी.भावी नगरसेवक म्हणून आत्तापासूनच जनसेवेचे व्रत घ्यावे.आतापासूनच जनतेच्या शेताची मशागत करण्यासाठी नागरी विकास आघाडीवर यावे यासाठी शनिवार ता.१४ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजता स्टेशन रोडवरील कामगार भवनमध्ये सर्वांनी उपस्थित राहावे,असे आवाहन करण्यात आले आहे.



पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजप कार्यालय,मिरज येथे समर्पण दिवस साजरा करण्यात आला.

# मिरजेत भाजपतर्फे समर्पण दिवस साजरा

मिरज,ता.१२(प्रतिनिधी)-

**भारतीय जनसंघ व भारतीय जनता पक्षाचे प्रमुख विचारवंत, तत्त्वज्ञ व संघटन शिल्पकार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची पुण्यतिथी सर्वत्र समर्पण दिवस म्हणून साजरी केली जाते. या दिनाचे औचित्य साधत भाजप कार्यालय, मिरज येथे समर्पण दिवस साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पांजली अर्पण करुन करण्यात आली. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचली पाहिजेत, हा त्यांचा विचार आजच्या काळातही तितकाच मार्गदर्शक असल्याचे मत स्वाती खाडे यांनी व्यक्त केले. यावेळी महिला मोर्चा पदाधिकारी माजी महापौर संगीता खोत, अनिता हारगे, साधना माळी, सारिका राहुटे, गंगुताई नाईक, प्राची देसाई, गायत्री सातपुते, सीमा मगदूम, मोहिनी कुलकर्णी, वर्षाराणी वांडरे यावेळी उपस्थित होत्या.

# नागरिकांच्या हितांच्या कामाला प्राथमिकता द्या

## महापौर सुर्यवंशी यांच्या प्रशासनाला सुचना;सर्व विभागांच्या मॅरेथॉन बैठका संपन्न

सांगली,ता.१२(प्रतिनिधी)-

**महापौरपदाचा पदभार स्वीकारताच धीरज सूर्यवंशी यांनी कामकाजाला वेग दिला आहे. बुधवारी पहिल्याच दिवशी सर्व विभागांच्या मॅरेथॉन बैठका घेवून नागरिकांच्या हितांच्या कामाला प्राथमिकता देण्याच्या सूचना प्रशासनाला केल्या. त्याचबरोबर शुक्रवारपासून विभागनिहाय स्वतंत्र बैठक घेऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचा इरादाही त्यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केला.**



महापालिकेच्या कै. राजाभाऊ जगदाळे सभागृहात झालेल्या या बैठकीला उपमहापौर गजानन मगदूम, सभागृह नेते संदीप आवटी, अतिरिक्त आयुक्त राहूल रोकडे, उपायुक्त अश्विनी पाटील, स्मृती पाटील, शहर अभियंता पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे यांनी नूतन महापौर, उपमहापौर व सभागृह नेत्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर सर्व खातेप्रमुखांनी आपल्या विभागाच्या कामकाजाची सविस्तर माहिती सादर केली. यावेळी महापौर सूर्यवंशी यांनी पाणी, ड्रेनेज, घरपट्टी, पाणीपट्टी, आरोग्य, मालमत्ता विभागाचा आढावा घेतला. नागरिकांना मुबलक पाणी देण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील, याचा अहवाल तयार करण्याची सूचना केली. याबाबत दोन दिवसांत पाणीपुरवठा विभागाची स्वतंत्र बैठक घेऊन त्यांच्या अडचणीही जाणून घेतल्या जातील, असेही महापौरांनी सांगितले.

महापालिकेचे जे प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत, ते संबंधित मंत्र्यांच्या माध्यमातून मार्गी लावण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. प्रत्येक विभागाचे प्रश्न मुळापासून सोडवण्यासाठी आगामी ५ ते ६ दिवसांत स्वतंत्र बैठकांचे नियोजन केले आहे. शुक्रवारपासून घरपट्टी आणि स्वच्छता विभागाच्या विशेष बैठका घेऊन धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असेही ते म्हणाले.

अतिरिक्त आयुक्त रोकडे यांनी आकृतीबंध आणि रिक्त पदांच्या परिस्थितीबाबत माहिती दिली. उपायुक्त स्मृती पाटील यांनी सूचनांचे काटेकोर पालन करून निश्चित केलेली उद्दिष्टे पूर्ण करण्याची ग्वाही दिली.

**पालकमंत्र्याकडून सूचना**

महापौर धीरज सूर्यवंशी, उपमहापौर गजानन मगदूम, सभागृह नेते संदीप आवटी यांनी सकाळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेतली. यावेळी पालकमंत्र्यांनी स्वच्छ व पारदर्शी कारभारासोबतच जनतेच्या हिताला प्राथमिकता देण्याच्या सूचना दिल्या आहेत.महापालिका क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांबाबत लवकरच मुख्यमंत्र्यासोबत बैठक घेण्याची ग्वाहीही पालकमंत्र्यांनी दिली.त्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांनी दिवसभरात जिल्हा नियोजन समितीसह विविध बैठकांना हजेरी लावली.

# मलकापूर नगरपरिषदेत आज ठरणार विषय समिती सभापती

कराड,ता.१२(प्रतिनिधी)-

**मलकापूर (ता.कराड) नगरपरिषदेत विषय समिती सभापतीपदाच्या निवडीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. आज होणाऱ्या विशेष सभेत कोणाच्या गळ्यात सभापतीपदाची माळ पडणार यावरून राजकीय वर्तुळात चांगलीच खलबत्ते सुरू झाली आहे.**

मलकापूर नगरपरिषदेत सर्वसाधारण बांधकाम, पाणीपुरवठा व स्वच्छता, नियोजन व विकास, महिला व बालकल्याण तसेच आरोग्य, शिक्षण, क्रीडा समिती या महत्त्वाच्या समित्यांच्या सभापती पदांसाठी इच्छुक नगरसेवकांमध्ये चुरस वाढली आहे. या समित्यांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर मोठा प्रभाव राहतो. त्यामुळे इच्छुकांमध्ये रस्सीखेच सुरू आहे.

# जन्म-मृत्यूची नोंद २१ दिवसात बंधनकारक

## जिल्हा परिषद प्रशासनाचे आवाहन

सांगली,ता.१२(प्रतिनिधी)-

**नागरिकांनी जन्म किंवा मृत्यू झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे म्हणजेच ग्रामपंचायत अगर नगरपालिका किंवा महानगरपालिकेत नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे.**

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ नुसार ही प्रक्रिया राबविली जाते. शासनाच्या विविध योजना, शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती, पासपोर्ट, नोकरी, मतदानाचा हक्क, वारसाहक्क यासारख्या अनेक बाबी या नोंदणीशी थेट जोडलेल्या असल्याने नागरिकांनी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अनेक वेळा नागरिकांकडून दुर्लक्ष झाल्याने उशिरा नोंदणी करावी लागते. यामुळे अतिरिक्त दंड, चौकशी व कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे जन्म किंवा मृत्यूची घटना घडताच संबंधितांनी तातडीने नोंदणी करणे आवश्यक आहे.

शाळा व महाविद्यालयीन प्रवेश, आधार, पासपोर्ट, मतदान ओळखपत्र, त्याचप्रमाणे शासकीय योजना, शिष्यवृत्ती, वयाचा अधिकृत पुरावा आदींसाठी जन्मनोंदणीची आवश्यकता असते. वारसा हक्क व मालमत्ता हस्तांतरण, पेन्शन विमा दावा, बँक खाते बंद, हस्तांतरण, त्याचप्रमाणे शासकीय नोंदी अद्ययावत करण्यासाठी मृत्यू नोंदणी करणे गरजेचे आहे.

विलंब शुल्क - जन्म किंवा मृत्यूची घटना घडल्यापासून २१ दिवसांच्या आत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेत नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. मुदतीत नोंदणी केल्यास प्रमाणपत्र मोफत मिळते.२१ दिवसानंतर नोंदणीसाठी विलंब शुल्क आणि कागदपत्रांची पडताळणी करावी लागते. नगरपरिषद, नगर पंचायत, ग्रामपंचायत, शासकीय रुग्णालय किंवा नोंदणी केंद्रात नोंद करावी लागते.जन्म किंवा मृत्यूचे अधिकृत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रत्येकास नोंदणी करणे अनिवार्य आहे.

**प्रत्येक नागरिकांची कायदेशीर जबाबदारी**

जन्म व मृत्यू नोंदणी ही प्रत्येक नागरिकाची कायदेशीर जबाबदारी आहे. २१ दिवसांच्या आत नोंदणी केल्यास कोणताही अडथळा न येता प्रमाणपत्र मिळते. नागरिकांनी विलंब टाळून वेळेत नोंदणी करावी.

-डॉ.विजयकुमार वाघ,
जिल्हा आरोग्य अधिकारी.

**या कागदपत्रांची आवश्यकता -**

**जन्म**-रुग्णालयाचा जन्म दाखला, पालकांचे ओळखपत्र व पत्ता पुरावा.

**मृत्यू**-रुग्णालयाचा मृत्यू दाखला, अंत्यसंस्काराचा पुरावा व अर्जदाराचे ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

**विवाह नोंदणी**- विवाहानंतर ९० दिवसाच्या आत नोंदणी करा. (आवश्यक कागदपत्रे) - लग्नाचे फोटो, ओळखपत्र, वयाचा पुरावा इ.

# भाजप मंत्र्यांच्या गोंगाटाला पाटणच्या जनतेचे ठोस उत्तर -नाम.शंभुराज देसाई

पाटण ,ता.१२(प्रतिनिधी)-

**जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत पाटण तालुक्यात शिवसेनेने दणदणीत विजय मिळवत आपले राजकीय वर्चस्व अधोरेखित केले आहे. प्रचाराच्या काळात भारतीय जनता पक्षाच्या चार मंत्र्यांनी तालुक्यात येत टीका, आरोग्य आणि राजकीय वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला. मात्र, या सर्व गोंगाटाला पाटणच्या जनतेने मतपेटीतून ठोस आणि स्पष्ट उत्तर दिले, असे प्रतिपादन पालकमंत्री तथा पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.**

दौलतनगर (ता.पाटण) येथे विजयी उमेदवारांच्या जाहीर सभेत ते बोलत होते. सभेला मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई, यशराज देसाई, शिवसेना जिल्हाप्रमुख जयवंतराव शेलार, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) सरचिटणीस नरेश देसाई, तालुकाध्यक्ष राजाभाऊ काळे, उपजिल्हाप्रमुख सावळाराम लाड, राजेश शिंदे, विजय पवार, डी.पी.जाधव, विजयी उमेदवार व शिवसैनिक उपस्थित होते.ना.शंभूराज देसाई म्हणाले, बाहेरून येऊन वातावरण ढवळून काढण्याचा प्रयत्न झाला परंतु पाटणची जनता काम आणि विकासावरच निर्णय घेते. प्रचारादरम्यान करण्यात आलेल्या टांगा पलटी,घोडे फरार या वक्तव्याचा उल्लेख करत पालकमंत्र्यांनी विरोधकांवर टीका केली. पाटणच्या जनतेने शांतपणे आपला निर्णय नोंदवला.

# मिरजेत संस्कार भारतीतर्फे नाट्यरंग कार्यक्रम संपन्न

मिरज,ता.१२(प्रतिनिधी)-

**संस्कार भारती मिरज महानगर समितीच्या वतीने भरतमुनी स्मरण दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भरत मुनींच्या नाट्यशास्त्रावर आधारित अभिनयाचे विविध पैलू उलगडणारा नृत्य नाट्यमय कार्यक्रम नाट्यरंगचे आयोजन करण्यात आले होते.**



**भरतमुनी स्मरण दिन कार्यक्रमात ज्येष्ठ रंगकर्मी प्रशांत गोखले, ओंकार शिखरे, श्रावणी देशपांडे, वर्षा कुलकर्णी व मान्यवर.**

कार्यक्रमास ज्येष्ठ रंगकर्मी प्रशांत गोखले प्रमुख अतिथी म्हणून लाभले. प्रास्ताविक मंचीय कला संयोजिका सौ. वर्षा कुलकर्णी यांनी केले.समितीच्या उपाध्यक्षा डॉ. अनिता नातू यांनी प्रशांत गोखले यांचा परिचय करून दिला व सचिव सौ. अनघा राजोपाध्ये यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रशांत गोखले यांनी नाट्यशास्त्राचे महत्व व आपले अभिनय क्षेत्रातील अनुभव कथन केले. नाट्यरंग या कार्यक्रमात भरतमुनींच्या नाट्य शास्त्रातील अंगिक, वाचिक,आहार्य व सात्विक या अभिनय प्रकारांवर आधारित नृत्य व नाट्य सादर करण्यात आले. त्यानंतर संगीत देवबाभळी या प्राजक्त देशमुख लिखित नाटकातील काही भागाच्या अभिवाचनाचा रंगमंचीय नाट्याविष्कार सौ. उमा गोखले यांनी सादर केला.

डॉ.विद्या गोसावी लिखित व अभिनीत गोपिका हा गोपिकाबाई पेशवे यांच्या जीवनावरील एकपात्री नाट्य प्रयोग सादर झाला. त्यानंतर सौ. स्वरदा शिखरे व कु. गायत्री वझे व कु. साक्षी हिप्परगी यांनी द्रौपदी वस्त्रहरण हि नृत्यनाटिका सादर केली. या कार्यक्रमात ओंकार शिखरे यांचा विशेष सहभाग होता. आभारप्रदर्शन श्रावणी देशपांडे यांनी व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रजनी आपटे यांनी केले. एक आगळा वेगळा माहितीपूर्ण असा सुंदर कार्यक्रम पहायला मिळाला असे मत ज्येष्ठ लेखक व दिग्दर्शक राम कुलकर्णी यांनी व्यक्त केले. समितीचे अध्यक्ष श्रीधर देसाई सचिव सौ. अनघा राजोपाध्ये पश्चिम प्रांत मातृशक्ती संयोजिका राजश्री शिखरे यांच्या मार्गदर्शनाने व सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# वारणावती वसाहतीत खंडीत वीजपुरवठ्यामुळे अंधाराचे साम्राज्य

चांदोली,ता.१२(वार्ताहर)-

**वारणावती वसाहतीमध्ये मंगळवार पासून वीज वीजपुरवठा खंडित केला असल्याने येथील नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना वसाहतीची दुरावस्था, वन्य प्राण्यांचा वावर यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आहे.**

वीज पुरवठा सुरू करा, अशी विनंती केली होती मात्र अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही.दुसऱ्या दिवशीही त्यावर कोणताच तोडगा निघाला नाही शिवाय संबंधित अधिकाऱ्यांनी ही शासनाचा आदेश आहे असे म्हणून हात वर केले आहे. त्यामुळे वसाहतीमध्ये अंधाराचे साम्राज्य आहे.अजून किती दिवस रात्र अंधारात काढावी लागणार या विवंचनेत येथील नागरिक आहेत.

याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता ते म्हणाले, शासनाने महामंडळाच्या जागेवरील अतिक्रमण निकषित करण्याचे आदेश दिले आहेत. वसाहतीमध्ये राहणारे सर्व कर्मचारी, नागरिक हे अतिक्रमित आहेत. शासनाचे कोणीही कर्मचारी तेथे वास्तव्यास नाहीत त्यामुळे संबंधित नागरिकांना अतिक्रमणाची नोटीस दिली होती. पुढील टप्पा म्हणून वीज बंद करण्याचे वीज वितरणे आदेश दिले आहेत. नागरिकांना राहायचे असेल तर त्यांनी महामंडळाकडे पाठपुरावा करावा अन्यथा निवासस्थान रिकामे करून आपली सोय करावी. आम्हाला प्रस्ताव पाठवू नका, असे आदेश आहेत. त्यामुळे आम्ही काहीही करू शकत नाही. दुसरीकडे गेल्या ४० वर्षापासून आम्ही वसाहतीमध्ये राहत आहोत. सुरुवातीपासून आम्ही रितसर करार करून भाडेपट्टी तत्त्वावर वास्तव्यास आहोत. गेल्या वीस वर्षात शासनाने येथील व वसाहतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी एकही रुपया खर्च केलेला नाही. आम्ही स्वखर्चाने येथील निवासस्थानांची दुरुस्ती केली आहे. शासनाचे कुणीच कर्मचारी, अधिकारी इकडे फिरकत नसल्यामुळे करारही करण्यात आलेले नाहीत. करार नसल्यामुळे आम्हाला अतिक्रमित गणले जात आहे.आम्ही सगळेजण करार करायला तयार आहे. शासनाने योग्य ती भाडेपट्टी आकारून आमचे पूर्वीप्रमाणे करार करून घेऊन आमचे निवासस्थान नियमित करावे असे नागरिकांचे म्हणणे आहे.दुसरीकडे आमची लहान मुलं, बाळं आहेत. येथे वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. कोणतीही दुर्घटना घडली तर वीज पुरवठा बंद करून आम्हाला त्रास देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांना सोडणार नाही, अशा प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करू लागले आहेत.

माझे वडील शासकीय कर्मचारी होते. अनेक वर्षापासून आम्ही वसाहतीमध्ये राहत आहोत. वडील निवृत्त झाल्यानंतर आम्ही रितसर करार करून भाडेपट्टी ही भरली आहे. येथील कार्यालय कायम बंद आहे त्यामुळे करार करायला ही कोणी नाही त्यामुळे आता आम्हाला अतिक्रमित घोषित करून बेघर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

-गणेश बाळतुगडे



शासनाचा आदेश कोणताही असो. त्यावर पुढे मागे काहीतरी मार्ग निघेल किंवा निर्णय होईल. मात्र वीज पुरवठा खंडित करून नागरिकांच्या जीवाशी खेळणे आणि दुर्घटनेला आमंत्रण देणे हे समाजविघातक कृत्य आहे.

**मनीषा पाटील,पंचायत समिती सदस्य, मणदूर.**

**अंधारामुळे नागरिकांचा जीव धोक्यात**

**वीज सुरू करण्याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष**

# जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग

## महायुती आघाडीवर; शाहू विकास आघाडी,'जनसुराज्य'सह अपक्षांची भूमिका निर्णायक ठरणार

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्हा परिषद आणि १२ पंचायत समिती निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर जिल्ह्यातील सत्तासमीकरणाच्या हालचालींना वेग आला आहे. जिल्हा परिषदेत कोणत्याही एका पक्षाला स्वबळावर बहुमत न मिळाल्याने अध्यक्षपदाच्या निवडीसाठी संख्याबळाची बेरीज सुरू आहे. त्यासाठी राजकीय समन्वय आणि लहान गटांचा पाठिंबा या तिन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरणार आहेत. पुढील काही दिवसांत जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच पंचायत समित्यांतील सभापती पदांचा निर्णय होण्याची शक्यता आहे.**

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने २० जागांसह आघाडी घेतली आहे. काँग्रेसने १६ जागा जिंकत दुसरे स्थान मिळवले. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि इतर घटक पक्षांनीही आपापल्या ताकदीने जागा मिळवल्या आहेत. याशिवाय आमदार राजेंद्र पाटील (यड्रावकर) यांच्या राजर्षी शाहू विकास आघाडीने चार जागांवर विजय मिळवला आहे, तर आमदार विनयराव कोरे यांच्या जनसुराज्य शक्ती पक्षाने पाच जागा जिंकल्या आहेत.



### वरिष्ठ पातळीवरील चर्चेनंतर अंतिम निर्णय?

जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवड ही केवळ जागांची बेरीज नसून वरिष्ठ नेतृत्वाचे संकेत, स्थानिक समीकरणे आणि घटक पक्षांतील समन्वय यांचा एकत्रित परिणाम असणार आहे. यापूर्वीही जिल्ह्यातील सत्तासमीकरणात मुंबईतील नेतृत्वाचा प्रभाव दिसून आला आहे. त्यामुळे यावेळीही अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवरील चर्चेनंतरच निश्चित होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या निकालामुळे जिल्हा परिषदेत कोणत्याही एकाच पक्षाला सत्ता स्थापनेची संधी मिळालेली नाही. मात्र महायुतीतील राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेना या घटकांची एकत्रित संख्या बहुमताचा आकडा गाठत असल्याने सत्ता स्थापनेची आघाडी त्यांच्या बाजूने झुकलेली दिसते. सर्वाधिक जागा मिळाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अध्यक्षपदाची मागणी आहे.

अंतिम सत्तासमीकरणात राजर्षी शाहू विकास आघाडी आणि जनसुराज्य शक्ती पक्षाच्या भूमिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आमदार राजेंद्र पाटील (यड्रावकर) यांच्या नेतृत्वाखालील आघाडीच्या चार जागा आणि आमदार विनयराव कोरे यांच्या पक्षाच्या पाच जागा या दोन्ही मिळून अध्यक्षपदाच्या निवडीत निर्णायक ठरू शकतात. या दोन्ही नेत्यांचा जिल्ह्यातील स्थानिक पातळीवरील प्रभाव आणि संघटनात्मक जाळे लक्षात घेता त्यांच्या भूमिकेकडे सर्वच पक्षांचे लक्ष लागले आहे.

निकालानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री चंद्रकांत पाटील तसेच आमदार राजेंद्र पाटील (यड्रावकर) यांनी वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू केल्याची माहिती आहे. अध्यक्षपदाबरोबरच उपाध्यक्षपद, अर्थ, बांधकाम, महिला बाल विकास सभापतीपदे यांचा समतोल साधण्याचे आव्हान महायुतीसमोर आहे. घटक पक्षांमध्ये समन्वय साधत सन्मानजनक पदे वाटप करण्याची गरज निर्माण झाली आहे.

दुसरीकडे काँग्रेसने १६ जागांसह भक्कम कामगिरी केली असली तरी जिल्हा परिषद स्तरावर सत्ता स्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ त्यांच्या हातात नाही. महाविकास आघाडीतील स्थानिक नेते पर्यायी समीकरणांची चाचपणी करत आहेत. काही पंचायत समित्यांमध्ये संख्याबळात फारसा फरक नसल्याने तेथे अपक्ष आणि लहान गटांच्या मदतीने वेगळी सत्ता रचना उभी राहू शकते. अपक्ष सदस्यांची भूमिकाही काही ठिकाणी महत्त्वाची ठरणार आहे. विशेषतः पंचायत समित्यांमध्ये बहुमताचा आकडा कमी असल्याने एक-दोन सदस्यांच्या पाठिंब्याने सत्तेचे चित्र बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच पक्षांकडून संपर्क आणि चर्चांची प्रक्रिया सुरू आहे.

एकूणच, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांतील सत्तास्थापना प्रक्रियेत महायुती आघाडीवर असली तरी राजर्षी शाहू विकास आघाडी, जनसुराज्य शक्ती पक्ष आणि अपक्ष सदस्य यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. पुढील काही दिवसांत होणाऱ्या बैठका आणि चर्चांनंतर जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे चित्र स्पष्ट होईल.

# घोटवडे येथील स्वयंभू मंदिरात महाशिवरात्री महोत्सवाला प्रारंभ

भोगावती,ता.१२(वार्ताहर)-

**भाविकांची मनोकामना पूर्ण करणारा स्वयंभू देव अशी दृढ श्रद्धा असलेले घोटवडे (ता.राधानगरी) येथील शंभू महादेव मंदिर प्रसिद्ध आहे. महाशिवरात्री निमित्त भजन,कीर्तन,पारायण, प्रवचन आदी कार्यक्रमांचा शुभारंभ करण्यात आला आहे. हा महाशिवरात्री महोत्सव सोमवार ता.१६ फेब्रुवारीपर्यंत पार पडणार आहे.**



घोटवडे गावच्या पूर्वेकडे पुरातन काळापासून स्वयंभू शिव शंभू महादेवाचे मंदिर आहे.या मंदिरात शंभू महादेवाची सव्वा पाच फुटी उंचीची पाषाण मूर्ती आहे. भोगावती नदीच्या तीराशेजारी निसर्गरम्य वातावरणात आकर्षक असे स्वयंभू देवस्थान मंदिर आहे. दरवर्षी मंदिरात महाशिवरात्री यात्रा महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. स्वयंभू मंदिरात मनोभावे पूजा केल्यास भक्तांच्या मनोकामना लाभदायी ठरतात,अशी दृढ श्रद्धा भाविकांच्यात रूढ झाली आहे यामुळे महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक घोटवडे येथील स्वयंभू मंदिरात मनोभावे पूजा करून श्रींचे दर्शन घेतात. घोटवडे येथील दत्त भजनी मंडळ आणि गावातील सर्व तरुण मंडळे या यात्रा महोत्सवमध्ये सहभाग नोंदवतात. यंदाही महाशिवरात्री महोत्सव हा धार्मिक वातावरणात कीर्तन, प्रवचन, भजन, शिवलीला अमृत या ग्रंथाचे पारायण आदी कार्यक्रमाने साजरा केला जात असून युवकांचा सहभाग लक्षणीय आहे. यावर्षी रविवार ता.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री आहे. नेहमीच्या प्रथेनुसार दुसऱ्या दिवशी म्हणजेच सोमवार ता. १६ फेब्रुवारी रोजी महाप्रसाद आयोजित केला आहे. या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भोगावती परिसर आणि जिल्ह्यातील भाविक हजेरी लावतात.

# चुका सुधारण्यासाठी पुन्हा कामाला लागा-पाटणकर

पाटण,ता.१२(प्रतिनिधी)-

**निवडणूक संपली असली, तरी जनतेचे प्रश्न संपलेले नाहीत. पराभव आपल्याला आपल्या चुका सुधारण्याची संधी देतो. चुका सुधारणाराच भविष्यात विजेता ठरतो. त्यासाठी पुन्हा कामाला लागा, असे आवाहन भाजपचे महाराष्ट्र राज्य परिषदचे सदस्य व जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांनी केले.**

मोरगिरी (ता.पाटण) येथे नाटोशी गणातील मतदारांच्या आभार दौऱ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मारूल हवेली गणातील उमेदवार वैशाली गुरव, रंगराव जाधव, संजय हिरवे, शशिकांत प्रभाळे, अशोक मोरे, दिनकर गुरव, हिंदुराव शिर्के, निवास पाटील, मधुकर कुंभार, अशोक चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ, महिला, युवक उपस्थित होते.निवास पाटील यांनी प्रास्ताविक केले. हिंदुराव शिर्के यांनी आभार मानले.

# बाजारभोगाव गणात विरोधकांची रणनीती ठरली फोल

बाजारभोगाव,ता.१२(प्रतिनिधी)-

**बाजारभोगाव गणात आम. चंद्रदीप नरके आणि आम. विनय कोरे गटात रंगलेली लढत अखेर निर्णायक ठरली. अपेक्षेप्रमाणे शिवसेनेचे दत्तात्रय खोत यांनी जनसुराज्यचे युवराज चौगले यांना पराभवाचा जोरदार धक्का देत मैदान मारले. या निकालाने बाजारभोगाव गण हा नरके गटाचा अभेद्य बालेकिल्ला असल्याची मोहोर पुन्हा उमटली.**



दत्तात्रय खोत

कोरे गटाने मताधिक्याचा किल्ला ढासळवण्यासाठी आटोकाट प्रयत्नांची पराकाष्ठा केली, मात्र मतदारांनी भावनिक प्रचार आणि फाजील आत्मविश्वासाला स्पष्ट नकार दिला. मागील निवडणुकीत कुंभीचे संचालक पी.डी. पाटील यांचा एका मताने झालेला पराभव हा यावेळी प्रचाराचा मुख्य मुद्दा बनवण्यात आला. 'एक मत'या घोषणेवर वातावरण तापवण्याचा प्रयत्न झाला. आम.विनय कोरे यांनीही सभांतून त्याला धार देत विजयाची खात्री असल्याचा सूर लावला. स्व.नितीन पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करत भावनिक लाट निर्माण करण्याचाही डाव रचला गेला. पण मतदारांनी भावना नव्हे, तर संघटित ताकद आणि नियोजनाला पसंती दिली.

मागील धक्कादायक निकालाने आम. चंद्रदीप नरके यांचे डोळे उघडले होते. गटातील संभाव्य दुफळी भविष्यात घातक ठरू शकते,

### नरके गटाचा बालेकिल्ला पुन्हा अभेद्य

याची जाणीव ठेवत नरके बंधूंनी कार्यकर्त्यांना एकत्र बांधून ठेवले. उमेदवारीवरून दत्ता खोत आणि अमित काटकर यांच्यात चढाओढ झाली, नाराजीची कुजबुज सुरू झाली; मात्र पी.डी.पाटील आणि नरके यांनी संयमाने हस्तक्षेप करत काटकर यांच्यावर प्रचाराची जबाबदारी सोपवली. त्यामुळे विरोधकांना फूट पाडण्याची संधी मिळाली नाही.

दरम्यान,कोरे गटाने'फाटेल का?'या शक्यतेवर राजकारण करत वेळ घालवला. एक मताच्या गणितात गुरफटलेला गट प्रत्यक्ष जोडण्या मजबूत करण्यात मागे पडला. युवराज चौगले यांना उमेदवारी देत कोरे गटाने जोरदार सुरुवात केली होती. चौगले यांनी वातावरण तापवले; मात्र पोहाळे बोरगाव, पोहाळवाडीतील मताधिक्य विरोधी गट खेचणार हे गृहित धरुन आम.चंद्रदीप नरके व कुंभीचे संचालक पी.डी.पाटील व बाजारभोगावचे शिलेदार माजी उपसरपंच युवराज पाटील यांनी समीकरणे अचूक जुळवली.

युवा नेते नितीन हिर्डेकर यांना आपल्या तंबूत घेत निर्णायक डाव साधला. शेवटच्या दोन दिवसांत प्रचाराची दिशा पूर्ण बदलली. नरके गटाने जीवाचे रान करत मतदानाच्या क्षणापर्यंत मतदारांशी नाळ घट्ट ठेवली. रात्रीच्या जोडण्यांनी हवा बदलेल, असा कोरे गटाचा अंदाज फोल ठरला.





महापौर उदय धातुंडे,उपमहापौर अनिल डाळ्या यांनी पदभार स्विकारला.त्याप्रसंगी आम.राहूल आवाडे,माजी मंत्री प्रकाश आवाडे,भाजपा प्रदेशाध्यक्ष सुरेश हाळवणकर,आयुक्त पल्लवी पाटील व इतर मान्यवर.(छाया : छोटूसिंग)

# कचरा उठावासह पाणी प्रश्न मार्गी लावू : महापौर धातुंडे

## रस्ते धुळमुक्त करण्याचा २१ दिवसाचा उपक्रम : उपमहापौर डाळ्या

इचलकरंजी, ता. १२–

**शहरातील दैनंदिन कचरा उठाव आणि सफाईला प्राधान्य देण्यासह जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू अशी ग्वाही नूतन महापौर उदय धातुंडे यांनी दिली. तर शहरातील रस्ते धुळमुक्त करण्याचा २१ दिवसाचा उपक्रम हाती घेतला असून भटक्या कुत्र्यांचा उच्छाद रोखण्यासाठी कडक उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही नुतन उपमहापौर अनिल डाळ्या यांनी दिली.**

इचलकरंजी महानगरपालिकेचे नूतन महापौर उदय धातुंडे आणि उपमहापौर अनिल डाळ्या यांनी गुरुवारी आमदार राहुल आवाडे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, भाजप गटनेता विठ्ठल चोपडे, आयुक्त पल्लवी पाटील यांच्यासह महायुतीच्या नगरसेवकांच्या उपस्थितीत पदभार स्विकारला. यावेळी महापौर धातुंडे आणि उपमहापौर यांनी आपण शहराच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबद्ध असल्याचे सांगत आता प्रशासन गतिमान करणार असल्याचे सांगितले.

महापौर धातुंडे हे पदभार स्विकारताना भगतराम छाबडा, प्रकाश दत्तवाडे, बाळासाहेब कलागते, तानाजी पोवार,श्रीरंग खवरे, शशिकांत मोहिते तर उपमहापौर डाळ्या हे पदभार स्विकारताना सर्व मान्यवरांसह त्यांचे वडील देवकरण डाळ्या, मातोश्री शांतीदेवी डाळ्या, सतिश पंडीत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पत्रकारांशी बोलताना महापौर धातुंडे यांनी, गत चार वर्षांपासून महानगरपालिकेत प्रशासकराज होते. त्यामुळे नागरिकांची अनेक कामे खोळंबली आहेत. ती प्रलंबित कामे मार्गी लावण्यासह आमदार राहुल आवाडे यांच्या प्रयत्नातून आणलेला निधी त्या त्या कामावर खर्च करून विविध सोयी –सुविधा पूर्ण करण्याचा प्रयत्न राहिल. शहरातील स्वच्छता व कचरा उठावाला प्राधान्य देऊ. त्या संदर्भात लवकरच आरोग्य विभागाची बैठक घेऊ. पंचगंगा पाणी प्रदूषण रोखण्यासाठी वेळप्रसंगी कठोर पावले उचलून नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रयत्नशील राहू. शहरवासीयांना १–२ दिवस आड पाणी पुरवठ्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे धातुंडे यांनी सांगितले.

उपमहापौर अनिल डाळ्या यांनी, पदभार स्विकारण्यापूर्वी शहरातील प्रमुख रस्ते धूळमुक्त करण्याचा उपक्रम आपण हाती घेतला आहे. हा उपक्रम २१ दिवस चालणार असल्याचे नमूद केले. शहर परिसरात वाढत चाललेला भटक्या कुत्र्यांचा उच्छाद रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचा आपला प्रयत्न राहिल.सद्यस्थित असलेल्या मुताऱ्यांची दूरवस्था दूर करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. लहान–मोठे बगीचे विकसीत करण्याचा आपला मानस असल्याचे सांगत महापालिकेच्या ई बसमध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा मिळण्यासाठी प्रयत्नशिल राहू. भविष्यात आमदार राहुल आवाडे यांच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी मोठा निधी आणण्यासाठी पाठपुरावा करू, असेही सांगितले.

# स्वीकृत नगरसेवकांसह विविध समिती निवडीसाठी २० रोजी सर्वसाधारण सभा

इचलकरंजी,ता.१२–

**इचलकरंजी महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर व उपमहापौर पदांची निवडीचे सोपस्कार पूर्ण झाले आहे. आता शुक्रवारी २० फेब्रुवारी रोजी स्वीकृत नगरसेवकांसह स्थायी समिती, परिवहन समिती, महिला व बालकल्याण समिती, विशेष समिती तसेच चार प्रभाग समिती स्थापन करण्यासाठी सदस्या निवडीकरीता सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे.**



महापौर उदय धातुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२.१५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ही सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली आहे. दरम्यान, निवडीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला असून इच्छुक मंडळींनी आपापल्या पद्धतीने फिल्डिंग लावण्यास सुरूवात केली आहे.

महानगरपालिकेची पहिली निवडणूक पार पडल्यानंतर महापौरपदी उदय धातुंडे व उपमहापौरपदी अनिल डाळ्या यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर शुक्रवारी २० रोजी पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सभेमध्ये सहा नामनिर्देशित सदस्य, स्थायी समिती १६ सदस्य, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची नेमणूक करणे यामध्ये एकूण संख्यापैकी किमान ७५ टक्के महिला सदस्य असणे आवश्यक आहे. त्यानंतर विशेष समिती स्थापन करणे व सदस्य संख्या निश्चित करणे, सध्या महानगरपालिकेचे सुरू असलेल्या चार विभागीय कार्यामध्ये चार प्रभाग सदस्यांची स्थापना करणे तसेच अध्यक्ष यांच्या परवानगीने या विषयावर चर्चा करणे असे आठ विषय विषयपत्रिकेवर ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे इच्छुक मंडळींनी आपल्याला हवे असणारे पद मिळवण्यासाठी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा राजकीय हालचालींना वेग आला आहे.या सभेत सर्व सदस्यांची संख्या निश्चित केल्यानंतर सदस्यांची नावे मंजुरीसाठी पुणे विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठवण्यात येतील. त्यांच्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर समित्यांच्या सभापती निवडीसाठी महापौर विशेष सभेचे आयोजन करतील.

# अ‍ॅस्टर डीएम हेल्थकेअर आणि कॉलिटी केअर इंडिया विलीनीकरणास एन.सी.एल.टी.ची मंजुरी

कोल्हापूर ता.१२ (प्रतिनिधी)–

Aster DM Healthcare **आणि** Quality Care India Lt **व यांच्या विलीनीकरण प्रक्रियेला महत्त्वाचा टप्पा पार पडला असून, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) यांनी भागधारक व कर्जदारांची बैठक बोलावण्यास मंजुरी दिली आहे. या व्यवहारास यापूर्वीच CCI आणि स्टॉक एक्स्चेंजची मंजुरी मिळाली आहे. विलीनीकरणानंतर स्थापन होणारी** Aster DM Quality Care Ltd **ही देशातील अव्वल तीन रुग्णालय साखळ्यांपैकी एक ठरणार असून, देशभरात १०,३६० हून अधिक खाटांची सुविधा उपलब्ध होणार आहे.**

भारतातील आरोग्यसेवा क्षेत्रातील एक ऐतिहासिक विलीनीकरण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अ‍ॅस्टर डीएम हेल्थकेअर लिमिटेड आणि कॉलिटी केअर इंडिया लिमिटेड यांच्या विलीनीकरणाला नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (एन.सी.एल.टी.), हैदराबाद खंडपीठाची महत्त्वपूर्ण मंजुरी मिळाली आहे. या आदेशानुसार शेअरहोल्डर्स आणि अनसिक्युअर्ड ट्रेड क्रेडिटर्स यांच्या बैठका घेण्यास परवानगी देण्यात आली असून, या सभा २७ फेब्रुवारी ते १३ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित केल्या जाणार आहेत.

या विलीनीकरण व्यवहारास यापूर्वीच कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया (सी. सी. आय.) तसेच स्टॉक एक्सचेंजकडून नो ऑब्जेक्शन प्राप्त झाले आहे. सर्व नियामक मंजुरीनंतर हा व्यवहार आर्थिक वर्ष २०२६–२७ च्या पहिल्या तिमाहीत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. विलीनीकरणानंतर स्थापन होणारी नवीन संस्था अ‍ॅस्टर डीएम कॉलिटी केअर लिमिटेड ही अ‍ॅस्टर प्रमोटर्स आणि ब्लॅकस्टोन यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत राहणार असून, देशभरात दर्जेदार, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही संस्था काम करणार आहे.

अ‍ॅस्टर डीएम हेल्थकेअरचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. आझाद मोपेन म्हणाले की, विलीनीकरण प्रक्रियेत आतापर्यंत झालेल्या लक्षणीय प्रगतीबाबत आम्ही अत्यंत समाधानी आहोत. स्टेकहोल्डर तसेच अनसिक्युअर्ड ट्रेड क्रेडिटर्सची मंजुरी आणि एनसीएलटीच्या आदेशानुसार ही प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होईल, याबाबत आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

# व्यवसायाभिमुख व्यक्तिमत्व : उद्योजक दत्तात्रय उघडे

**वस्त्रनगरीतील प्रसिद्ध उद्योगपती दत्तात्रय माणिकराव उघडे यांच्या वाढदिनानिमित त्यांच्या उत्तुंग कार्याचा घेतलेला हा आढावा...**

मुळच्या सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील रहिवासी असलेल्या सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला.कुटुंबातील एकूण सदस्यांपैकी आई,वडील, दोन मोठे भाऊ व बहीण असा परिवार.

लहानपणासूनच घरच्या परिस्थितीची जाणीव असल्याने आपण काहीतरी वेगळे करायची जिद्द उराशी बाळगून वडिलांसोबत १९७२ च्या दुष्काळानंतर उघडे कुटुंबीय कामाच्या शोधात इचलकरंजी येथे आले.

आपला मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून माणिकराव उघडे यांनी गोविंदराव हायस्कूल या ठिकाणी त्यांनी दत्तात्रय उघडे यांचा प्रवेश घेतला. घरच्या प्रतिकूल परिस्थितीत मुळ शिक्षण घेत असतानाच दत्तात्रय उघडे यांनी कमवा व शिका याचा अवलंब करत सुरवातीस लक्ष्मी प्रोसेस येथे काम करण्यास सुरवात केली. त्यांनी श्री.ना. बा. शिक्षण संस्थेच्याच श्री.व्यंकटेश महाविद्यालयात आपली बी. कॉम ची पदवी प्राप्त केली.

आई वडील हे जरी शेतकरी असले तरी दत्तात्रय यांना मात्र आपण काहीतरी वेगळे केले पाहिजे आपल्या परिवारासाठी आधाराचा हात दिला पाहिजे हे मनाशी पक्क ठरवले होते.

आपण व्यवसायातच उतरायचे हे ठरवले. इचलकरंजी मध्ये नुकताच नव्याने सुरू झालेल्या अ‍ॅल्युमिनियम विंडोचा व्यवसाय सुरू झाला होता. त्यामध्ये त्यांनी नवनिर्मितीची संधी ओळखून त्या ठिकाणी नोकरी करण्यास सुरुवात केली. तेथे काम करत असताना आपल्या अभ्यासू व चिकित्सक वृत्तीने त्यांनी त्या व्यवसायातील सर्व बारकावे जवळून बघितले. त्याचा योग्य तो अभ्यास केला. आपण देखील अशा पद्धतीचा छोटा का होईना पण व्यवसाय सुरू करावा या भावनेने त्यांनी थोडे भाग भांडवल गोळा करून मंगळवार पेठ होळी कट्टा येथे एकदम छोट्याशा जागेत जयदत्त अल्युमिनियम या नावाने व्यवसाय सुरू केला. ग्राहकापर्यंत कसे पोहोचायचे आपल्या कामाची गुणवत्ता त्यांना कशी पटवून द्यायची त्यांच्याकडून कसे काम मिळवायचे यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले. प्रामाणिकतेच्या विश्वासावर त्यांनी अल्पावधीतच बाजारात आपली कामातून ओळख निर्माण केली.

आपला गुणवत्तेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच व्यवसायात आपला उत्तम जम बसवला. व्यवसायात विस्तारासाठी जागा अपुरी पडू लागल्यामुळे त्यांनी आपला व्यवसाय सांगली रोड सहकार नगर परिसरात स्थलांतरित केला. व्यवसायात आपली घडी बसते ना बसते तोच ७ फेब्रुवारी २००९ साली आलेल्या ग्लासच्या तीन कंटेनर मधील ग्लास लावत असताना ग्लासची थप्पी एकदम कोसळली. सुदैवाने त्यात कोणतीही जीवित हानी झाली नाही परंतु दत्तात्रय उघडे यांचे २५ लाखांचे मोठे नुकसान झाले.



नुकताच व्यवसाय सुरळीत सुरू असताना झालेले हे प्रचंड नुकसान न भरून निघण्यासारखे होते. पण तरीही त्यांनी खचून न जाता संपूर्ण ताकदीनिशी परिस्थितीशी दोन हात करत पुन्हा फिनिक्स पक्षाप्रमाणे उंच भरारी घेत थोड्याच दिवसात सहकार नगर येथील जगताप मंगल कार्यालये खरेदी केले. आणि आपला व्यवसाय त्या ठिकाणी दिमाखात उभा केला.

तेथे अल्युमिनियम विंडो साठी लागणारे पावडर कोटिंग व कलर अन्याडोईज असा प्लांट सुरू केला. कोकण , कर्नाटक , गोवा राज्यात आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यास सुरवात केली. उत्तम गुणवत्ता, आणि योग्य दर या सूत्राच्या जोरावर त्यांनी बघता बघता महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा राज्यात आपल्या व्यवसायाची वेगळी ओळख निर्माण करत ग्राहकांचा मोठा विश्वास संपादन केला. संजय घोडावत, भारती विद्यापीठ सारख्या अनेक मोठ्या शैक्षणिक संस्थांची कामे आपल्याकडे आकर्षित केली.

पुढे व्यवसायातील बारकावे व भविष्यातील ग्राहकाची गरज ओळखून कच्च्या ग्लास वर टफनची प्रोसेसिंग करणारा आपल्या गावातील एकमेव प्लांट असून त्यांनी सोलगे मळा, शहापूर येथे जयदत्त टफ ग्लास या नावाने दुसरी फर्म दिमाखात सुरू केली. पुढे आपली ही घौडदौड अशीच सुरु ठेवत प्रगती करत युपिव्हिसी विंडोचा साउंड प्रुफ व एअर टाईट असा वेगळा प्लांट सुरू केला. हळूहळू त्यांनी ग्लास व अल्युमिनियम क्षेत्रातील ग्लास प्रिंटिंग, ग्लास इचिंग, अल्तेजा सिस्टीम विंडो अँड डोअर, एअर अँड साउंड प्रुफ केबिन, डी.जी.यू, ग्लास लॅमिनेशन या सोबत फॉरवर्ड टफन टेक्नॉलॉजी प्लांटची उभारणी करत जयदत्त परिवाराची जयदत्त अ‍ॅल्युमिनियम ग्लास प्रायव्हेट लिमिटेड अशी नवी ओळख नावारूपास केली आहे.

दत्तात्रय उघडे यांनी आपल्या प्रामाणिक, प्रेमळ, होतकरू स्वभावाच्या जोरावर जयदत्त अल्युमिनियम अँड ग्लास प्रायव्हेट लिमिटेड च्या माध्यमातून आज २०० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या परिवाराचे पालकत्व स्वीकारले आहे. मध्यंतरीच्या काळात दुर्दैवाने दत्तात्रय उघडे यांचे दोन्हीही मोठे बंधू , व कालांतराने वडिलांचे निधन झाले. वयाने छोटे असून सुद्धा खचून न जाता संपूर्ण उघडे परिवाराची कुटुंब प्रमुख म्हणून जबाबदारी सक्षमपणे सांभाळत आहेत. त्यांच्या मातोश्री , व त्यांच्या पत्नी प्रत्येक परिस्थितीत ह्या दोघीही त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभ्या आहेत.

एकूणच दत्तात्रय उघडे यांनी २००५ साली लावलेल्या या छोट्या रोपट्याचे वट वृक्षात रूपांतर होत असताना पाहून समाजातील प्रत्येकालाच नक्कीच अभिमान आणि प्रेरणा मिळेल.उद्योजकता क्षेत्रात योग्य नियोजन आणि योग्य मार्गदर्शनाने व्यवसायाभिमुख व्यक्ती कल्पनांना प्रत्यक्षात आणून यश मिळवू शकतात.याचेच उदाहरण श्री.उघडे यांच्याबाबतीत लागू पडते. आपल्या कृष्णासारख्या धोरणी आणि कर्णा सारख्या उदार मनाच्या दत्तात्रय उघडे यांना त्यांच्या वाढदिनी लाख लाख शुभेच्छा...!

**सर्व कर्मचारी,**
**अँड ऑफिस स्टाफ**
**जयदत्त अल्युमिनियम अँड ग्लास प्रायव्हेट लिमिटेड.**

सारंग दास

## दगडाने मारहाण केल्याप्रकरणी एका विरूध्द गुन्हा

सांगली, ता. १२(प्रतिनिधी)–

**अंगावर गाडी का घातलास म्हणून निखील लक्ष्मण आवळे (वय ३१, रा. चिंतामणीनगर, आरटीओ ऑफीसजवळ) याला दगडाने डोळ्याजवळ मारून जखमी केल्याचा प्रकार घडला.**

याबाबत संशयित गणेश मुर्गाप्पा कांबळे (रा. इंदिरानगर) याच्याविरूद्ध विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

निखील आवळे हा बुधवारी दुपारी एकच्या सुमारास शंभरफुटी रस्त्यावरील चेतना पेट्रोलपंपावर पेट्रोल भरून घरी जात होता. तेव्हा गणेश याने त्याला अडवले. माझ्या अंगावर गाडी का घातलास म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर खाली पडलेला दगड उचलून डोळ्याच्या वर मारून जखमी केले.


**इचलकरंजी महानगरपालिका, जिल्हा कोल्हापूर**
**नगरसचिव विभाग**
**नोटीस**

याद्वारे इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. सदस्य यांना नोटीस देणेत येते की, इचलकरंजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २०/०२/२०२६ रोजी दुपारी १२.१५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे भरविणेत येत आहे.

सही/–
**(राहूल पोटे)**
प्र. नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका



हार्दिक शुभेच्छा !

**आमचे परममित्र व सहकारी मा. श्री. नारायण वग्रे यांना वाढदिवसाच्या कोटी–कोटी शुभेच्छा !**



**मा. श्री. नारायण वग्रे**

**सचिन पोवार** - कार्यकारिणी सदस्य भारतीय जनता पार्टी
**प्रकाश आडके** - सामाजिक कार्यकर्ते



kpt.co.in

KPT POWER TOOLS
KPT BLOWERS
KPT E VEHICLES

**KPT Industries Ltd.®**
Regd. Office: Gat No. 320, Mouje Agar,
A/P & Taluka: Shirol 416 103, Dist. Kolhapur, MH, INDIA.
CIN: L29130MH1976PLC019147
Tel. : 0231 3528151

**Un- audited financial results for the quarter and nine months ended on 31st December, 2025**

( Rs. In lakhs except EPS)

| Particulars | Quarter ended on | | | Nine Months ended on | | Year ended on |
|---|---|---|---|---|---|---|
| | 31/12/2025 (Un-audited) | 30/09/2025 (Un-audited) | 31/12/2024 (Un-audited) | 31/12/2025 (Un-audited) | 31/12 /2024 (Un-audited) | 31/03/2025 (Audited) |
| Total income from operations (Net) | 4,104.48 | 4,389.01 | 4,039.49 | 12,370.73 | 12,635.95 | 16,605.12 |
| Profit/(Loss) for the period Before Exceptional Items | 407.17 | 505.24 | 406.23 | 1,322.26 | 1,484.66 | 1,888.30 |
| Profit/(Loss) for the period Before Tax | 354.32 | 505.24 | 406.23 | 1,269.41 | 1,484.66 | 1,888.30 |
| Net Profit/(Loss)for the period After Tax | 256.53 | 360.40 | 286.45 | 924.08 | 1,091.60 | 1,392.69 |
| Total comprehensive income for the period comprising profit for the period (after tax) and other comprehensive income (after tax) | 231.98 | 359.23 | 284.95 | 897.19 | 1,087.85 | 1,388.01 |
| Equity Share Capital (Face Value of Rs. 5/- each) | 170.00 | 170.00 | 170.00 | 170.00 | 170.00 | 170.00 |
| Other Equity | - | - | - | - | - | 6,668.67 |
| Earnings Per Share of Rs. 5/- each Basic | 7.54 | 10.60 | 8.43 | 27.18 | 32.11 | 40.96 |
| Diluted | 7.54 | 10.60 | 8.43 | 27.18 | 32.11 | 40.96 |

**Note**: The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly/annual financial results are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and Company's website.(www.kpt.co.in)

Place : Pune
Date : 12th February, 2026

By Order of the Board of Directors
**KPT** Industries **Limited**
**Dilip Kulkarni**
Managing Director
DIN No.00184727



## ई–निविदा सुचना क्र. ७०/२०२५–२०२६
## संक्षिप्त निविदा सुचना

कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, कोल्हापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) खात्याकडून शासन निर्णयानुसार आवश्यक तत्सम कामाचा अनुभव असलेले कंत्राटदार यांचेकडून ब–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे https://mahatenders.gov.in संकेतस्थळ येथून डाऊनलोड करण्यात यावी तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, सा. बां. खाते, कोल्हापूर यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची एकूण अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| 1 | Name Of Work- Est No.142055 of 2025-2026 Providing Internal & External Electrification, Fire Fighting, CCTV,PA, HVAC System & Illumination to the Shree Jyotiba Temple, at Wadi Ratnagiri Tal-Panhala, Dist. Kolhapur. | रु.157340679.00 |

१) ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दि. १३.०२.२०२६ ते दि. २०.०२.२०२६
२) ई–निविदा पूर्व बैठक व वेळ :– दि.१७.०२.२०२६ रोजी १२.३० दृकश्राव्य माध्यमाद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांचे कार्यालय यांचे कार्यालयात (निविदाकारांनी आपल्या शंका दिनांक.१६.०२.२०२६ रोजी १७:०० वाजेपर्यंत elkolhapur.ee@mahapwd.gov.in या ई–मेलवर पाठविण्यात याव्यात)
३) ई–निविदा उघडणे :– दि.२३.०२.२०२६ रोजी १२:३० वा. अधिक्षक अभियंता (विद्युत), पुणे प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांचे कार्यालय, दाते बंगला, शासकिय दुध योजना आवार, खडकी, पुणे– ४११००३

https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. (ई–निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल)

**सही/–**
**संजीवनी धनंजय कट्टी**
**कार्यकारी अभियंता,**
**कोल्हापूर विद्युत विभाग (सा.बां.) कोल्हापूर**



**कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय – ४१६ ००३.**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. : (०२३१) २६६६८५५<br>ई मेल : spkolhapur.ee@mahapwd.gov.in | फॅक्स नं. : (०२३१) २६५०१४०<br>वेब साईट : www.mahapwd.com |
| जा. क्र. लेखा/निविदा/सु.क्र.४०/४२९/२०२५ | दिनांक : १०/०२/२०२६ |

## ई – निविदा सूचना क्रमांक ४० सन २०२५–२६ (ऑनलाईन)

कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील नमुन्यातील (B-1) निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिद्ध केलेल्या व कॉन्ट्रॅक्ट डाटामधील अटी तांत्रिक स्पेसिफिकेशन व शेड्युलड – बी मधील परिमाण हे बिड डाटा निविदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रू. लक्ष | इसारा रक्कम | निविदा फी रूपये | काम पुर्ण करणेचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शाहुवाडी येथील पोलिस स्टेशन इमारतीची (मुद्देमाल कक्ष व हिरकणी कक्ष) दुरूस्ती करणे. ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर (द्वितीय मागणी) | ८.०० (रूपये आठ लक्ष हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |
| २ | शाहुवाडी येथील पोलिस स्टेशन परिसरात संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर (भाग–१) (द्वितीय मागणी ) | ८.४३ (रूपये आठ लक्ष त्रेचाळीस हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |
| ३ | शाहुवाडी येथील पोलिस स्टेशन आवारामध्ये नागरिकांसाठी अद्ययावत बैठक व्यवस्था करणे (खोली बांधकाम) | ८.४२ (रूपये आठ लक्ष बेचाळीस हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |
| ४ | शाहुवाडी येथील पोलिस स्टेशन आवारामध्ये पार्किंग शेड उभारणे | ८.४६ (रूपये आठ लक्ष सेहेचाळीस हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |
| ५ | शाहुवाडी येथील पोलिस स्टेशन आवारामध्ये महिला समुपदेशनासाठी रूम बांधणे | ८.४८ (रूपये आठ लक्ष आठेचाळीस हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |
| ६ | शाहुवाडी येथील पोलिस स्टेशन आवारामध्ये सिमेंट काँक्रीट करणे | ८.४८ (रूपये आठ लक्ष आठेचाळीस हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |
| ७ | गगनबावडा तालुका जि. कोल्हापूर येथील तहसिलदार गगनबावडा, प्रशासकीय इमारतीच्या आवारामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ८.४३ (रूपये आठ लक्ष त्रेचाळीस हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |
| ८ | गगनबावडा येथील प्रशासकीय इमारत मधील तहसिलदार गगनबावडा कार्यालय आवारात काँक्रीट रस्ता करणे. ता. गगनबावडा | ८.४४ (रूपये आठ लक्ष चव्वेचाळीस हजार) | ९,०००/– | ५००/– + GST | ६ महिने | वर्ग–७ व त्यावरील |

**ई – निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ऑफलाईन निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक :–१३/०२/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते दिनांक २०/०२/२०२६ (सायं. १८.०० पर्यंत) |
| निविदा संचाची फी व इतर मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २३/०२/२०२६ (सायं.१७.०० पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे दिनांक व वेळ **(शक्य झाल्यास)** | दि. २४/०२/२०२६ (१७.०० नंतर) |

**टीप :–**
१) सर्व पात्र / इच्छूक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या Main Portal - https://mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.
२) निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरित करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी ईमेल support-eproc@nic.in व दूरध्वनी क्रमांक ०१२०– ४२००४६२, ०१२०–४००१००२ वर संपर्क साधावा.
३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कमेची ऑनलाईन पावती, ऑनलाईन कोरा निविदा संच, डाऊन लोड केलेली पावती, स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगून ई–निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
४) निविदेचे वेळापत्रक, इतर अटी व शर्ती तसेच अनुषंगीक बदल ई–निविदा पोर्टलवर https://mahatenders.gov.in पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार सक्षम अधिकारी कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
५) वरील कामांची ई–निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/–**
**(चं. अ. आयरेकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**विशेष प्रकल्प (सा. बां.) विभाग, कोल्हापूर.**

विमाका/कोल्हापूर/२७१/२०२५–२०२६

# बांगलादेशला उपरती

## बीसीसीआयशी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्नशील

ढाका, ता. १२–

**बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे (बीसीबी) अध्यक्ष अमिनुल इस्लाम हे बीसीसीआयशी त्यांचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न करू इच्छित आहेत. इस्लाम यांनी सांगितले आहे की, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील टी–२० विश्वचषक सामना पाहण्यासाठी कोलंबोला जाणार आहेत आणि गेल्या काही आठवड्यांतील तणावपूर्ण वातावरणानंतर बीसीसीआयशी त्यांचे संबंध सुधारतील, अशी त्यांना आशा आहे. त्यांना या हाय–प्रोफाइल सामन्यासाठी आयसीसीकडून आमंत्रण मिळाले आहे.**

इस्लाम यांनी सांगितले की, पाच आशियाई देश आयसीसीचे प्रमुख भागधारक आहेत आणि त्यांना असे वाटते की १५ फेब्रुवारी रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यासाठी पाचही आशियाई देशांचे प्रतिनिधी स्टेडियममध्ये एकत्र उपस्थित राहून सामना पाहण्यासाठी आणि एकमेकांशी संवाद साधण्यासाठी उपस्थित राहावेत.भारत, पाकिस्तान, श्रीलंका,बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे आयसीसीचे प्रमुख आशियाई सदस्य आहेत. इस्लाम म्हणाले,बीसीसीआय आणि बीसीबीमधील वाद तेव्हा सुरू झाला जेव्हा बीसीसीआयने कोलकाता नाईट रायडर्सना बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला सोडण्याचे आदेश दिले. सुरक्षेच्या कारणास्तव बांगलादेशने विश्वचषक सामन्यांसाठी भारतात येण्यास नकार दिला. त्यानंतर, आयसीसीने विश्वचषक सामने भारताबाहेर खेळण्याची बांगलादेशची मागणी फेटाळून लावली.बांगलादेश आपल्या भूमिकेवर ठाम राहिला आणि त्यांना स्पर्धेतून काढून टाकण्यात आले, तर स्कॉटलंडला त्यांचे स्थान देण्यात आले.आयसीसीकडून मिळालेल्या आश्वासनांना अंतिम स्वरूप देण्यासाठी बोर्ड एक सामंजस्य करार तयार करेल.

# भारताचा नामिबियावर विजय

## टीम इंडियाचा सुपर–८ मध्ये प्रवेश निश्चित

## हार्दिक–इशान–वरूण ठरले विजयाचे स्टार



दिल्ली,ता.१२–

**भारताने नामिबिया संघावर टी–२० वर्ल्डकप सामन्यात तब्बल ९३ धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. यासह भारतीय संघाने टी–२० वर्ल्डकप इतिहासातील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला आहे. या सामन्यात टीम इंडियाने दोन्ही डावांमध्ये चांगली कामगिरी करत सामना सहज आपल्या नावे केला. हार्दिक पंड्याने या सामन्यात अष्टपैलू कामगिरी केली. तर फलंदाजीत इशान किशन व संजू सॅमसनने संघाला चांगली सुरूवात करून दिली. तर भारताच्या गोलंदाजांनी टीम इंडियाला पुन्हा एकदा सामना जिंकून दिला आहे.**

नामिबिया संघाला पराभूत करत भारताने टी–२० विश्वचषक २०२६ मधील सलग दुसरा सामना जिंकत सुपर–८ साठी आपला मार्ग अधिक सुकर केला आहे. दोन्ही सामन्यांमध्ये भारताच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली आहे. तर नामिबियाने सलग दुसरा सामना गमावला आहे.

भारताने दिलेल्या २१० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नामिबियाने सावध फलंदाजी करत सुरूवात केली. सलामीवीर स्टीनकॅम्प व फ्रायलिंक यांनी ३३ धावांची भागीदारी रचली. यानंतर फ्रायलिंकला अर्शदीपने बाद केल्यानंतर स्टीनकॅम्प व लॉफ्टीइटन यांनी ३४ धावांची भागीदीरी रचली. पण वरूणने येताच पहिल्या चेंडूवर स्टीनकॅम्पला क्लीन बोल्ड केल्यानंतर नामिबियाने झटपट विकेट्स गमावले. स्टीनकॅम्प २९ धावा तर फ्रायलिंक २२ धावा करत बाद झाले. तर लॉफ्टीईटनने १३ धावा केल्या. तर कर्णधार गेराहार्ड इरॅस्मसला १८ धावांवर माघारी परतावे लागले. ज्याने २ षटकार लगावत दणक्यात सुरूवात केली होती.

पहिल्या ४ फलंदाजांनी चांगली सुरूवात केली, पण भारताच्या गोलंदाजीसमोर ते मोठी खेळी करू शकले नाहीत. भारताकडून या सामन्यात मिस्ट्री स्पिनर वरूण चक्रवर्तीने सर्वाधिक ३ विकेट्स, तर हार्दिक पंड्या व अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २–२ विकेट्स घेतल्या. तर अर्शदीप सिंग, शिवम दुबे व बुमराह यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतली.

नामिबियाने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. प्रथम फलंदाजीला उतरलेल्या भारताने दणक्यात सुरूवात केली. संजू सॅमसनने ८ चेंडूत २२ धावांची खेळी करत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. यानंतर इशान किशन व तिलक वर्माने पॉवरप्लेमध्ये ८६ धावा करत सर्वात मोठा पॉवरप्ले स्कोअर उभारला. यासह ७ षटकांत भारताने १०० धावांचा आकडा पार केला, जे सगळ्यात फास्टेट टीम हंड्रेड आहेत.

इशान किशनने तर वादळी खेळी केली. इशान किशन २४ चेंडूत ६ चौकार व ५ षटकारांसह ६१ धावा करत बाद झाला. तर तिलक वर्माने २५ धावांचे व कर्णधार सूर्यकुमार यादवने १२ धावांचे योगदान दिले. हार्दिक पंड्याने २८ चेंडूत ४ चौकार व ४ षटकारांसह ५२ धावांची वादळी खेळी केली. तर शिवम दुबेने २३ धावांचे योगदान दिले. यासह भारताने ९ बाद २०९ धावांची खेळी केली.नामिबियाच्या गोलंदाजांनी भारताच्या फलंदाजांना फार मोठी धावसंख्या उभारू दिली नाही.

पॉवरप्लेनंतर नामिबियाने झटपट भारताच्या फलंदाजांना माघारी धाडले. नामिबियाकडून कर्णधार गेराहर्ड इरास्मसने उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्याने ४ षटकांत २० धावा देत ४ विकेट्स घेतल्या. बेन शिकोन्गो, स्मिट, बेर्नार्ड यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.

# यावर्षी चार महाराष्ट्र केसरी ?

## एका किताबासाठी चार संघटनांचे दावे

शिराळा,ता.१२ (प्रतिनिधी) –

**महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेचा मानबिंदू असलेल्या महाराष्ट्र केसरी किताबाभोवती २०२६ साली मोठा गोंधळ निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. राज्यातील चार वेगवेगळ्या कुस्ती संघटनांकडून महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करण्याची तयारी सुरू असून. एकाच वर्षात तब्बल चार स्पर्धा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अधिकृत किताब कोणता ? यावरून कुस्तीविश्वात संभ्रमाचे वातावरण आहे.**

राज्यात महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद (पवार गट), महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद (बाळासाहेब लांडगे गट), महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि भारतीय शैली कुस्ती संघटना (माती) या चार संघटना सक्रिय आहेत. यापैकी माती संघटनेने सासवड येथे, तर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने वाघोली याठिकाणी महाराष्ट्र केसरी स्पर्धा जाहीर केली आहे. पवार गटाकडूनही लवकरच स्पर्धेची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. इतर संघटनांकडूनही हालचाली सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळते आहे.

महाराष्ट्र केसरी किताबाच्या अधिकृततेवरून संघटनांमध्ये सुरू आहेत. माती संघटनेने मातीवरील महाष्ट्र केसरीचा ऐतिहासिक हक्क आपलाच असल्याचा दावा केला आहे. तर इतर संघटनाही आपल्या स्पर्धेलाच अधिकृत मान्यता मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत. यामुळे कुस्तीप्रेमी आणि खेळाडूंमध्ये संभ्रम वाढला आहे.या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम पैलवानांवर होत आहे.

कोणत्या स्पर्धेत सहभागी व्हायचे आणि कोणत्या किताबाला अधिकृत मानायचे, हा प्रश्न त्यांच्या समोर उभा आहे. मैदानात आम्ही झुंज देतो मात्र संघटनांतील वादामुळे आमच्यावर परिणाम होतो, अशी प्रतिक्रिया काही खेळाडूंनी दिली. ज्येष्ठ वस्तादांच्या मते, एकाच वर्षात अनेक महाराष्ट्र केसरी स्पर्धा झाल्यास किताबाची प्रतिष्ठा कमी होण्याची शक्यता आहे. काहींच्या मते, अधिक स्पर्धांमुळे खेळाडूंना संधी वाढतील.

राज्य क्रीडा विभाग किंवा राष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त संघटनेकडून अधिकृत भूमिका स्पष्ट झाल्यास संभ्रम दूर होऊ शकतो. अन्यथा २०२६ मध्ये महाराष्ट्र केसरी नावाखाली चार वेगवेगळे विजेते घोषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पारस सरुडकरने पटकावला ज्युनियर मिस्टर इंडिया किताब

## दिव्यांग शरीरसौष्ठव स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी

इचलकरंजी,ता.१२–

**कष्ट, जिद्द आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर शारीरिक मर्यादांवर मात करत, राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूलचा माजी विद्यार्थी पारस सरूडकर याने शरीरसौष्ठव क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तेलंगणा येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील दिव्यांग शरीरसौष्ठव स्पर्धेत पारसने ज्युनियर मिस्टर इंडिया हा सर्वोच्च किताब पटकावून देशात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे.**




राष्ट्रीय यशासोबतच, अहिल्यानगर (राहुरी) येथे झालेल्या स्पर्धेत पारसने ज्युनियर महाराष्ट्र श्री हा किताब जिंकून आपली राज्यातील पकड पुन्हा एकदा सिध्द केली आहे. त्याच्या या दुहेरी यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे. माजी विद्यार्थ्याच्या या यशाचे कौतुक करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूलमध्ये विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक शंकर पोवार, मथुरा हायस्कूलचे मुख्याध्यापक चव्हाण आणि पी.ए.पाटील , एम.ए.आयरेकर यांच्या हस्ते पारसचा यथोचित गौरव करण्यात आला.याप्रसंगी शिक्षकांनी सांगितले की, पारसने प्रतिकूल परिस्थितीत जे यश मिळवले आहे, ते आजच्या विद्यार्थी पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.



# देशासाठी विश्वचषक जिंकायचाय !

## २०२७ च्या विश्वचषकासाठी रोहित शर्माची वचनबध्दता

दुबई,ता.१२–

**मला माझ्या देशासाठी विश्वचषक जिंकायचा आहे. लहानपणापासूनच मी ५० षटकांचा विश्वचषक पाहून क्रिकेट शिकलो. तेव्हा टी–२० विश्वचषक किंवा आयपीएल नव्हता. ती स्पर्धा सर्वात मोठी व्यासपीठ होती. त्या एका ट्रॉफीला खूप महत्त्व होते. मला खरोखर ती ट्रॉफी हवी आहे आणि मी ती साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम करेन.**

भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फलंदाज रोहित शर्माने २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाबाबत आपले हेतू स्पष्ट केले आहेत. २०२७ च्या विश्वचषकासाठी स्वतःला तंदुरुस्त आणि तयार ठेवण्याची त्याची वचनबद्धता स्पष्टपणे दिसून येते.

टी–२० आंतरराष्ट्रीय आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर, रोहित फक्त एकदिवसीय स्वरूपात सक्रिय आहे. प तो २०२७ च्या विश्वचषकापर्यंत खेळत राहील का, असे प्रश्न उपस्थित झाले आहेत, जेव्हा तो जवळजवळ ४० वर्षांचा होईल. एका कार्यक्रमादरम्यान रोहित शर्माने सांगितले की, त्याचे सर्वात मोठे ध्येय भारतासाठी एकदिवसीय विश्वचषक जिंकणे आहे. वार्षिक केंद्रीय करार यादीत, रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना गट ब मध्ये स्थान देण्यात आले आहे, जे अव्वल श्रेणीच्या खाली आहे. पूर्वी, दोघेही ए+ श्रेणीत होते, ज्यामध्ये जास्त रिटेनर रक्कम देण्यात आली होती. नवीन करार चक्रात एकूण ३० पुरुष आणि २१ महिला क्रिकेटपटूंना केंद्रीय करार देण्यात आले आहेत.



# श्रीलंकेची ओमानवर १०५ धावांनी मात

## दासुन शनाकाचे विक्रमी अर्धशतक

कोलंबो,ता.१२ –

**टी–२० विश्वचषकात श्रीलंकेने ओमानवर १०५ धावांनी विजय मिळवला. दासुन शनाकाच्या विक्रमी अर्धशतकामुळे लंकेला विजय साकारता आला. दासुनने सर्वात जलद टी–२० आंतरराष्ट्रीय अर्धशतकाचा त्याचा मागील विक्रम मोडित काढत सर्वाधिक धावसंख्या नोंदवली. श्रीलंकेने २० षटकांत पाच बाद २२५ धावा केल्या.जी या विश्वचषकातील सर्वोच्च धावसंख्या होती. २२६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ओमानला केवळ ९ विकेट्स गमावून १२० धावाच करता आल्या.**

मोहम्मद नदीमने ओमानसाठी सर्वाधिक ५३ धावा केल्या. त्याने ४३ वर्षे आणि १६१ दिवसांचा असताना अर्धशतक झळकावले आणि आयसीसी स्पर्धेत अर्धशतक झळकावणारा तो सर्वात वयस्कर क्रिकेटपटू ठरला आहे. यापूर्वी, हा विक्रम नेदरलँड्सच्या फ्लेव्हियन अपोन्सोच्या नावावर होता. त्याने ४३ वर्षे १२१ दिवसांचा असताना पाकिस्तानविरुद्धच्या विश्वचषक सामन्यात ५८ धावा केल्या होत्या. वसीम अलीने २७ धावा केल्या होत्या. या दोन फलंदाजांव्यतिरिक्त, ओमानचा दुसरा कोणताही क्रिकेटपटू दुहेरी आकडा गाठू शकला नाही. दुष्मंथा चामीरा आणि महेश थीकशनाने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. त्यांच्याशिवाय दुनिथ वेलालेज, दुष्मन हेमंथा आणि कामिंदू मेंडिस यांनी प्रत्येकी एकेक विकेट घेतली. यापूर्वी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेने कर्णधार शनाकाच्या २० चेंडूत ५०, सामनावीर पवन रथनायकेच्या २८ चेंडूत ६० आणि कुसल मेंडिसच्या ४५ चेंडूत ६१ धावांच्या खेळीमुळे स्पर्धेतील सर्वोच्च धावसंख्या केली. शनाकाने त्याच्या डावात दोन चौकार आणि पाच षटकार मारले. कामिंदू मेंडिसनेही ७ चेंडूत नाबाद १९ धावा केल्या. पल्लेकेले येथे झालेल्या गेल्या सहा टी सामन्यांमध्ये हा श्रीलंकेचा दुसरा विजय होता. या विजयासह, त्यांनी ऑस्ट्रेलियाला मागे टाकत चार गुणांसह गटात अव्वल स्थान पटकावले आहे.

# ‘भिमा कृषी व पशू प्रदर्शन’ आजपासून

## पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे प्रदर्शन ; चार दिवस मिळणार कृषी–तंत्रज्ञानाची मेजवानी

कोल्हापूर ता.१२(प्रतिनिधी)–

**पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे व भव्य मानले जाणारे ‘भिमा कृषी व पशू प्रदर्शन’ आज शुक्रवार,दि. १३ पासून मेरी वेदर मैदानावर होत आहे. १३ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत चार दिवस चालणाऱ्या या कृषी महोत्सवाचे उद्घाटन सायंकाळी ४ वाजता पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. खासदार धनंजय महाडिक यांच्या संकल्पनेतून १७ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या प्रदर्शनाचे यंदाचे हे १८ वे वर्ष आहे. शेतकऱ्यांना शेतीविषयक अत्याधुनिक तंत्रज्ञान, अवजारे आणि पशुधन व्यवस्थापनाची माहिती एकाच ठिकाणी मिळावी, या उद्देशाने प्रदर्शन आयोजिले आहे.**

भिमा कृषी 2026 भव्य कृषी व पशु प्रदर्शन विचार नविन शेतीचा...

यंदाच्या प्रदर्शनात देश–विदेशातील नामांकित कंपन्यांचे २०० हून अधिक स्टॉल उभारण्यात आले आहेत. प्रॉम्प्ट इक्विपमेंट प्रा. लि., टाटा सोलर, ग्रीन प्लॅनेट बायो प्रॉडक्ट्स, लक्ष्मी पंप्स, चितळे उद्योग समूह, राजारामबापू सहकारी दूध संघ, सावंत ऑरगॅनिक फार्म, डीजे कोकोनट फॉर्म यांसारख्या नामांकित कंपन्यांचा सहभाग आहे. कोल्हापूर ऑटोमोबाईल डिलर्स असोसिएशननेही कृषी वाहनांचे विशेष २प्रदर्शन भरविले आहे.

पशू विभाग हे यंदाच्या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. कोल्हापुरात प्रथमच पाच फूट लांबीचा इग्वाना (सरडा) नागरिकांना पाहता येणार आहे. बैलगाडा शर्यतीतील प्रसिद्ध ‘हरण्या’ बैल, तब्बल १२ लाख रुपये किंमतीचा खिल्लार खोंड, सुमारे १४०० किलो वजनाचा मुरा रेडा आणि दररोज ३० लिटर दूध देणारी एचएफ गाय हे विशेष आकर्षण ठरणार आहेत. याशिवाय लालकंधारी, देवणी, साहिवाल, गिर, जर्शी आदी जातींच्या गायी–खोंड, पंढरपुरी, मेहसाणा, जाफराबादी म्हशी, विविध जातींचे घोडे, शेळ्या, मेंढ्या, वराह तसेच विदेशी व स्थानिक पक्ष्यांचा सहभाग आहे. क्षारपड जमिनीची सुधारणा, आंबा लागवड तंत्रज्ञान, सेंद्रिय शेतीतील अचूक निविष्ठा वापर, दुधाळ जनावरांची निगा, भाजीपाला सुधारित लागवड आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. उत्कृष्ट शेतकरी, शेतीभूषण, युवा शेतकरी, आदर्श शेतकरी आणि शेती तंत्रज्ञ अशा विविध पुरस्कारांचे वितरण होणार आहे. पीक स्पर्धा, जनावरांच्या स्पर्धा आणि खाद्य स्टॉल स्पर्धाही आयोजिल्या आहेत.भागीरथी महिला संस्थेमार्फत सुमारे दोनशे महिला बचत गटांना स्टॉलद्वारे आपली उत्पादने विक्रीची संधी देण्यात आली आहे.

# ‘बिल्लाचिक्या’ मसाई पठार केसरीचे मानकरी

बोरपाडळे,ता.१२ (प्रतिनिधी)–

**म्हाळुंगे (ता. पन्हाळा) येथे झालेल्या मसाई पठार केसरी भव्य बैलगाडी शर्यतीत चुरशीचे सामने रंगले. ओपन गटात वाघवाडी येथील उदय वाघ व संता मामा यांच्या बिल्लाचिक्या या दमदार बैलजोडीने प्रथम क्रमांक पटकावत केसरीचा मान मिळवला. आंबा येथील हारण्या–शंभू या बैलजोडीने दुसरा तर काले येथील सुंदर–काले या बैलजोडीने तिसरा क्रमांक मिळवला.**

आदत खोंड गटात वाघवाडी येथील बादलचिक्या या बैलजोडीने प्रथम, भागाईवाडी येथील सृष्टी चव्हाण यांच्या बैलजोडीने दुसरा तर कणदूर येथील एकनाथ कणदूरकर यांच्या बैलजोडीने तिसरा क्रमांक पटकावला.

या स्पर्धेने बैलगाडी प्रेमींमध्ये उत्साह निर्माण केला होता. कराड, सांगली, ईश्वरपूर, शिराळा, आजरा, गगनबावडा, राधानगरी, करवीर, शाहूवाडी, पन्हाळा आदी परिसरातून बैलगाडी मालक व शौकीन उपस्थित होते.



म्हाळुंगे (ता. पन्हाळा) येथे मसाई पठार केसरी बैलगाडी शर्यतीतील क्षण.

स्पर्धा खुला व आदत अशा दोन गटांत घेण्यात आली. दोन्ही गटांत पहिल्या दहा क्रमांकांना रोख रक्कम व मानाची ढाल देण्यात आली.

या स्पर्धेसाठी माजी जि.प. सदस्य प्रकाश पाटील, माजी सभापती अनिल कंदूरकर, आपटी उपसरपंच आशिष पाटील, आंबवडे उपसरपंच सरदार पाटील, हर्षद बच्चे–पाटील, सचिन पाटील, सरदार चिले आदींचे सहकार्य लाभले.

समालोचक म्हणून संभाजी यादव तर टाइम कीपर म्हणून राहुल पाटील यांनी जबाबदारी पार पाडली.स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी दीपक महाडिक, सागर वरेकर, अक्षय महाडिक, अनिल महाडिक, जयेश खेतल, राहुल पोरे, दत्तात्रय बोबडे, कृष्णात महाडिक, अमोल महाडिक, साहिल महाडिक, सुहास महाडीक, सिद्धार्थ दाभोळकर व म्हाळुंगे ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.